# कृपण धनाजीराव नाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ**—धनाजीरावाचा जुनाट बाग.

( विश्वासराव व अहिल्या बोलत प्रवेश करितात. )

**विश्वासराव**-प्रिये, अहिल्ये, हें काय बरं ? इतके दिवस प्रीतीचीं लक्षणं दाखवून आतां लग्नाची गोष्ट काढिली असतां उदासीन होतेस याला काय ह्मणावं ? तुझं माझ्यावरचं अत्यंत प्रेम पाहून मला

पूर्ण जबाबदारी माझ्या ळ्या फुटतात न फुटतात, तोंच तुझे हे दीर्घ व उष्ण

ळाही मी भीत नाहीं. प आनंदानं आर्द्र झालेलं हृदय कसं करपून जातं.

आपलीच ह्मणणें या असत्यवा माझ्यावर तो नसू

नये ह्मणून हाच मार्ग अनुसरणें मला प्रशस्त वाटलें.

दोन चार प्रवेश कथासंबंध जुळण्याकरितां नवीन करून घातले आहेत. व कांहीं कांहीं टिकाणीं ही बरेच फेरफार केले आहेत. व तेही कांहीं विद्वान् मंडळीच्या सूचनेवरूनच केले आहेत. असो; प्रस्तावना फारच लांबत चालली. आतां शेवटीं यांतील घेण्यासारख्या गोष्टी कोणत्या आहेत त्या सांगून रजा घेतों.

धनाजीरावासारखा श्रीमान् परंतु कृपण गृहस्थ जगांत कोणत्या रीतीनें दिवस काढितो, त्याला पैशाची हांव कशी सुटलेली असते, पैसा मिळविण्याकरितां तो कशाकशा युक्त्या लढवितो, लोकांच्या मानेवर संकटकाळीं सुरी कशी ठेवितो, इत्यादि गोष्टी यावरून स्पष्ट समजण्यासारख्या आहेत. शिवाय, अशा तऱ्हेनें वागतांना तो आपल्या मुलाशीं कशा तऱ्हेनें वागतो, व पोरेंही त्याच्याशीं कशा तऱ्हेन

त्यास भूषणास्पद आहे.
अहिल्येची परस्परांवरील
प्रीति हा प्रत्येक पुरुषानें व स्त्रीनें लक्षांत ठेवण्यासारखी आहेत.

पार्वतीचें पात्र जरी एकाद्या अट्टल कुंटिणीचें रंगविलें नाहीं, त
पण पैसा देईल त्याचें काम तिच्याकडून व्हावयाचें इतकें यांत दा
विलें आहे. व तेवढेंच सध्यां लोकांना उपदेश घेण्याला पुरें आहे.

मार्मिकपणानें वाचल्यास याहूनही अधिक गोष्टी निवण्यासार
आहेत त्या सर्व देऊन येथें स्थळ व काळ अडवीत नाहीं.
करितां वाचकांनीं मला क्षमा करावी. सुज्ञांनीं यांतील दोष मला दा
विल्यास मी त्यांचा आभारी होईन.

पुस्तककर्ता.

चिकोडी.
ता० १९।१।९९

# कृपण धनाजीराव ना

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

स्थळ—धनाजीरावाचा जुनाट बाग.

( विश्वासराव व अहिल्या बोलत प्रवेश करितात. )

**विश्वासराव**—प्रिये, अहिल्ये, हें काय बरं? इतके दिवस प्रीतीचीं लक्षणं दाखवून आतां लग्नाची गोष्ट काढिली असतां उदासीन होतेस याला काय ह्मणावं? तुझं माझ्यावरचं अत्यंत प्रेम पाहून मला आनंदाच्या उकळ्या फुटतात न फुटतात, तोंच तुझे हे दीर्घ व उष्ण श्वास ऐकून हें आनंदानं आर्द्र झालेलं हृदय कसं करपून जातं. मला आनंद झाल्यानं तुला दुःख व्हावं हें कसं संभवेल? अथवा आपली उभयतांची परस्परांवर विनाकारण प्रीति जडली असं मनांत येऊन तर तुझ्या मनाला पश्चाताप होत नाहीं ना?

**अहिल्या**—छे छे. असं होईल तरी कसं! आपल्यावर माझी प्रीति जडली ह्मणून माझ्या मनाला मुळींच दुःख होत नाहीं. आपल्याशींच माझी आणभाक झाली ह्मणून मला तर किनई भारीच आनंद होतो. आणि देवाच्या दयेनं पुनः आपला दोघांचा कधींही वियोग होऊं नये अशीच माझी इच्छा आहे. पण खरं पुसाल, तर पुढं याचा परिणाम काय होईल हें मनांत आलं ह्मणजे काळीज कसं चर्र होऊन जातं बाई! आपल्यावर माझं जितकं प्रेम असावं त्याच्यांहीपेक्षां तें अधिक आहे ह्मणूनच मला फार भय वाटतं.

भास: कर्व [illegible]डी आहेस तूं. माझ्यावर जडलेल्या प्रेमामुळं तुला भीति [illegible] कांहीं कारण नाहीं. हे तर ती भीति सोडून व पहिल्यासारखी पूर्वीप्रमाणं मोकळ्या मनानं वाग कशी.

अ०—पण मेलं माझ्या भीतीचं कारण तेवढंच कुठं आहे. बाबांचा राग, घरांतल्या माणसांची छी थू, जगाचं हासं हीं तरी कारणं कांहीं कमी आहेत कां? शिवाय आपली तरी प्रीति जन्मभर कायम राहील—( जीभ चावते ) हें पहा, माझ्यावर रागावूं नये गडे. बोलतांना चुकलें याची क्षमा करा. पण हा दोष मी कांहीं एकट्यालाच नव्हतें देत. जगांत पुरुषच नायकांना फसवीत असतात, ह्मणून आपलं—

वि०–शिवशिव! माझ्याविषयीं अशी भलतीच कल्पना काढून तूं जगावरून माझी परीक्षा करूं नकोस. माझे इतर गुण कसे जरी असले; तरी तुझ्यावरचं माझं प्रेम तिळमात्रही ढळणार नाहीं खास. फार काय सांगूं? माझ्या अंतःकरणांत जे प्रेमांकुर उद्भवले आहेत, ते यावज्जीव करपून जाणार नाहींत.

अ०–खरंच बाई, सर्वजण असंच सांगतात. पण जेव्हां त्यांच्या करण्यांत व बोलण्यांत मेळ दिसत नाहीं, तेव्हां मात्र चांगलं कोण, वाईट कोण हें कसं तेव्हांच समजतं.

वि०–( किंचित् रागावून ) तर मग माझ्या अंतःकरणाची पुरी परीक्षा होईपर्यंत धीर धर. जाणून बुजून आपल्या जन्माची माती करून घेऊं नको व मजवर असले दोषारोपही करूं नको. ( किंचित् थांबून ) हें पहा, तुझ्यापासून मला जें सुख प्राप्त होणार, तें मिळण्याकरितां मी माझा प्राण देखील देईन. मग असले भलतेसलते संशय

घेऊन त्या माझ्या सुखाच्या आड कां बरं येतेस ! प्रसंग तरी येऊं दे म्हणजे मग माझं प्रेम तुझ्यावर किती आहे याबद्दल तुझी आपोआप खात्री होईल.

अ०—( लाजून ) काय बाई तरी चमत्कार हा ! ! तोंडांत जशी काय साखर भरली आहे. दुसऱ्याचं समाधान कसं मेलं चटदिशीं करतां येतं. ( उघड ) माझा कितीई आपल्यावर पूर्ण विश्वास आहे. आतां तरी झालं ना ? आपलं सारं प्रेम माझ्यावर आहे. आपण माझा कधींही केसानं गळा कापणार नाहीं अशी माझी किती तरी दिवसांपासून खात्री झाली आहे. मी कांहीं आपल्या सुखाच्या आड येत नाहीं. पण मेलं—

वि०—पण काय ? तुला भीति कसली वाटते ?

अ०—लग्न व्हावयाच्या आधींच जर हा सारा प्रकार बाबांना कळला, तर ते काय बरं ह्मणतील ? ते आपल्या लग्नाला अनुमोदन देतील कि नाहीं कोण जाणे ! एकदां राजरोसपणें लग्न झाल्यावर मी कश्शालाही भिणार नाहीं. आपले सर्व गुण मला माहित आहेत व त्यांच्याच योगानं आपल्याविषयींची प्रेमबुद्धि--फक्त प्रेमबुद्धिच नव्हे तर कृतज्ञतासुद्धां—माझ्या मनांत एकसारखी वाढत आहे. त्या दिवशींचा तो कोण भयंकर प्रसंग ! अगबाई ! आणि त्यांतून आपण मला वांचवलं हें मी कसं विसरेन बरं ! मला वांचविण्याकरितां आपल्या जिवाकडेही न पाहतां त्या भयंकर महापुरांत आपण उडी घातली. मग मी त्याच्या मोबदला हा देह अर्पण करूं नये, तर मी आपली उतराई कशी बरं होऊं ? तसंच, आपण माझ्याकरितां आपलं घर सोडलं दार सोडलं, आईबापांची उपेक्षा केली; फार तर काय ? माझ्या बापाच्या

शीं चाकरी पत्करून राहण्यासुद्धां मागें पुढें पाहिलं नाहीं. या सार्‍या गोष्टी मनांत आल्या किंनई म्हणजे गळा कसा बाई भरून येतो. मग या सर्व गोष्टींबद्दल हा देह या चरणीं अर्पण केला, यांत मी अधिक तें काय केलं?

वि०—तूं माझ्यावर नसत्या गुणांचा आरोप करीत आहेस झालं तुझ्यावर माझं प्रेम जडलं आहे एवढं मात्र खरं. व एवढ्यानेंच तुझ्याशीं विवाह करण्याची माझ्या अंगीं योग्यता असली तर असेल. वस्तुतः पाहिलं, तर गुणांनीं तूं माझ्यापेक्षां कांकणभर चढच आहेस. हे तुझे गुण तुझ्या बापाला समजत नाहींत हें पाहून मात्र मला फार वाईट वाटतं. व आपल्या पोटच्या पोरांविषयीं त्याच्या मनांत बाण लेला द्वेष व तिटकारा पाहून मी आश्चर्यानं अगदीं थक्क होऊन जातों. गिवलगे, मी तुझ्या समक्ष तुझ्या बापाचा उपहास करितों या बद्दल क्षमा कर. मी तरी काय करूं? त्याची स्तुति करावी अशी त्याची योग्यता नाहीं. काय सांगूं, लाडके! सुदैवानं जर माझ्या आईबापाचा शोध लागला, तर आमचा हा संयोग होण्यास त्यांचं अनुमोदन पडेल इतकंच नव्हे, तर तुझ्या बापाचं अनुमोदन संपादन करून घेण्यासही ते हवे ते प्रयत्न करतील. त्यांच्या सुरक्षितपणाची आनंददायक वार्ता ऐकण्याकरितां माझे कान उत्सुक होऊन राहिले आहेत.

अ०—मग त्यांचा शोध लागावयाची कांहीं आशा आहे कां?

वि०—त्यांच्या शोधाला पाठविलेल्या लोकांपैकीं अद्यापि कोणीही परत आला नाहीं. यामुळें जिवाला हुरहुर लागून राहिली आहे. आतां आणखी आठ दिवस वाट पहाणार. व तेवढ्या अवधींत जर कोणीच आलं नाहीं, तर मीं स्वतःच जाण्याचा निश्चय केला आहे.

अ०–( भिऊन ) हें काय बाई! मला सोडून कां जायचं? आपल्यावांचून मला कसं बरं करमेल? नका जाऊं गडे मला सोडून! त्यांचा शोध लागायला तरी किती दिवस लागतील कोण जाणे! तेवढ्या वेळांत बाबांचीच मर्जी संपादन करण्याचा जास्त प्रयत्न केला तर नाहीं कां होणार?

वि०–हो. न व्हावयाला काय झालं? पण माझ्या आईबापांना भेटण्याची जी इच्छा मला झाली आहे, ती तरी तृप्त झाली पाहिजे ना? आतां तूं ह्मणतेस त्याप्रमाणं तुझ्या बापाला खुष करण्याचा प्रयत्न मीं चालविलाच आहे. त्याच्या घरांत चाकर होऊन राहावयाला मला किती सायास पडले व किती युक्त्या लढवाव्या लागल्या, हें तुला माहित आहेच! त्याचं प्रेम संपादन करण्याकरितां माझे स्वतःचे मनोविकार काबूंत ठेवून त्यांच्याच ह्मणण्याला मी हूंकार कसा देतों हीही गोष्ट तुला सांगावयाला नकोच ! अलीकडे मला या कृत्यांत यश येत चाललं आहे. अग, अशा माणसांना वश करून घेण्यांत खुबी अगदीं थोडी असते: त्यांचीं जशीं मतं असतील, तशींच आपलीही आहेत असं त्यांना दाखवावं; त्यांचे जे विचार असतील त्यांना नेहमीं माना डोलवाव्या; त्यांच्या अंगीं दुर्गुण असले तरी ते सद्गुण मानून त्यांची तारीफच करावी; व ते जें जें ह्मणतील किंवा करितील, तें सर्व यथायोग्य व सर्वोत्कृष्ट आहे असंच ह्मणावं. यापेक्षां दुसर साधनच नाहीं. फार हांजीहांजी करूं नये. कारण तसं केल्यानं एखादे वेळीं त्यांच्या मनांत संशय येऊन सर्वच ऑफस् होऊन जावयाचं ! या उपायांनीं मनुष्य कितीही धूर्त, अट्टल व कावेबाज असला तरी तो देखील प्रसंगविशेषीं चकण्याचा संभव असतो. या जगांत जो मनुष्य हरएक कामांत निव्वळ प्रामाणिकपणानं वागतो, त्याची चांदी आटावयाचीच ! ह्मणून जेव्हां आपल्या-

ला अशा मनुष्याशीं संबंध ठेवावयाचा प्रसंग येतो, तेव्हां आपणांस त्याच्या मर्जी विरुद्ध जातां कामा नये. व अशा प्रकारचे निंद्य उपाय योजिल्याशिवाय जर इच्छित वस्तु प्राप्त होण्याची आशा दिसली नाहीं, तर ते बेलाशक योजावे. यांत हांजी हांजी करणाऱ्या मनुष्यावर दोष ठेवावयाला जागा उरत नाहीं. तर जो मनुष्य हांजी हांजी करून घेतो तोच दोषास पात्र होतो.

अ०–बरं पण ही गोष्ट दादाच्याही कानावर घालावी असं मला वाटतं. तो मेला संभ्या आहे किनई त्याला हें सारं माहित आहे. तो दादाच्या पूर्ण विश्वासांतला. तेव्हां त्यानं सांगायच्या आधींच आपण सांगणं बरं नव्हे कां? दादा कांहीं या गोष्टीला आड येणार नाहीं.

वि०–काय? या उभयतां बापलेकांचीही मनधरणी करावयाची? त्यांचे स्वभाव इतके भिन्न आहेत कीं एकाच वेळीं दोघांच्या मर्जीप्रमाणं वागणं हें प्रत्यक्ष ब्रम्हदेवाच्या हातून सुद्धां होणार नाहीं!–– आतां तूंच ही गोष्ट प्रतापरावाजवळ काढ. व मोठ्या लाडीगोडीनं त्याचं मन वळीव. मी धनाजीरावाच्या ह्मणण्याप्रमाणं वागतों ह्मणून माझ्यावर त्याचा कदाचित् राग असेल. या करितां जपून गोष्ट काढ बरं! नाहींतर करावयाला जाशील एक व होईल भलतंच! (दूर पाहून) अरे वा: ! तो इकडेच येत आहे वाटतं! जाऊं तर मग मी! त्याला नीट सुचवून त्याचं अनुमोदन घे हं ! (जातो)

अ०–मला तर बाई कसंसंच वाटतं ! एकदां वाटतं कीं ही गो[ष्ट] त्याच्या जवळ काढावीच. पण पुनः वाटतं कीं काढली तर [तो] काय ह्मणेल कोणास ठाऊक !

(प्रतापराव येतो.)

प्र०–ताई, तूं इथं एकटीच आहेस हें पाहून मला फार आनंद

झाला. मी किती तरी दिवसांपासून तुला कांहीं आनंदाचं वर्तमान सांगावं ह्मणतों: पण अशी संधिच मुळीं मिळाली नाहीं.

अ०—काय बरं तें दादा? सांग बघूं.

प्र०—( गंभीर मुद्रेनें ) मी तुला एकाच शब्दांत दोन गोष्टी सुचविणार आहें!

अ०—तो कोणता बरं शब्द?

प्र०—प्रीति ! !

अ०—( दचकून आपल्याशीं ) अगबाइ ! ह्याला आमची सारी हकीकत कळलीशी वाटते. कळेना कां? आयतंच काम झालं. पण आपण होऊन कांहीं याला इतक्यांत दाद लागूं देऊं नये. ( उघड ) प्रीति ! ह्मणजे रे काय? तुझी कोणावर प्रीति कां जडली आहे?

प्र०—( किंचित् हांसून ) प्रीति खरी; पण ती माझीच ह्मणून तुला कोणीं सांगितलं?

अ०—( गोंधळून ) हें रे काय मेलं? असं मोघम बोलण्यानं काय समजावं बाई!

प्र०—हें पहा, निजलेल्याला जागं कसंही करितां येईल; पण बोआ जाग्याला जागं करणं फार कठीण ! ! ( ती लाजते हें पाहून ) अग, लाजतेस कशाला? माझ्या पासून कां तूं चोरून ठेवणार? मला तर तें केव्हांच समजलं आहे. आणि मला तें मान्यही पण आहे. हीच गोष्ट मी पुष्कळ दिवसांपासून तुला सांगणार होतों; पण मलासुद्धां असलीच एक चिंता असल्यामुळें तें तसंच राहिलं.

अ०—काय? तुलाही असलीच चिंता होती? तर मग तुझ्या मुद्रेवरून ती आतां दूर झाली असावी असं दिसतं.

प्र०—होय. पण तें सर्व यापुढं बाबांच्या मर्जीवर अवलंबून आहे. कारण, ज्यांनीं आपल्याला जन्म दिला, ज्यांना ईश्वरानं आपले

पालनकर्ते नेमिले, जे आपलं नेहमीं कल्याण करूं इच्छितात. त्यांच्या अनुमोदनावांचून मुलांनीं आपापलीं लग्नं करूं नयेत, अशी एक चाल आपल्यांत बोकाळते आहे ना? ही जर चाल नसती, तर लग्न करून मी केव्हांच मोकळा झालों असतों !

अ०--खरंच कीं काय? पण त्या आमच्या वहिनीबाईचं नांव तरी काय?

प्र०—आपल्या त्या शिरक्याच्या गणपती समोरच्या वाड्यांत एक नवीन तरुण मुलगी व तिची आई नाहीं का येऊन राहिली? तीच मुलगी. —अहाहा ! ताइ, तिचं सौंदर्य खरोखरच अनुपमेय आहे. तिला पाहिलं कीं ब्रम्हदेवानं अशा सुंदर पुतळ्या या भूतलावर थोड्याच निर्माण केल्या असाव्यात असं वाटतं. कारण, जगांतील सर्व सौंदर्य व सर्व मार्दव इच्या ठिकाणींच एकवटलेलं दृष्टीस पडतं. तिला पहातांच मी अगदीं वेडा होऊन जातों. तिचं नांव—

अ०—अगबाई! लग्न व्हायच्या आधींच का इतकी लाज नांव घ्यावयाला?

प्र०—तुला तरी भारीच बोआ थट्टा करायला पाहिजे. मीं सांगणार होतों तोंच तूं मध्यें बोललीस. तिचं नांव मथुरा बरं. तिची आईही किती दयाळू—गरीब बिचारी ! ती इथं आल्यापासून आपली आजारी आहे. ती पोरमुद्धां त्या बिचाऱ्या आइकरितां किती हाल सोसते, हें जर तुला सांगितलं, तर तुझं हृदय खचित फाटून जाईल. तिचं सर्वोत्कृष्ट वर्तन व अगदी प्रशंसनीय विनय इत्यादि गुणांनीं तर ती फारच रमणीय दिसते. ताई, खरोखर तिला पाहिल्यावांचून तुला तिच्याविषयीं कल्पनाच करितां यावयाची नाहीं !

अ०—दादा, तूं म्हणतोस तशी ती असेल खरी. तुझं तिच्यावर प्रेम बसलं आहे, एवढ्यावरूनच तिच्या गुणांची मला परीक्षा झाली.

तूं कांहीं एकाद्याची विनाकारण स्तुति करणार नाहींस.

प्र०—सध्यां त्या इतक्या भिकार स्थितींत आहेत कीं त्यांना नेहमीं माध्यान्ह काळाची पंचाइत आहे! अशा स्थितींत त्यांना ज्या गोष्टींची वाण असेल, त्या देऊन त्यांचं दुःख निवारण करणं हें माझ्या सारख्याला उचित नव्हे काय? व त्याच्या योगानं माझ्या मनाला किती संतोष होईल याचा तूंच विचार कर. पण करायचं काय! "परस्वाधीनार्जिणं न पुस्तकी विद्या" तशी अवस्था! त्यांना देईन म्हटलं तर एक फुटकी कवडी तरी हातांत आहे काय? बाबांच्या अनिवार चिकटपणामुळं दांतावर मारावयाला एक पैसा सुद्धां मजजवळ नाहीं. यामुळं माझ्या मनाला जें दुःख होत असतं त्याची कल्पना कोणालाही करतां येणार नाहीं. या दुःखाच्या काळजीनं माझी अवस्था कशी होत चालली आहे हें तूं पहातोसच.

अ०—खरंच दादा. मला देखील तसंच वाटतं.

प्र०—घरांत असलेला पैसा पुरून ठेवावा व परोपकाराच्या कामाला एक पैही खर्चूं नये यापेक्षां या जगांत दुसरा निर्दयपणा कुठं उरला आहे? आह्मी जख्ख म्हातारे होऊन बसलों म्हणजे ती संपत्ति घेऊन काय जाळावयाची आहे? पुढं आह्मांला तिचा काय उपयोग होणार? तारुण्यांत हें आमचं सुखः धड अन्न ना वस्त्र! बाजारांतून मासल्याकरितां म्हणून प्रत्येक दुकानांतून मूठमूठभर आणलेल्या तांदळांचा भात खावयाचा व हीं असलीं रकटीं वापरावयाचीं! अशा रीतीनं राहून जगांत तोंड दाखविणं म्हणजे मला मेल्यापेक्षांही पलीकडे होऊन जातं कांहीं नाहीं बस्स!! आज उत्तम नव्हेच पोषाक बनविणार व ते अंगावर घालून गांवांतून हिंडणार. (हळूच) तुला सांगूं का? मी थोडं बहुत कर्ज काढून आज कपडे शिवावयालाही टाकिले आहेत. ते इतक्यांत येतील. शिंप्याला मी इथंच यावयाला सांगितलं आहे.

अ०—नको गे बाबा असें काहीं नको त्याच्यापेक्षां हीं भिकार र-कणीच बरी.

प्र०—तें असूं दे. आतां तुला सांगावयाचें ह्मणून इतकेंच कीं माझ्या या लग्नाबद्दल बाबांच्या जवळ तूं गोष्ट काढ. आई वारल्यापासून प्रपंचाच्या कामांत बाबा नेहमीं तुलाच विचारतात, ह्मणून मी ही तुला गळ घालतों. जर बाबांचें या कृत्याला अनुमोदन मिळालें नाहीं तर मी आजपासून निराळा होणार. अशा या स्थितींत राहण्यापेक्षां त्या सुंदर, सुशील स्त्रीसह संसार करून तो परमेश्वर जी जाडी भरडी भाकर देईल, तींतच संतोष मानावा असा मीं निश्चय केला आहे. ताई, तुझीही स्थिति मजप्रमाणेंच आहे. तुझ्या लग्नांतही जर बाबा खो घालणार असतील, तर आह्मी दोघेंही निघून जाऊन या थेरड्याच्या त्रासांतून मुक्त होऊं.

अ०—दादा, आई मेल्यापासून किनई बाबांचा हा त्रास वाढत्या कलावरच आहे. मला तर पदोपदीं दुःख होतें. व—

प्र०—अग हळू बोल. ते पहा आंतल्या चौकांत बाबा मोठमोठ्यानें बोलताहेत. न जाणो, कदाचित् ते इकडेही येतील! या बागेंत त्यांच्या खेपा वारंवार होत असतात. मग कां तें कोण जाणे!! तर चल आपण बागेच्या त्या कोंपऱ्याला जाऊन आडमोरे बोलत बसूं. तोंपर्यंत शिंपी—अरे वा: आलाच कीं हा! चला तर कपडे पाहूं. (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—धनाजीरावांच्या घरांतला चौक.

(धनाजीराव बसले आहेत. व संभ्या कोंपऱ्यांत उभा आहे.)

ध०—माझ्या घरांतून या क्षणींच चालता हो. आणि असला वाचा-

ळपणा करून मला पुनः श्राम देऊं नकोस. अरे ए बेअकल्या. गाढवा, संभ्या, ऐकूं येतं कीं नाहीं? चल चालता हो बाहेर. आणि जर फिरून माझ्या उंबऱ्याच्या आंत पाऊल टाकशील तर तंगड्याच मोडून टाकीन. लुच्चा कोठला !!

सं०–( मनांत ) ह्या म्हाताऱ्यावानी दोड म्हातारा आपुन तर न्हाई बा कंदी बगितला. ह्यच्या मनामंदी कांही तरी तर्ग दृया ये-तीया कां बगा! ह्या म्हातारा न्हव म्हातारा: जिता समिंद हाय जनूं.

ध०–काय रे हरामखोरा. काय पुटपुटतो आहेस आपल्याशीं!

सं०–आपुन मला कशापाई जाया सांगताया ह्यचाच इचार कर-तुया बगा. पन चिभन से मला अजूनबी उमगना! मी असं काय केलंयाजी!

ध०–मी तुला बाहेर कां घालवितों याचीं तुला कारणं पाहिजेत काय! मग्रूर नाहीं तर! संभ्या हा चावटपणा पुरे कर. याक्षणीच माझ्या इथून निघून चालता हो. नाहींतर कोरड्याखालीं झोडपून काढीन.

सं०–( मनांत ) काय पिसाळल्यावानी अंगावर येतुया बगा! पन हातनं काय व्हनार त्ये मला पुरतं ठावं हाय. ( उघड ) पन असं मी काय केलंया?

ध०–जा ह्मणून सांगितलं तरी जात नाहींस हाच अपराध मादर—

सं०–पन आमच धनीसाब, आपल परतापराव, त्येनीं मला हतंच वाट बगत उभ न्हाया सांगितलं म्हूनशान न्हायलों. न्हाईतर कशापाई न्हातुया?

ध०–तुला त्यानं वाट पहात उभं राहावयास सांगितलं असेल, तर सडकेवर जाऊन खुशाल बारा न् बारा चोवीस तास वाट पहात

उभा रहा. सगळी सडक मोकळी आहे. माझ्या घरांत एक क्षणभरही उभा राहूं नको. तुझ्या सारखे लुच्चे लोक हेर होऊन घरांत येतात; व मी काय करितों, कुठें काय ठेवितों वगैरे सर्व पाहून हळूच लग्गा साधितात. घातकी, नीच, हरामखोर, पाजी लोक !! माझ्या घरांत येऊन माझ्या द्रव्यावर कसे मांजरासारखे टपून बसतात. घराचे सर्व कानेकोंपरे कुठें कांहीं सांपडेल तर पहावें ह्मणून धुंडीत असतात. यांचा सर्व डोळा काय तो माझ्या पैशावर !

सं०–दादासाब, या आपल्या कडेकोट बंदोबस्तामंदी याक फुटकी कवडी तरी कुनाच्या हाताला लागल काय? मंग त्यो लुच्चा न्हाइतर लुच्चाचा बा कां असना? आपून काइतरी भाइर ठवलं हाय कां? अक्शी मातीं, चिकूल, शानबी कुलुपामंदी घातलेया न्हवं? आन् इत्कं करूनबी गुमान बसलाय्‌ा कां? रातंदिस मसिंदावानी त्येच्यावर पारा करताया. मंग अशा पान्यांतनं घरामंदी चोर याया त्यो येडा असल ! !

घ०–अरे चल! नुसता समंधच काय? ब्रह्मसमंध, खवीस, राक्षस, ब्रम्हराक्षस काय हवा तो मी आहें. तुला काय करावयाचं आहे? मला काय वाटेल तें मी कुलपांत ठेवीन व केव्हां पाहिजे तेव्हां व कुठं हवा तिथं पहारा करीन. तूं मला कोण विचारणार? चल जा! असे तुझ्यासारखे माझ्या घरावर टेहळणी करणारे लुच्चे लोक मीं लाखों पाहिले आहेत ! ( आपल्याशीं ) याला माझ्या पैशाचा सुगावा लागला आहे कीं काय असा संशय येऊन अंतःकरण कसं चर्र होऊन जातं! ( उघड ) कायरे ए लुच्चा, तूंच नाहीं कां, मी माझ्या घरांत पुष्कळ पैसा पुरून ठेविला आहे म्हणून गांवांत कंड्या पिकविल्यास?

सं०–कसं ह्मटलं दादासाब? आपून आपल्या घरामंदी पैका पुरून ठवलाया?

ध०–( जळफळत तोंड वाईट करून ) चोर कुठला! पैसा पुरून ठेवला आहे असं मीं कधीं ह्मटलं? ( मनांत ) मी रागाच्या आवेशांत भकेन कीं काय न कळे!! ( उघड ) टवाळा, मजजवळ कांहीं पैसा आहे अशी खोटी बातमी उठविणारा तूंच ना एवढंच मीं तुला विचारलं.

सं०–दादा साब, मी आपला चाकर मानुस. तुमच्याजवळ दबोलं असलं न्हाईतर नसलं त्येची पंचाईत मला कशापाई?

ध०–( रागानें ) कां? वाचाळपणा नाहीं कां अजून बंद होत? ( उठून हात उगारून ) मादर × ×, अशी बत्तिशी रंगवून सोडितों, कीं तिच्या वाटे पुनः "पैसा" अशा शद्बच निघूं नये! मी तुला पुनः एकदां सांगतों कीं तूं मुकाट्यानं इथून चालता हो.

सं०–बरं हाय दादासाब. ह्यो मी निघालों बगा. ( जाऊं लागतो. )

ध०–नाहीं. पण जरा थांब. तूं कांही लांबवून नेतो आहेस कीं काय मला पाहूं दे.

सं०–( मनांत ) आन लांबवून न्याया हाय तरी काय?

ध०–चल ये इकडे! असा पुढं ये. मला तुझा झाडा घेऊं दे. चल दाखीव तुझे हात.

सं०–ह्ये बगा. ( दाखवितो. )

ध०–( बुद्धिभ्रंश झाल्यासारखें करून ) दुसरे हात कुठं आहेत?

सं०–काय दादासाब, आपनास्नी काय येड लागलंया कां काय? काय ख्योळ चालीवलाया ह्यो? आँ? मानसास्नी कंदी चार हात असत्यात व्हय! दुसर हात कुठलं दावूं जी?

ध०–होय गुलामा; मला वेडच लागलं आहे. व माझं वेड जाण्याकरितां तुलाच डागण्या दिल्या पाहिजेत. दाखीव तुझे दुसरे हात!

सं०–( आपल्याशीं ) आमची चांदी आटवायपाईं काईतरी युगुत काढलीया थेरड्यानं! मला बी आतां न्याराच कावा केला पायजे.

( उघड ) ह्ये बगा दादासाब दुसर हात. ( उलटे करून दाखवितो. )

ध०—ह्या मांड चोळण्यांत कांहीं छपवून ठेविलं नाहींसना? ठेवायचा तूं. ही पहा गुडघ्यांवरची पोकळ जागा एकादी वस्तु लपवून ठेवावयाला कशी सुरेख आहे ती ! काढ लवकर.

सं०—काय असल त्ये तुमीच बघा दादासाब.

ध०—( चोळणा चांचपून ) कांहीं सांपडूं दे तर खरं. ह्मणजे पहा तुला कसा फांशीं द्यायला लावतों तो !

सं०—( आपल्याशीं ) तुझ्यावानी जीं मानसं असयाल त्येस्नीच आदुगर फांशीं दिलं पायजे. ह्येचं काय बी चोरल्यापासून आपनाला काय नफा व्हनार ह्येचंच मला लई कोडं पडलंया.

ध०—अरे लुच्चा !

सं०—काय झालं दादासाब?

ध०—तूं चोरीविषयीं काय पुटपुटतो आहेस?

सं०—मी असं ह्मनतों कीं मीं कायबी चोरलं असलं तर त्ये आपुन खुद्द बगतां ह्ये लई नामी हाय !

ध०—मीही पण तेंच ह्मणतों. ( त्याचे खिसे चांपचतो. )

सं०—द्येवा ह्मसोबा, पटकी येऊनशान पिरातिमींतलीं समदीं चिक्कू मानसं पटाटां मरून जाऊं द्येत. ह्मंजी तुला दोन बकरीं आन् तीन कोंबडीं व्हाईन. न्हाइतर पुनमीदिशीं तुझ्याम्होरं दंडवत घालीत येईन.

ध०—काय रे, काय ह्मणतोस?

सं०—कसं ह्मनताया? मी काय ह्मटलं त्येच इचारताया व्हय?

ध०—होय होय. चिक्कू माणसांविषयीं तूं काय बोलत होतास तेंच मी तुला विचारतों.

सं०—मी ह्मनतों कीं तसलीं चिक्कू मानसं पटकीनं पटाटां मरून जाऊं द्येत.

ध०-तूं कोणाविषयीं रे हें बोलतोस?

सं०-( त्रासल्यासारखें करून ) चिक्कू मानसं न्हाइत का कुनी? त्येंच्या इशींच्र बोलतुया न्हवं? ( आपल्याशीं ) काय चिमन तरास हाय बगा!

ध०-हीं माणसं ह्मणजे कोण कोण रे?

सं०-तीं दोड असत्यात!! दोड ह्मणजे लईच दोड दादासाब! पैसान् पैसा जमवून जिमिनीमंदी पुरून ठेवत्यात! धड आपुनबी खर्चेत न्हाइत आन् दुसऱ्याला बी खर्चूं द्येत न्हाईत! त्येंच्यावानी—

ध०-( त्रासानें ) अरे तूं हें ह्मणतो आहेस तरी काय?

सं०-( शांतपणानें ) पन आपुन कां उगच आपल्या जिवाला तरास करून घेताया?

ध०-अरे मी मुद्दाम कशाला करून घेऊं? तुझ्या या बोलण्यापासून मला आपोआपच त्रास होतो आहे.

सं०-ह्ये मी आपनालाच बोलतों असं तुमीं समजतां जनूं! दादासाब! आपनास्नी मी चिक्कू कशापाईं ह्मनूं जी? आपुन तर लई उदार! अक्शी लंबकरनाचं—

ध०-( रागानें ) काय?

सं०-अक्शी करनाचं अवतार ह्मटलं न्हवं! तुमास्नी असं वाटलं कीं—

ध०-मला काय हवं तें वाटूं दे. तुला काय त्याचं! पण तुला खात्रीनं सांगतों कीं तूं हें कोणाविषयीं बोलत होतास तें सांगितल्यावांचून तुला येथून जाऊं देणार नाहीं.

सं०-मी कुनाइशीं बोललों ह्मनतां व्हय? मी आपला माज्या डोक्शा इशीं बोलत होतों.

ध०-तर मग त्याचं उत्तर मला तुझ्या डोक्यावरच द्यावं लागेल.

सं०–तर मग चिक्कू मानसाम्नी मी शिव्या देऊं नग व्हय?

ध०–दे नाहीं तर न दे. परंतु माझ्यापुढें मी तुला वात्रटपणा व दांडगाई करूं देणार नाहीं. इत्युत्तर तोंड अगदीं आटपून ठेव. ठेवशील की नाहीं?

सं०–पन मी नांव कुनाचं ध्येतुया?

ध०–आतां एक अक्षर अधिक बोलशील तर खरपूस खाऊ मिळेल.

सं०–ज्याचं भरलं असल त्येला मिळल!

ध०–कां गप्प राहतोस कां नाहीं?

सं०–आपुन सांगतां म्हून न्हातों! पन दादासाब—

ध०–अरे आणखी?

सं०–ह्यो योक खिसा अक्शी इसारलाच बगा. ह्यो एवढा बगा मंजी झालंच!

ध०–चल आण त्यांत काय आहे तें!

सं०–काय आनूं जी?

ध०–त्यांत जें कांहीं चोरून ठेवलं असशील तें.

सं०–अक्शी आईच्यान् काइबी चोरलं न्हाई.

ध०–अगदीं खरं ना? बघ! विचार कर!! खरं ना अगदीं?

सं०–अक्शी खरं.

ध०–जा तर मग. जा शिच्या मरणांत.

सं०–एकांद्याला घरांतनं हुसकून काढायला ही लई नामी युगुत! कोन ध्येरडा ह्यो! पक्का खवीस हाय. अवसला लागला तर पुनमीलाबी सुटायचा न्हाई! (जातो.)

ध०–(रागानें) अरे चोरा! मला शिव्या देतोस! (त्याला मारण्याकरितां रागानें त्याच्या पाठोपाठ जातो.)

## प्रवेश ३ रा.

स्थळ—तेंच.

[ धनाजीराव प्रवेश करितो. ]

ध०-( आपल्याशीं ) हा संभ्या म्हणजे माझ्या मागं मूर्तिमंत साडेसाती आहे. काय करावं? या हरामखोराचं दर्शन सुद्धां नको असं वाटतं. पण तें चुकतं कुठं? ( जरा थांबून ) वास्तविक पाहिलं असतां एखादी मोठी रक्कम जवळ बाळगणं हें काम म्हणजे कमी धोक्याचं आहे असं नाहीं! किती तरी चिंता वहावी लागते!! ज्या मनुष्याजवळ शिल्लक म्हणजे किती, अगदीं दररोजच्या किरकोळ खर्चापुरतां व बाकीचे सर्व पैसे व्याजीं लाविलेले असतील, तोच खरा सुखी! तोच खरा धन्य!! तोच खरा भाग्यवान्!! काय करावं? माझ्याजवळ जी रक्कम आहे ती पुरून ठेवण्याला एखादी निवांत जागा सांपडत नाहीं. मोठी पंचाईत आहे! घरांत मोठमोठ्या भरभक्कम तिजोऱ्या आहेत. पण त्यांच्यावर मुळींच भिस्त ठेऊन उपयोगी नाहीं. कारण, घरांत चोर शिरले कीं त्यांचा पहिला हल्ला काय तो त्यांच्यावर! तेव्हां जागा कोठची पहावी? ( विचार करीत फिरतो; इतक्यांत प्रतापराव व अहिल्या बोलत बोलत येतात. ) बरं, काल जे दहाहजार रुपये त्या ×× च्या कडून आले, ते मी कसे तरी माझ्या बागेंत पुरून ठेविले आहेत. पण तें स्थळ तरी सुरक्षित असेलच असा नाहीं आपला सूर वहात. दहाहजार ही रक्कम खरोखर—( तीं दोघें एकमेकांत कुजबुजताहेत त्यांना पाहून ऊर बडवून ) अरे देवा! घात झाला—माझ्या हातांनींच मी आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला. विचाराच्या नादांत कोणीं नसेलसं समजून मी हवातसा बरळून गेलों! मीं मोठमोठ्यानं ऐकूं जाईलसं बडबडत होतों काय? होयसं वाटतं.—छे पण हळूच!—ह-

कूत्र कीं मोळ्यानं!--( रागानें त्यांच्या अंगावर जाऊन ) काय रे! कशाला रे आलां? काय काम आहे तुमचं इथं!

प्र०--कांहीं नाहीं बाबा.

ध०--तुम्हांला इथं येऊन फार वेळ झाला वाटतं!

अ०--नाहीं. आम्हीं किंनई अगदीं आतांच आलों.

ध०--तुमच्या कानीं कांहीं शब्द पडले काय!

प्र०--काय ते बाबा!

ध०--पडले असलेच पाहिजेत. अरे लुच्चांनो ! —

प्र०--पण कशासंबंधानं तें समजूं दे तर खरं !

ध०--कशासंबंधानं! मी कशासंबंधानं बोलत होतों—

प्र०--छेः कांहीं ऐकूं आलं नाहीं.

ध०--आलंच पाहिजे. मला माहित आहे. तुम्ही पक्के लबाड आहां.

अ०--नाहीं बरं बाबा. कांहीं ऐकूं आलं नाहीं.

ध०--तुम्हांला माझं कांहीं तरी बोलणं ऐकूं आलं असावं असं मला पक्कं वाटतं. प्रतापा, खरंच म्हणशील मी मोठ्या काळजींत पडलों आहे. ( कपाळास हात लावून आपल्याशीं ) काय करावं! या दिवसांत खर्चापुरता पैसा मिळण्याची सुद्धां मारामार झाली आहे. जानोजीरावासारखे मजजवळ दहाहजार रुपये शिल्लक असते, तर रात्रंदिवस दगदग करण्याचं तरी मला काय कारण होतं! असे विचार मनांत येऊन मी दुःख करीत होतों. इतक्यांत हीं कारटीं—

प्र०--( अहिल्येकडे पाहून ) तरी मी तुला म्हणत होतों कीं, बाबा यावेळीं विश्रांति करितां बागेंत जात असतात. म्हणून आपण यावेळीं त्यांच्याकडे जाऊन त्यांच्या विश्रांतीच्या आड येऊं नये. पण तूं कुठं चैन पडूं दिलंस! माझ्याशीं हमरी तुमरी करून मला इथं घेऊन आलीस. आतां छान बक्षिस मिळालं कीं नाहीं शिव्यांचं?

ध०--( शांत होऊन मनांत ) तर मग ह्यांनीं कांहीं माझं बोलणं ऐकिलं नसावं. ( उघड ) अरे शिव्या देऊं नको तर काय करूं? पैशाची टंचाई असल्यामुळं मी आपल्याशीं दुःख करीत बसलों होतों. तेव्हां जानोजीरावासारखे मजजवळही दहाहजार रुपये असते, तर मी केवढा भाग्यवान् झालों असतों असं म्हटलं. " दहाहजार रुपये" इतकेच शब्द जर तुम्हीं दुर्दैवानं ऐकिले असते, आणि तेवढ्या-वरच ' आपले बाबा श्रीमंत आहेत, तेव्हां आतां त्यांच्यापाशीं आप-ल्या हौसेच्या गोष्टी मागावयास कांहीं हरकत नाहीं ' असं जर वेड तुमच्या डोक्यांत शिरलं असतं, तर मला दुःखावर डाग दिल्याप्रमाणं नसतं कां झालं? असा विचार मनांत येऊन मी रागानें बोललों असेन झालं ! !

प्र०--बाबा, तुम्हीं वडील असून आम्ही पैशाच्या कामांत मन क-शाला घालावं?

ध०--अहाहा ! माझ्याजवळ दहाहजार रुपये असते तर किती चां-गलं झालं असतं ! !

प्र०--तुम्हांजवळ दहाहजार रुपये—

ध०--असते तर फारच मौज झाली असती.

प्र०--परंतु बाबा, अशा कांहीं गोष्टी आहेत कीं--

ध०--होय होय. त्यांची आपणांला विशेष उणीव आहे.

प्र०--मला वाटतं कीं—

ध०--' झांकली मूठ सव्वालाखाची ! ' अशी एक म्हण आहे. त्या म्हणीप्रमाणं माझी अमुक ऐपत आहे अशी जी लोकांत आख्या आहे तिला व त्या दहाहजार रुपयांला चांगला मेळ बसला असता.

अ०--मग बाबा तुम्हांला—

ध०--( कपाळास हात लावून ) दिवस वाईट आले आहेत असं म्हणण्याचा प्रसंगच आला नसता.

प्र०—पण तुह्मांला कोणत्याही गोष्टीची वाण नाहीं; तुम्ही चांगले ऐपतदार आहां हें साऱ्या जगाला माहीत आहे. तुम्हांला दरिद्री ह्मणेल कोण?

ध०—( छाती दडपून ) काय? मला लोक दरिद्री समजत नाहींत? आम्हीं चांगले ऐपतदार आहों असं त्यांचं मत आहे? धन्य आहे त्यांची!! अरे ते सारे निव्वळ चोर, पक्के लबाड आहेत. अशा पाजी लोकांवर तूं विश्वास तरी ठेवतोस कसा? जे कोणी अशा कंड्या पिकवितात ते पक्के बिलंदर महा पाजी लोक असतात बरं! त्या बेट्यांना व्यवहारज्ञान, शहाणपण व सत्य या गोष्टींची ओळख देखील नसते! तुला जगाचा पुरा अनुभव नाहीं ह्मणून वारंवार असं पोपटासारखं पढवावं लागतं.

अ०—बाबा, असे हो कां जेव्हां तेव्हां लोकांना वाईट ह्मणतां? त्यांनीं आपलं असं काय बरं केलं आहे!

ध०—( निराशेनें ) हा मात्र कठिण प्रसंग! प्रत्यक्ष माझ्या पोरांनीं माझं शत्रुत्व करावं यापेक्षां दुसरं आश्चर्य कोणतं?

प्र०—तुमच्यापाशीं पैसा आहे असं म्हणणं याला कां शत्रुत्व म्हणावयाचं?

ध०—अरे हो. असलीं हीं बोलणीं व हा तुझा उधळेपणा मला केव्हां भोंवेल याचा कांहीं नेम सांगवत नाहीं. अरे कारट्या, या तुझ्या कृत्यानं चोरांना देखील असं वाटेल कीं, यांच्या घरीं मुबलख पैसा आहे. व त्यांना हें एकदां समजल्यावर ते एकाद्या दिवशीं रात्रीं येऊन माझा खचित गळा कांपतील रे!!

प्र०—( त्रासानें ) काय हो बाबा मीं उधळेपणा केला?

ध०—काय? अरे हे असले उंची उंची भरजरी पोषाक घालून सजविलेल्या नंदीबैलासारखा मोठ्या दिमाखानं सर्व गांवभर हिंडतोस

तेव्हां हा नव्हे कां उथळेपणा ? कां यापेक्षां उथळेपणाला कांहीं शिंग असतात? मी काल हिला चार समजुतीच्या गोष्टी सांगत होतों; कारण, ही आतांशा फारच उथळेपणानं वागते असं मला वाटे. पण तुझी कडी तर तिच्याही वर! गाढवा, हा पोषाक विकून जर एकादी रक्कम उभारली, तर तिचं दरसाल बरंच व्याज नाहीं कां येणार? मीं तुला हजारों वेळां सांगितलं आहे कीं, हे तुझे नखरे, ही ऐट, हा थाटमाटाचा भपकीदार पोषाक, यांपैकीं मला कांहीं आवडत नाहीं. तुला असं वाटतं कीं, मी जसा काय अगदीं सार्वभौम राजाचाच पुत्र आहें! काय रे, हे असले पोषाक करावयाला तूं पैसे रे कुठले आणितोस? घरांत तर चोरी करीत नसशील?

प्र०--काय? घरांत चोरी? ती कशी?

ध०--आणि केलीस तर मला काय कळणार आहे! चोरी केल्यावांचून कां हे ऐटदार पोषाक बनवावयाला सांपडतात?

प्र०--चोरी? व ती मी करीन? छे छे; बाबा, मी चोरी न करितां पैसे मिळवितों. मी एक नवीन धंदा पतकरिला आहे. व त्यांत पैसे मिळवून—

ध०--तो रे कोणता?

प्र०--मी जुगार खेळतों. व सुदैवानं त्यांत जे पैसे मला मिळतात, त्यांतूनच हे पोषाख करितों. मग हें छान आहे कीं नाहीं?

ध०--नाहीं. हें पहा, सुदैवानं जर दोन पैसे आपल्या पदरांत पडताहेत, तर त्यापासून आपला कांहींच नफा करून घेऊं नये हा मूर्खपणा नव्हे काय? अरे तेच पैसे जर तूं व्याजानं लाविलेस, तर व्याजच्या व्याज मिळून वर मुद्दल आपलं आहेच कायम ! म्हणजे माझ्या बोलण्यांतला भावार्थ असा कीं, हा जो पोषाख तुझ्या पायांपासून तों तहत डोक्यापर्यंत कलाबतूनं भरला आहे याची काय गरज

होती बरं! हीं मखमलीचीं जाकिटं, हे किनखापाचे पायजमे नसते तर चाललं नसतं काय ? मी अगदीं पैजेनं सांगतां कीं, या सर्वांना मिळून अगदीं कमींत कमी निदान आठशें रुपये तरी पडले असतील! त्यांचं व्याज शेकडा तीन टक्के धरलंस तरी वर्षाचे पाऊणशें रुपये अगदीं घरांत बसून पदरांत पडतील कीं नाहीं ?

प्र०–( मान वेळून ) पडतील खरे !

ध०–आतां हा विषय राहूं दे बाजूला. आतां आपण दुसऱ्याच एका गोष्टीविषयीं बोलूं. ( प्रतापराव व अहिल्या एकमेकांत खुणा करितात तें पाहून आपल्याशीं ) मला वाटतं, मला लुबाडण्याबद्दल ते आपापसांत खुणा करिताहेत. ( उघड ) काय रे, आपापल्यांत खुणा रे कशाच्या करितां ?

अ०–आधीं तूंच बोल ह्मणून मी त्याला सांगत होतें. पण तो तूंच आधीं बोल असा मला आग्रह करीत होता झालं ! कारण आह्मी दोघंही तुम्हांला कांहीं सांगणार आहोंत.

ध०–व मीही तुह्मांला कांहीं विचारणार आहें.

प्र०–आह्मांला लग्नसंबंधी—

ध०–होय होय. मलाही त्याचसंबंधानं तुमच्याशीं बोलावयाचं आहे.

अ०–काय लग्नासंबंधानंच तुम्ही बोलणार?

ध०–काय ग, इतकी चपापलीसशी? लग्न शब्द उच्चारल्याबरोबर इतकी कां ग भ्यालीस?

प्र०–तुम्ही आमचीं लग्नं करणार हें ऐकून आम्हांला भीतिच वाटते. कारण, आमच्या मनांतले हेतु तुम्हांला कसे कळणार? म्हणून तुम्ही जी निवड करणार ती आमच्या पसंतीस उतरेलच असं म्हणता येत नाहीं. एवढ्याचकरतां भीति दुसरं काय?

ध०-( अमळ रागानें ) किंचित् दम खाल तर बरं पडेल. तुम्हांला भीति वाटण्याचं कांहीं एक कारण नाहीं. कोणची गोष्ट तुमच्या हिताची आहे, हें मला चांगलं कळतं. मी जें जें करीन त्यांत तुम्हांला दोष म्हणून कांहीं इतका सांपडणार नाहीं. म्हणजे तरी तुमची कुरकुर मिटेल ना? अरे ती-ती-शिरक्याच्या गणपतिसमोरच्या वाड्यांत राहते ती-मथुरा तुला माहित आहे ना?

प्र०-हो हो! आहे म्हणजे!

ध०-आणि तुला ग?

अ०-हो! आहे ऐकून माहित.

ध०-बरं, प्रतापा, तुला ती कशी काय आवडते?

प्र०-तिचं लावण्य खरोखरीच अप्रतिम आहे.

ध०-बरं, तिचा चेहरा?

प्र०-फारच मनोहर!! व तो विनय व बुद्धि यांनीं युक्त दिसतो.

ध०-तिच्या चालचालणुकीसंबंधानं तुझं कसं काय मत आहे?

प्र०-फारच उत्तम!!

ध०-तर मग शरीरसंबंध करण्यास हें स्थळ चांगलं आहे ना?

प्र०-हें काय विचारावं बाबा? फारच सुरेख!!

ध०-म्हणजे असली बायको मिळणं म्हणजे सुदैवच म्हणावयाचं असंच ना तुझं म्हणणं?

प्र०-शंकाच नाहीं.

ध०-ती पुढं मोठ्या काळजीची व काटकसर करणारी बायको निपजेल नाहीं?

प्र०-यांत काय संशय?

ध०-तर मग तिच्या नवऱ्याला तिजपासून फार सुख व समाधान होईल!!

प्र०--अलबत होईल.

ध०--परंतु त्यांत एक गोम आहे.

प्र०--ती कोणती?

ध०--आमच्या मनाप्रमाणं हुंडा मिळण्याची मारामार दिसते.

प्र०--अशी सद्गुणी स्त्री प्राप्त झाल्यावर हुंड्याला विचारतो कोण?

ध०--हें म्हणणं मात्र मला फारसं प्रशस्त वाटत नाहीं. ( आपल्याशीं ) पण यावेळीं याचं मन दुखवितां उपयोगी नाहीं. ( उघड ) एका अर्थी तूं म्हणतोस तेंही खरं. सद्गुण असल्यावर हुंड्याची काय परवा आहे? तिची वाण दुसऱ्या कोणत्याही उपायानं भरून काढितां येईल.

प्र०--यांत संशयच नाहीं.

ध०--तुझं व माझं मत यावेळीं या गोष्टींत अगदीं एक आहे हें पाहून मला फार संतोष झाला. अरे, ती इतकी सुंदर आहे कीं, तिच्या सौंदर्यानं माझं अंतःकरण अगदीं वेधून टाकिलं आहे. जर कांहीं थोडा बहुत हुंडा मिळेल तर मीं तिच्याशीं विवाह करण्याचा निश्चय केला आहे.

प्र०--( चपापून ) काय म्हणतां बाबासाहेब ?

ध०--( डौलानें ) तिच्याशीं लग्न लावण्याचा—

प्र०--निश्चय केला आहे म्हणतां ?

ध०--होय होय.

प्र०--कोणीं ? तुम्हीं ! तुम्हीं स्वतः!

ध०--होय. मीं मीं ! मीं स्वतः ! असे रे काय वेडेवांकडे प्रश्न विचारतोस ?

प्र०--छे छे ! ! काय हा प्रसंग ! माझं डोकं यावेळीं कसं अगदीं फिरून गेलं आहे. अंमळ बाहेर जाऊन तें शांत केलंच पाहिजे. ( जातो.

ध०–छेः त्यापासून कांहीं व्हावयाचं नाहीं. हें बघ,—अरे ए— एक घोटभर थंड पाणी पी व घटकाभर आडवा हो. ह्मणजे तुला अंमळ बरं वाटेल. थंड पाणीच पी हं! नाहीं तर सरबतं न् चिरबतं करीत बसशील! (अहिल्येस) पाहिलास ना सर्व आयुष्य चैनींत घालविल्यानं हा कसा परिणाम होतो तो! कधीं श्रम करावयाचे नाहींत. नेहमीं जुगार खेळ, त्यांत मिळविलेले पैसे खाण्यापिण्यांत उडीव; हे यांचे व्यवसाय. असं केल्यानं या गाढवांचीं मस्तकं अशीं क्षुल्लक गोष्टींनीं फिरतात यांत नवल काय! बरं चल. आपण जाऊन त्याची प्रकृति कशी काय आहे ती पाहूं. नंतर तुलाही मी कांहीं सांगणार आहे. चल घरांत. ( जातात. )

## प्रवेश ४ था.

स्थळ—धनाजीरावाच्या घरापुढील रस्ता.

( प्रतापराव प्रवेश करितो. )

प्र०–( आपल्याशीं ) काय करावं या आमच्या बाबांच्या स्वभावाला? यांना खचित चळ लागला आहे. एवढं वय झालं तरी अद्यापि हे ढंग सुटत नाहीत याला काय ह्मणावं? काय ह्मणे " तिच्या सौंदर्यानं माझं अंतःकरण अगदीं वेधून टाकिलं आहे!! " असलं अमूल्य रत्न या थेरड्या कोंबड्याच्या हातीं पडेल तर, परमेश्वरा, तुझ्या घरचा न्यायच नाहींसा झाला असं मी ह्मणेन. हाय हाय! देवा!! असलीं माणसं जगांत उत्पन्न न होतील किंवा जन्मतांच मरतील तर फार चांगलं होईल! माणसं कसलीं हीं? प्रत्यक्ष राक्षस देखील हीं निंद्य कृत्यं ऐकून कानांत बोटं घालतील! एवढ्या वयांत लग्नाची हांव अं! व तें तरी कोणाबरोबर! जी आपल्याला मुलगी किंवा नात सुद्धां शोभेल अशा सुकुमार लहान मुलीबरोबर!!---अ-

सल्या लोकांना बाप ह्मणण्याची देखील लाज वाटेत. वृद्धहो, असे चळ लागल्यासारखे भकून त्या गरीब गाईंना नका वैधव्य पंकांत रुतवून टाकूं !—अरेरे ! लग्न करून घेण्याकरितां असले लोक जीं कारण दाखवितात तीं तरी किती क्षुल्लक असतात पहा ! कोणी ह्मणतात आह्मी औरस संततीकरितां लग्न करणार; कोणी ह्मणतात आह्मी अग्निहोत्र चालविण्यासाठीं करणार; व कोणी तर केवळ प्रापंचिक सुखासाठीं—त्याला सुख ह्मणतां येईल किं नाहीं याची शंकाच वाटते.—आम्ही करणार असं म्हणतात. हे शेवटच्या वर्गांतील लोक तर केवळ अधमाधम होत. बाबांनो, आपल्यावरून जग ओळखीत जा. तुम्हांला जशी नवयौवना वधूची आवड, तशीच त्यांनाही तरुण पुरुषांची आवड नसावी असं अनुमान तरी कसं करितां ! व अशा आवडी निवडीच्या प्रकारामुळं लग्न झाल्यानंतर स्त्रियांचं जर वांकडं पाऊल पडलं, तर मग त्यांच्यावर दोषांचं खापर कां फोडितां ! आपल्या क्षणिक सुखाकरितां दुसऱ्याचं सर्वस्वी वाटोळं करावयाचं हा कोठला न्याय ? बापहो, अजून तरी सावध व्हा ! व असला दुष्ट विचार सोडून द्या. आमच्यांत अशा आणखी किती एक दुष्ट चाली आहेत, कीं त्यांच्या योगानं आमच्या समाजाचं फार फार अहित झालं आहे. म्हातारपणीं लग्न ही चालसुद्धां त्यांपैकीच असून फार घातुक आहे. (किंचित् थांबून) माझा स्वभाव इतका भोळा कसा याचंच मला राहून राहून फार आश्चर्य वाटतं. ज्यानं उठावं त्यानं मला फसवावं हा काय चमत्कार ! मग्रांच पहाना. बाबांनीं मला अनेक प्रश्न विचारिले. ते विचारण्यांत त्यांचा हेतु काय आहे, हें समजल्यावाचून मी आपला त्यांना अनुकूल उत्तरं पटापट देत गेलों. त्यांचा आंतला कावा मला काय माहित ! असो. एकदां फसलों तो फसलों. पुन: आतां कानाला खडा. याउप्पर त्यांच्या देखत तिची

स्तुति म्हणून करावयाची नाहीं हाच निश्चय. निंदा होईल तितकी निंदा करून ती त्यांच्या मनांतून उतरेल असं करावयाचं. आतां तिच्या आईकडे जाऊन तिचं मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मी रूढीविरुद्ध वागतों ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. तथापि यावेळीं रूढीकडे लक्ष देतां कामा नये. हातापायांच्या नाड्या आंखडल्या तरी कडू औषध घ्यावयाचं नाहीं हा मूर्खपणा कोठला ? या कामांत लोक मला निर्लज्ज म्हणतील तर खुशाल म्हणोत. हा निर्लज्जतेचा दोष मी पुढं दुसऱ्या एखाद्या कामांत विनयातिशयानं घालवून टाकीन. (जातो.)

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ--धनाजीरावाचा मोडका दिवाणखाना.

( **धनाजीराव** व **अहिल्या** प्रवेश करितात. )

**ध०**--ऐले, मीं जो निश्चय केला आहे तो कधींही ढळावयाचा नाहीं. मी मथुरेशीं लग्न लावणारच. आतां प्रतापाविषयीं म्हणशील तर मीं त्याला एक मुलगी पाहून ठेवली आहे. आज सकाळींच हुंडा व मुहूर्त देखील ठरवून आलों आहें. मुलगी पण अशी आहे कीं यंव् ! तुझ्यापेक्षां देखील कांकणभर चढच ! आतां तुझंही लग्न करावयाचंच ! तुला मी आनंदरावांना-- ते आपल्या घरीं परवां नव्हते कां आले? तेच ते--त्यांनाच देणार.

**अ०**--( खेदानें ) काय बाबा, तुम्ही म्हणतां तरी काय?

**ध०**--काय म्हणजे? मी तुला आनंदरावांना देणार. आनंदराव फार शहाणे व दूरदर्शी आहेत. त्यांचं वयही कांहीं फार नाहीं. नुक्ती साठी उलटली आहे इतकंच. त्यांच्या घरांत संपत्ति इतकी आहे कीं लोक त्यांना नवकोट नारायण म्हणतात. बरं, इतकंही असून **मितव्ययी** जबरदस्त ! !

अ०—बाबा, तुम्हींच लग्नाची गोष्ट काढली म्हणून बोलतें. मला मुळीं लग्नच करून घ्यावंसं वाटत नाहीं. तशांतून करायचंच झालं तर अशा पुरुषाशीं मुळींच करणं नाहीं.

ध०—( तिला वेडावून ) मला म्हणे मुळीं लग्नच करायचं नाहीं. मी तुझं लग्न केल्याशिवाय कधीं सोडणार नाहीं.

अ०—मी तुम्हांला साफ सांगतें कीं, मला मुळीं लग्नच करायचं नाहीं.

ध०—मीही तुला साफ सांगतों कीं, मी तुझं लग्न करणार.

अ०—बाबा, तुम्हीं माझा छळ कां करणार ?

ध०—पोरी, तूं मला त्रास कां देणार ?

अ०—हें पहा, आनंदराव अगदीं शहाणे आहेत. मी कुठं नाहीं म्हणतें ! पण ते मला तुमच्यासारखेच पूज्य आहेत. पण मी नाहीं बाई त्यांच्याशीं लग्न लावून घेणार !

ध०—मी तुझं लग्न त्यांच्याशींच लावणार. व तेंही आठ पंधरा दिवसांत.

अ०—काय इतक्या लवकर ?

ध०—हो हो, इतक्या लवकर.

अ०—हें तर कधीं कधीं व्हायचं नाहीं.

ध०—तें तर होणारच बरं !

अ०—मी नाहीं बाई !

ध०—आपण करणार बोआ !

अ०—बाबा, कां मला उगीच त्रास देतां ! मी एकदां नाहीं म्हणून सांगितलंना ?

ध०—पण मीहीं एकदांच करायचं म्हणून सांगितलंना ?

अ०—बाबा, तुम्ही माझ्यावर जुलूम करून का लग्न लावणार ?

ध०—तूं ऐकत नाहींस म्हणून जुलमानंच लाविलं पाहिजे.

अ०—बाबा, ते केवढे नी मी केवढी ! अशा थेरड्या बरोबर का मी माग जन्म काढावयाचा ! अशा बरोबर लग्न करण्यापेक्षां मी विहिरींत उडी घेईन.

ध०—पण मी तुला तसं करूं देईन तेव्हांना ? त्या दिवशीं संध्याकाळीं गोरज मुहुर्तावर तुझं आनंदरावाशीं लग्न लागणार. त्यानं दोन्हीकडील व्यवस्था पहाण्याचं कबूल केलं आहे. म्हणून आम्हांला कांहींच तयारी करावयाला नको आहे. पण कायग, तूं हल्लीं अगदीं बेलगाम बोलूं लागली आहेस ? असा उद्धटपणा तुला कोणीं ग शिकविला ? शेजारच्याच मुली पहा बरं ! त्यांतली एक तरी आपल्या बापाला असे उलट जबाब कधीं देते कां ? तुला भीड मर्यादा कांहीं आहे कीं नाहीं !

अ०—त्यांच्या बापांनीं तरी त्यांचीं लग्नं अशा थेरड्यांशीं लाविलीं आहेत कां !

ध०—तें जाऊं दे. हें पहा, हें लग्न तर जुळलंच आहे. आनंदरावाच्या स्थळाला नांव ठेवावयाला बिलकुल जागा नाहीं. व हें स्थळ प्रत्येक मनुष्य पसंत करील अशी माझी खात्री आहे.

अ०—हो बिनअकलेचा मनुष्य असेल किंवा तो मात्र पसंत करील.

ध०—( विश्वासराव येतो आहे असें पाहून ) हा पहा विश्वासराव इकडेच येत आहे. त्याला निवाडा करून या गोष्टीचा निकाल करावयास सांगूं कां ?

अ०—हं. मी आहे कबूल. पहा हे काय मग फिरतील ! !

ध०—पण तो सांगेल त्याप्रमाणं तुलाही वागलं पाहिजे. वागशील ना?

अ०—हो! अगदीं वागेन त्यां जें आवडेल, तें मी खुशीनं करीन.

[ विश्वासराव येतो. ]

ध०—ये. विश्वासराव, तूं या कामांत तिऱ्हाईत या नात्यानं सांग बरं कीं माझं ह्मणणं बरोबर आहे कीं या द्वाड कारटीचं ह्मणणं बरोबर आहे?

वि०—तुमचंच ह्मणणं बरोबर आहे दादासाहेब.

ध०—अरे पण आह्मी कशाबद्दल व काय बोलत होतों याची तुला कल्पना तरी आहे काय?

वि०—नाहीं खरी. तरी पण आपलं ह्मणणं कधींही चुकीचं असणार नाहीं हें मी खात्रीनं सांगतो. कारण आपण मूर्तिमंत सद्विचारच आहांत!

ध०—हें पहा. लवकरच तिचा एका सुशील व श्रीमंत मनुष्याबरोबर विवाह करून द्यावा. असा मी निश्चय केला आहे. आणि ही कारटी तर साफ ह्मणते कीं मी कांहीं त्याच्याशीं लग्न लावणार नाहीं. आतां यावर तुझं काय ह्मणणं आहे सांग.

वि०—माझं ह्मणणं!

ध०—हो. तुला योग्य वाटेल तें सांग. अगदीं भीड धरूं नकोस.

वि०—आपण जो विचार केला आहे त्यांत कांहीं इतकं दुर्लक्ष

चावेग हिंमत नाहीं. परंतु तिनें जो हट्ट धरला आहे तो तरी अगदींच निष्कारण असेल असें नाहीं मला वाटत. व—

ध०—निष्कारण यांत काय संशय? अरे, आनंदरावासारखं स्थळ शोधूं गेलं असतां जन्मांतरींही मिळावयाचं नाहीं. खानदानीचा गृहस्थ! थोर कुलाचा, चांगल्या शीलाचा, साध्या चालीचा व तशांत जवळ बरीच माया असलेला!! इतकंही असून प्रथम संबंधानं पोरवाळ कांहीं नाहीं. मग किती जरी पुण्याई खर्च केली तरी हिला याच्या पेक्षा दुसरं चांगलं स्थळ मिळेल का तूंच सांग.

वि०—छे:! उगीच अशीं स्थळं काय वाटेवर पडलीं आहेत?

अ०—(आपल्याशीं) अगबाई, इकडून सुद्धां असलंच कां भाषण?

वि०—(धनाजीरावांच्या जवळ जाऊन हळूच) दादासाहेब, हल्लींच्या काळची रीत ह्मटली तर मनाला जें स्थळ पसंत पडेल तेंच कायम करून मुलां मुलींचीं आईबापांनीं लग्नं करावीं. परंतु या पासून परिणाम वाईट होतात हें जाणून लोकाचारास न अनुसरतां, आपण त्यांच्या संमतीनं लग्न करावयाचा जो विचार केला आहे, तो फारच प्रशंसनीय आहे. परंतु तुमचं स्थळ तिला पसंत नाहीं तर तिला आवडेल असं करण्याचा प्रयत्न आपल्याला केला पाहिजे. व त्यांत अनेक युक्तिप्रयुक्ति लढविल्या पाहिजेत. असं केल्यावांचून जो हा अट्टाहास करावयाचा आपण बेत केला आहे, तो मात्र माझ्या बुद्धीनं अमळ उतावीळपणाचा दिसतो. अहो मुलीची जात! स्वभाव अल्लड व अंगांत पोक्तपणाचा अभाव! तिला विनाकारण दुखवून संकटांत कां घालितां? या गोष्टीचा तिला विसर पडूं दे. मग मास, पंधरवड्यानं तिचं मन वळवून काय हवं तें करा. बाई करणारच भलतंच होईल ह्मणून सांगतों.

ध०—याई एवढ्याच करितां कीं हें स्थळ हातांतून जाऊं देतां उपयोगी नाहीं. आनंदरावाशीं संबंध जोडण्यांत मला असा एक फायदा होणार आहे कीं तसा दुसऱ्या कोणापासूनही मुळींच व्हावयाचा नाहीं.

वि०—तो कोणता ?

**ध०—तो हुंडा मुळींच मागत नाहीं.**

अ०—( आपल्याशीं ) जळ्ळा तो हुंडा !

वि०—काय हुंड्यावांचून हें होणार ?

ध०—एक पै सुद्धां घेणार नाहीं म्हणतो.

वि०—तर मग होईल तितक्या त्वरेनं हें कार्य साधून घेणं अगदीं अवश्य आहे. व हीं जर शांतपणानं विचार करील तर तिलाही ही गोष्ट मान्य होईलच होईल

ध०—कारण, यांत माझा बराच खर्च वांचेल.

वि०—खरंच तं. आतां कांकूं करण्यास जागाच नाहीं.—लग्न ही कांहीं थट्टा नव्हे दादासाहेब ! एकदां कन्यादान झालं कीं झालंच. पुन: म्हणून तें परतावयाचं नाहीं. याचा आधींच पूर्ण विचार करावा हें चांगलं. एकदां लग्न झालं कीं पडल्याच उभयतांच्या जन्माच्या गांठी ! म्हणून पूर्ण विचार केल्यावांचून कोणीही लग्नाच्या भरीस पडूं नये, असं म्हणावयाला निराळा जागा आहे.

ध०—अरे पण तो हुंडा घेत नाहीं म्हणतोना ?

वि०—ती गोष्ट मनांत आणली तर मी अगदीं निरुत्तर होतों. परंतु वधूवरांच्या वयामध्यें जेव्हां फार अंतर असतं, आणि त्यांचे

स्वभाव व आचारविचार फार भिन्न असतात, तेव्हां त्यांना प्रपंच हजार वाटेनं सुखदायक व्हावयाचा नाहीं असं सांगून या लग्नाबद्दल तुमची तोंडावर निंदा करणारेही पुष्कळ लोक आढळतील.

ध०—परंतु हें विनहुंड्याचं कार्य हें ह्या मनदवांनीं लक्षांत नको का घ्यावयाला ?

वि०—खरोखर दादासाहेब, विन हुंड्याचं कार्य आहे असं समज-ल्यावर तें तावडतोब उरकून घ्यावं असंच सर्वजण ह्मणतील. पैशा इतक्या महत्वाची दुसरी कोणती गोष्ट या जगांत आहे ? एक कवि ह्मणतो, " **अर्थप्राप्ति असो निरंतर मला त्यावीण हें बापुडें ॥** "

ध०—(आनंदानं) वाहवा ! भले बहाद्दर ! ! फारच शानदार आहे बोआ चरण हा !

वि०—परंतु पैशाकडे दृष्टि देऊन प्रत्यक्ष पोटच्या पोरीच्या ज-न्माचं मातेरं करणारे बाप मात्र या जगांत विरळा.

ध०—अरे पण हुंडा एक पै सुद्धां नाहीं हें लक्षांत घेऊन बोल.

वि०—खरंच हुंडा एक पै सुद्धां नाहीं. आणि मुळींच हुंडा नस-ल्यावर बाकींच्या गोष्टींचा विचार करण्याची अवश्यकताही नाहीं.।

ध०—( कानोसा घेऊन ) अरे, कुत्र्याचं भुंकणं ऐकूं येतं. कोणी माझ्या पैशाच्या संधानावर तर नाहींना ? छे: पाहिलंच पाहिजे. ( त्यांस ) जरा थांबा. मी जाऊन इतक्यांत परत येतों. ( जातो )

अ०—( विश्वासरावाच्या कमरेस मिठी मारून ) एवढा वेळनं हें आपलं सारं बोलणं मनापासून का होतं ?

वि०—( तिची हनुवटी धरून ) छे छे अग. त्यांचं मन उगीच

काय ह्मणून दुखवा ? आपला बेत सिद्धीस नेण्याकरितां मला असं बोललंच पाहिजे. त्यांच्या मना विरुद्ध वागून आपला मनोरथ सिद्धीला जाईल का ? असे कांहीं लोक असतात, कीं त्यांना सरळ उपायांनीं वळवितांच येत नाहीं. जेव्हां असे आडवे तिडवे मार्ग दाखवावे तेव्हांच ते ताळ्यावर येतात. व—

**अ०**—ते सारं खरं; पण बाबांनी हें लग्नाचं ठरविलं आहे याला काय करायचं ?

**वि०**—हें मोडण्याला कांहीं तरी युक्ति लढवूं ह्मणजे झालं !

**अ०**—पण बाबा तर चार आठ दिवसांतच लग्न करावयाला तयार झाले आहेत. मग त्याच्या आंत कोणची बाई युक्ति लढविणार ?

**वि०**—तापाबिपाचं कांहींतरी सोंग करून लग्नाचा बेत जरा लांबणीवर टाकावयाला सांग कीं !

**अ०**—पण त्यांनीं जर वैद्याला बोलावलं तर मग कसं होईल ?

**वि०**—वेडी आहेस तूं. हें पहा, तूं पोटांत दुखतं असं सांग. वैद्य नव्हे प्रत्यक्ष त्याचा बाप जरी स्वर्गांतून खालीं उतरला तरी त्याला त्यातलं कांहीं कळणार नाहीं. भिऊं नकोस. जरा रड; इकडे तिकडे लोळ; बतावणी करण्यांत मात्र चुकूं नकोस. पोटांत दुखणं व कपाळ उठणं हे दोन रोग वैद्यनिदानाच्या अगदीं बाहेर आहेत. त्यांना त्यांतली मातीसुद्धां समजत नाहीं. पूर्वीं शाळेंत जावयाचा कंटाळा आला कीं मीसुद्धां अशींच ढोंगं करीत असे.

(धनाजीराव येतो.)

**ध०**—कांहीं नाहीं. जिथल्यातिथं सर्व यथास्थित आहे. ईश्वराचीच कृपा ! ! !

वि०—( धनाजीराव आला आहे हें न समजतां ) सरतेशेवटीं तुला आतां एवढेंच सांगतों कीं या अरिष्टांतून मुक्त होण्याला पळून जावयाचें एवढाच काय तो उपाय राहिला आहे. व जर तुझें मजवर अत्यंत प्रेम— ( धनाजीरावास पाहून अहिल्येपासून दूर होऊन ) हो होय. मुलीचें बापावर प्रेम असलेंच पाहिजे व तिनें त्याचें ऐकलेंच पाहिजे. जो नवरा बापानें योजिला असेल त्याशींच तिनें वरावें. "तो असाच आहे." "तो तसाच आहे" म्हणून उगीच रडगाणें गाऊं नये. त्यांतून हुंड्यावांचून जर कार्य असेल तर कसलाही नवरा असला तरी तिनें तो मान्य केलाच पाहिजे.

ध०—शाबास विश्वासराव! लाख गोष्टींतली गोष्ट बोललास.

वि०—( एकीकडे ) दादासाहेब, आपण सांगत असाल तर मी जाऊन माझा शिल्लक राहिलेला उपदेश पुरा करून घेतों.

ध०—वा:! यांत तर मला आनंदच आहे. मीच तिला तुझ्या ताब्यांत देतों. ( ती जाते असें पाहून ) जा कारटे, तूं हवी तिकडे जा. विश्वासरावच तुला ताळ्यावर आणील. तोच समर्थ आहे असें करावयाला.

वि०—आपण अगदीं स्वस्थ रहा. मी सर्व कांहीं तुमच्या मनासारखें जुळवून आणतों. जातों व तिला दोन गोष्टी सांगून पहातों.

ध०—जा तर मग लवकर. करच एवढें. तुझे मजवर फार उपकार होतील.

वि०—तिच्यावर चांगलीच नजर ठेविली पाहिजे.

ध०—होय होय. व तूंच—

वि०-अगदीं भिऊं नका. मी तिची अगदीं चांगली खात्री करून देईन.

ध०-जा तर लवकर. मीही बाहेर जाऊन लवकरच परत येतों.

वि०-( अहिल्येस उद्देशून ) अग, जगांत पैसा ही सर्वांत अमूल्य व मोठी चीज आहे. इच्या पेक्षां दुसरं कांहीं नाहीं. धनाजीरावांसारखे तुझे वडील! अशा बापापोटीं जन्म दिल्याबद्दल तूं आनंदानं ईश्वराचे आभार मानावेत. जगांत दिवस कसे काढावे हें त्यांना चांगलं कळतं. जेव्हां हुंड्यावांचून एकादं स्थळ मिळतं, तेव्हां इतर सर्व कुरकुरी बाजूला ठेवाव्या लागतात. पैशांत सर्व गोष्टी येतात. एकादा वर सुंदर, तरुण, कुलीन, सन्मान्य, हुषार, शहाणा व प्रामाणिक असून जर तो हुंडा घेत असला तर तो काय कामाचा? जो हुंडा घेत नाहीं तोच उत्तम, सच्चा व त्याच्याच अंगांत वरील सर्व गुण आहेत असं समजावं. ( असं म्हणत जातो. )

ध०-काय प्रामाणिक मनुष्य आहे हा! कसा बृहस्पती सारखा भाषण करितो. ज्याच्या पदरीं असा चाकर असेल तो खरोखरच धन्य!! ( जातो. )

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ–रस्ता.

( सीतारामपंत दुकानांत खुर्चीवर बसला आहे. )

सी०–( आपल्याशीं ) कोणी ह्मणतात कोणचेंही काम सिद्धीस जावयास किंवा आपले मनोरथ पूर्ण व्हावयास उद्योग हा श्रेष्ठ होय. व कोणी नशिबास श्रेष्ठत्व देऊन त्याच्यावरच हवाला ठेवून बसतात. पण माझ्या मतें हे दोन्ही प्रकारचे मार्ग पृथक् पृथक् पहातां अगदीं गौण आहेत. कारण, पहा, घिसाडी, लोहार, मजुरदार इत्यादि लोक दिवसभर किती उद्योग करितात ! व त्यांच्या उद्योगामुळं लक्ष्मीची त्यांच्यावर किती कृपादृष्टि असावयास पाहिजे होती. पण नाहीं. एकाद्या आळशी, निरुद्योगी आयदोजीच्या हातीं एकादे वेळेस नशिबानं सहज डबोलं सांपडून तो धनवान् बनतो. या सर्व गोष्टींवरून माझं तर मत ठाम झालं आहे कीं जर एकाद्याला आपले मनोरथ पूर्ण व्हावेसे वाटत असतील तर त्याला उद्योग व दैव या दोन्ही गोष्टींची अनुकुलता पाहिजे. मनुष्यानं उद्योग करून मग पाहिजे तर दैवावर हवाला ठेवावा. उद्योगावांचून दैव अगदीं पंगु आहे. त्या एकट्याच्यानं कांहीं व्हार नाहीं. माझंच उदाहरण पहाना ? मी आजपर्यंत कृष्णपट्टणांत कृष्णचंद शेटीच्या पेढीवर कारकून होतों. पगार अवघा बारा

रुपये. घरीं पोराबाळांचा रगाडा! कुटुंब मोठें! त्यांतून शहराची वस्ती!! बारा रुपड्यांत निर्वाह व्हावा कसा? पगार वाढण्याची तर आशा नाहीं. ह्मणून ती नोकरी सोडून देऊन या शहराला आलों. येतांना आमच्या वडिलांच्या परिचयाचे उमीचंद ह्मणून एक सावकार होते, त्यांचं येथील धनाजीरावांना एक पत्र घेतलं. इथं आल्यावर बिऱ्हाड; दुकान वगैरेची सोय लावून काल सायंकाळीं तें पत्र पटवावं ह्मणून निघालों. वाटेंत देवदर्शन घेतलं. व देवळाच्या सभोंवतालचा बाग रमणीय दिसला ह्मणून इतर नागरिकांप्रमाणं मीही हवा घेत बसलों. व तेथें बसलेल्या एका गृहस्थाला विचारलं कीं, “ धनाजीराव ह्मणून गृहस्थ आहेत ते कोठें रहातात हो? ” काय नशिबाचा खेळ सांगावा! मी ज्या गृहस्थास हा प्रश्न विचारला, तेच गृहस्थ धनाजीराव होते. व यांनाच उमीचंद शेटजींनीं मला अशा अशा तऱ्हेची मदत करावी ह्मणून पत्र दिलं होतं. धनाजीरावांच्या संबंधानं मला प्रत्यक्ष कांहींच माहिती नव्हती. पण उमीचंदांच्या पेढीवरील माझ्या एका मित्रानं मला त्यांची इत्थंभूत माहिती सांगितली. त्यांतच त्यानं असंही सांगितलं कीं, धनाजीराव उमीचंदाला पुढं करून त्यांच्यामार्फत आपला व्याजबट्ट्याचा व्यापार चालवीत असतात. व आपलं नांव कांहीं बाहेर फुटूं देत नाहींत. आणि येथल्या स्थितिवरून तें सारं खरं असेल असं मला वाटतं. धनाजीराव श्रीमंत असून कृपण आहेत. ह्मणून मजवर त्यांचा विश्वास एकाएकीं मुळींच बसला नसता. परंतु उमीचंद शेटजींच्या पत्रानं ती बाजू तर निभावली. सध्यां त्याचा मजवर इतका विश्वास बसला आहे कीं, ते मला हवे तेव्हां हवे तितके रुपये देण्यास तयार आहेत. असो; येथपर्यंत

तर आमच्या नशिबानं घांव ठीक मारिली. आतां पुढं कसं होतं पाहिलं पाहिजे.

( संभ्या प्रवेश करितो. )

**सं०**—( आपल्याशीं ) काय धनीसाबास्नी याड लागलंया बगा ! आतां ह्यनं ह्ये करज काढूनशान त्या फटाकडीबरुबर लगीन लावनार आन् संसार करनार ! ह्ये असं करूनशेनी त्येस्नी काय सुख व्हनार त्ये वरच दिसतंया. करजापायीं मायंदाळ लोक अक्शी बुडाल; त्येंच्या पोराबाळांचं वाटुळं झालं, आन् घरादारावरबी नांगुर फिरला. आन् ह्ये समदं डोळ्यानं बघूनबी आमच धनीसाब सावध व्हईनात, तवा ह्यो येडाचाच झटका न्हव काय? म्यां-बी मायंदाळ सांगूनशेनी बगितलं, पन ऐकनार कोन ? उलट चार शिव्या मातुर खाल्या. शिव्या देऊन कसं ह्मयात, "संभ्या, लेका जा, आन् त्यो शिरपतराव दलाल मह्मा येक पंदरा हजार रुपई कुठन तरी करज काढून देतुया कां इचार. हो ह्मोरं. तवर मींबी बाजारांत येतु. मी येइपतर कुठंबी जाऊं नगस." बरं हाय. आपलं काय जातंया ? त्येंच आन्न खातुया, तवा त्येंची चाकरी कराया होवी. चला तर आतां शिरपतराव दलालाच्या दुकानाकड जाउ. ( अमळ फिरून ) अर पन ह्येच त्येचं दुकान. पन त्यो कुठं हाय ? आन ह्यो नवा गिरस्त कोन हतं हाय ? चार दिसांखालीं त्यो हतं व्हता ह्ये मला पक्कं ठावं हाय. आन मंग इत्क्यामंदीच काय भूतचेष्टा झाली कां काय ? बरं, इचारून तर बगूंया. कोन है व त्ये ?

**सी०**—कोण रे बाबा तूं ?

**सं०**—मी हाय असाच येक मानूस. धन्याचं खातुया आन त्ये-

ची पडली चाकरी करून गांवामंदी खुशाल हिंडतुया. माझं नांव संबाजीराव. पन तुमी हतं कोन व ? आन शिरपतराव कुठं गेला ?

सी०—त्यांना हें बिऱ्हाड सोडून चार दिवस झाले. त्यांनीं आतां मोतीचौकांत बिऱ्हाड घेतलं आहे. त्यांच्याशीं तुझं कांहीं काम आहे वाटतं.

सं०—हाय आपलं वाइज असंच काय तरी. पन तुमी—

सी—मी अगदीं अपरिचितच आहें. मला येऊन पांच दिवस झाले. मीही श्रीपतरावासारखाच एक दलाल आहें. व तुझं जर कांहीं दलालीचं काम असले, तर मी तें मोठ्या खुशीनं करीन.

सं०—( एकीकडे. ) शिरपतरावापरीस ह्यें काम मला बरं दिसतया. नवा मानूस हाय. म्हनून कुठं नांव फुटायाची बी भीति न्हाई. मी ह्ये मदल्यामदींच केलं तर धनीसाब बी नग म्हनायच न्हाईत. तवा ह्येच्याकडंच ह्ये काम साधलं तर बवातं. ( उघड ) छे: दादा, त्ये काम लई कठिन हाय. न्हाई तुमास्नी निभायचं. तुमी तर अकशी नव हाय. गांवामंदी कुनाचीबी वळकपाळक नसल. आन मंग—

सी०—त्याची पंचाईत तुला कां ? सांग तर खरं काम, म्हणजे असं कांहीं वठवून देतों कीं यंव ! काय पाहिजे तुला? कांहीं घरं बिरं विकत घ्यावयाचीं आहेत कीं बागामळे पाहिजे आहेत कीं, सोन्यारुप्याचे दागिने हवे आहेत कीं, हिरे मोतीं व जवाहीर खरेदी करावयाचं आहे कीं—

सं०—फुर फुर, राव, लई झालं. ह्ये तर समदं घ्यायचं हाय. पन त्ये घ्यायाला आदुगर पैका पायजे. तवा त्यो जर कुठं करजाऊ—

सी०—असं काय ? किती रुपये पाहिजेत तुझ्या धन्याला ?

एक हजार की दोन हजार की पांच हजार की दहा हजार की पंधरा हजार की वीस हजार की पन्नास हजार–

सं०—( एकीकडे ) ह्यो ल्योक तर बेगुमान थापा मारतुया. पन पुढं काय व्हनार द्येवाला ठाव ! ( उघड ) ह्ये बगा आमांला काई इशेष नग. येक पंधराहजार फुरत.

सी०—पण काय रे, तुझ्या धन्याची इतकं कर्ज काढण्याची ऐपत तरी आहे काय ?

सं०—त्ये इचारूंबी नगा. त्येचं नांव गांव जर इचाराल तर तुमी आपसुक रुपई द्याल. त्येचा बाप लई गब्बर हाय. पन त्यो हाय लेकाचा चिकू. आई न्हाई, पन तिच्या नांवानं पेढीवर लई पैका हाय. आन त्योबी त्येच्या हातामंदी एकदोन महिन्यांतच येनार हाय.

सी०—मग कांहीं हरकत नाहीं. मी जातों व खटपट करितों. मला वाटतं ज्याच्यापासून मी रुपये आणणार तो सावकार कांहीं तरी अटी लावील गड्या !

सं०—लावूं दे कीं चिभन. आमचं धनीसाब समदं कबूल करत्याल.

सी०—बरं तर. तूं अमळ इथेंच बैस. मी जाऊन इतक्यांत परत येतों. आमचा गडी इतक्यांत येईल त्याला बैस ह्मणावं. मी माझ्या कामाला गेलों आहें. ( पोषाख करून जातो. )

सं०—बरं झालं. घरांतन भाईर पडायाला ह्योतुर चांगला लागला. ( मन्या येतो. )

म०—रामराम संभुदादा ! कसं काय हाय ?

सं०—तुला कसं वाटतंया ?

म०—मला चांगल धडधाकट दिसताया ह्मना-पन—

सं०—अर चल ! मंग काय इचारतुस ?

म०—तसं न्हवं व ! माझ्या ह्मनन्याचा अरुथ इत्काच व्हता कीं आपुन हत कंच्या कामासाठीं ऱ्हाइलां से इचारावं.

सं०—मोठा ल्योक गिन्यानी ! अरुथ न् चिरुथ ! जनू काय सास्त्र्याच्याच पोटचा ! मी हतं कंच्याबी कामाला आलों असेन ! से तुला घेऊन काय करायचं ? जा गुमान आपल्या वाटनं. पन कायर, आज बांजारामंदी लई दिमाखानं निघालायस? आज थेरड्याकडं काईबी कमजास्त हाय वाटतं ?°

म०—लई नामी हेरलं बगा. त्ये नागापट्टणचं तुळाजीराव—

सं०—हंहं ! त्यो थ्येरडा व्हय ? मंग त्येचं काय ?

म०—त्येंच दिस भरल; तवा-

सं०-अरर ! लई वंगाळ झालं ! ! बिचाऱ्याला हतं येऊनशान योक महिनाच झाला. आन इस्क्यामंदीच असा वंगाळ परसंग आला अं !

म०-तसं न्हव व. त्येंच गांवाला जायाच दिस भरल. त्ये येक महिनाभरच हतं ऱ्हानार व्हत. आन आतां महिना भरला ह्मनून दोन तीन रोजांत गांवाला जानार हैत.

सं०-असं काय ? मीच चुकलों तर. बरं पन बाजारांत जायाचं कारन ?

म०—त्येस्नी आतां लई मोठी मेजवानी करनार हायत.

सं०—( आश्चर्यानें ) अर कोन ?

म०—दादासाव !

सं०—हे: खोटं; अक्शी खोटं. लबाड, समदं लबाड.

म०—काय खोटं काय न् लबाड काय ?

सं०—काय ल्येका सांगतुयास ? दादासाब ह्मन मेजवानी करनार. अर, ह्ये समद्यां गांवामंदी एका मानसाला तरी खरं वाटल काय ? पगान जाईल ह्मातान्याचा.

म०—ह्ये खरं गा. पन तुळाजीराव त्येंच्या बायलचा भाऊ व्हय ? तवा पोळी करून घातल्याबगार सुटतया कुठं ? पन पैसा कुठला टावं हाय कां ? ह्ये बघ, तुळाजीरावानं ऐलाबाईला येक लुगडं नेशिवलं आन् परतापरास्नी येक मुंडासं बांधलं, त्येच इकून पैसं काढलं.

सं०—ह्ये मातर खरं गड्या. पन ह्ये बग. मेजवानीचा थाट कसा व्हनार ह्ये मी ह्मरलं. तुळाजीरावास्नी तेवढी पोळी; खाशा स्वारीला नाचन्याची भाकरी, घरच्या मानसांस्नी आंबील; आन तुमच्यावानी चाकरांच्या गांडीवर लाथाच लाथा ! ! प्वाटभर खाव्यात. मेजवानीसाठीं सामान आणाया निघालायास जनु ! किती कवड्या आनल्यास बघूं ? कां उधारच ?

म०—उधारच ह्मनायचं !

सं०—पन काय र, इचारतोंच तुला. दादासाव ह्मजे मुलखाचा चिकट व्हय ? आन तुमी त्येच्या घरामंदी चाकरी करितां तवा तुमास्नी येळच्या येळला पगार तरी—

म०—कुठला पगार घेऊन बसलाच राव ? न्यान्याय युक्तीनं असी

लाट मारतोंन् हूं काय ? जगन्नाथ, सोन्यान् मी निघवी एका दिलाचं आहोंत. तवां संधि साधून हं–

सं०—लई ठगेस हाय. थ्येरड्याला असंच पायजे. ( सीतारामपंत आलांस पाहून ) बरं जा तूं आतां आपल्या कामाला. मी बी जातों. ( सीतारामपंत येतो. मन्या जातो. )

सी०—हा घे अटींचा कागद. व तुझ्या धन्याला दाखीव. या अटी जर कबूल असतील तर मागितलेली रक्कम हवी तेव्हां मिळेल ह्मणावं.

सं०—बरं हाय. रामराम ( जातात. )

## प्रवेश २ रा

### स्थळ–रस्ता.

( प्रतापराव व संभ्या प्रवेश करितात. )

प्र०—कायरे ए गद्ध्या, इतकावेळ कुठं काळं केलं होतंस ? मी तुला काय सांगितलं होतं ? त्याप्रमाणं–

सं०—त्या प्रमानं मीबी अक्शी ठ्योत करून आपल्या घरामंदी उभा ऱ्हायलों व्हतों. पन आपल वडील दादासाब लई तापट बगा ! कस कुठ्यावानी वमदिशीं आंगावर आलं. आन मी जानार नव्हतों तरीबी त्येनी मला बळंनच दाराबाहेर हुसकून घातलं. आन्–

प्र०—तें तुला कोणीं विचारलं ? मला आधीं हें सांग कीं– बरं आधीं हें आमच्या वडिलांचं पुराणच कां सांगेनास ?

सं०—पुरान लई गमतीचं हाय. अडुगर मला मार मार मारलं. माझा झाडाची घेतला. आन् मंग शेवटीं घातलं दाराबाहेर नूहूं ह यः

आतां आपुन तर तुमच्या या बापलेकाच्या खटल्यामंदी कुनाच्या बालाबी पडनार न्हाई बगा. धनीसाब, दादासाब तुमास्नी एक पैबी देनार न्हाईत ह्ये लक्ष्यांत ठेवा.

प्र०—बरं! त्यांची मर्जी! ईश्वरच कोपला मग यांनीं तरी या गरीब लेंकरावर आग कां पाखडूं नये? संभ्या, कायरे हा प्रसंग? सर्वच गोष्टी कशा विपरीत होऊं लागल्या आहेत पहा. अरे, ज्या स्त्रीवर मीं नजर ठेविली आहे, तिच्याशींच आमचे बाबा लग्न करणार ह्मण.

सं०—आँ? ह्यो थेरडा कां त्या तरन्या जान फटाकडीपायीं उल्लु झालाया?

प्र०—अरे हो! व हें समजल्यापासून माझ्या मनाची फारच चमत्कारिक स्थिति होऊन गेली आहे. ती त्यांच्या दृष्टीस न येऊं देण्या विषयीं मला किती तरी सायास पडतात!

सं०—( हांसत ) हाः हाः हाः हाः ह्येची ह्या कामामंदी फटफजिती उडनार असं येतंया माज्या होन्यांत. ह्यो ह्मातारा उगाच भरांतींत पडलाया. या पिरतिमीमंदी तरनजान आनी खुपसुरत मरद काय थोडक हायती कां काय? तिला येड लागलया वाटतं असल्या मड्याच्या गळ्यामंदी माळ घालाया?

प्र०—संभ्या माझ्या हातून अन्यजन्मीं कांहीं तरीं महत्पातकं घडलीं होतीं, ह्मणूनच आमच्या बाबांच्या मनांत ही बुद्धि उत्पन्न झाली.

सं०—पन धनीसाब, तुमी तरी कशापाई गप्प बसताया? त्येस्नी शाफ सांगुन टाकलं तर काय हुतंया?

प्र०—मी साफ सांगत नाहीं याचें कारण एवढेंच कीं, मी आतां पुढें जी युक्ति लढविणार आहें, तिजबद्दल त्यांना मुळींच संशय येऊं नये. व संधि साधल्यास किंवा गरज पडल्यास कोणत्याही उपायानें त्या उभयतांच्या लग्नांत खासा बिब्बा घालतां यावा. बरं, तें असो. मी तूला श्रीपतराव दलालाकडे पाठविलं होतं त्याचं काय झालं ?

सं०—शिरपतराव गेला भीक मागत कुठं. मी येक न्याराच दलाल गांठलाय. नवाच हाय पन लई पसंत मानूस हाय बगा.

प्र०—तो काय ह्मणाला ?

सं०—त्यो काय ह्मंतुया ?—पन धनीमात्र, ज्यास्नी करज काढावं लागतंया त्येंचं परालब्ध लई वंगाळ ! ह्मनून कुनीबी सावकाराचं त्वांड बघूं नये. कसलाबी विकट परसंग आला तर त्यो गुमान सो-

प्र०—नवा दलाल ! तर आमचं काम होत नाहीं वाटतं !

सं०—व्हईल ह्मना; पन जरा येळ लागल. ह्यो दलाल लई धांदल्या दिसतुया. काईबी खटपट करून आमचं काम करून देईल. त्येनं तुमाकडचं बघून लई मनावर घेतलंया.

प्र० पण त्याच्या मार्फत आपल्याला पंधरा हजार रुपये खात्रीनं मिळतील ना ?

सं०—मिळतील ! पण सावकार काईबी अट लावील जनूं. आन मंग त्ये सारं कबूल करावं लागल.

प्र०—सावकाराचं व तुझं समक्ष बोलणं झालं आहे कां ?

सं०—त्ये कसं व्हईल ! असलीं कामं माज्यासारख्यानं समक्श

बोलून निभत्याल काय? आपुन जसं करज काढल्याची ग्वाष्ट भाईर फुटूं नये ह्मनता, तसंच सावकारानंबी ह्मनूनं हाय, कीं आपलंबी नांव कुनाला समजूं नये धनीसाब, आपनांला असलीं कामं बरनं लई मोपीं दिसत्यात पन ह्यच्या सारखीं खडतर कामं साऱ्या पिरतिमीमंदीबी गवसायचीं न्हाईत. सावकारानं नांव भाईर फुटायनं न्हाई ह्येला जर तुमीं कबूल असाल तर त्यो आज समक्ष गांठ घेईल. आन तुमी कोन, काय, ह्ये बघून तुमांला रुपये देईल. धनीसाब, मी दादासाबाचा ल्योक असं जर तुमी सांगितलं तर तुमचं काम फत्ते झालंच बगा. न्हाई झालं तर मिशी उपटून देईन व्हवं!

प्र०—पण आईच्या मृत्युपत्रावरून जी जिनगी मला येणार आहे तिजवर सावकाराचा डोळा नसो ह्मणजे झालं!!

सं०—(एक कागद काढून) ह्ये वाचून बगा यामंदी काय लिवलंया त्ये!

प्र०—काय रे हें?

सं०—त्येनं आपल्या अटी लिवल्यात जनूं. ह्यो कागद सावकारानं सिताराम दलालापाशीं दिला व्हता, कारन सावकार इक्ता चिकट हाय ह्मन कीं—दुसरा दादासाबच सांभळ! आन् ह्मनूनच आपलं नांव भाईर फुटूं नये असं त्येचं ह्मननं हाय.

प्र०—(कागद उघडून) काय रे हें? याला अक्षर ह्मणावं कीं अक्षरांचा संक्षेप ह्मणावा! असे कांहीं कुत्र्या मांजराचे पायच! मोडी लिहितां लिहितां मध्यें मध्यें बालबोध अक्षरं काय काढलीं आहेत!! वाः! हे लेखक बहुधा चित्रगुप्ताच्याच वंशातले असावेत असं वाटतं! बरं पाहूं या तर आधीं कितपत लागतं तें! (वाचतो.)

" रिणकोनें खात्रीलायख जामीन दिला पाहिजे. रिणको घराणदार व सज्ञान असावा. त्यास मालकीची स्थावर मिळकत असून ती कर्जवामांत गुंतलेली असूं नये. दस्तऐवज लिहिणार व त्यावर साक्षी घालणार हे लोक धनकोच्या खात्रीचे असावे. " यांत कांहीं वावगं नाहीं. ( वाचतो. )

" रिणकोवर व्याजाचा बोजा विशेष न पडावा ह्मणून व्याजाचा दर दरसाल दर शेंकडा ९ १/२ असावा. "

काय ९ १/२ ह्मणतो ? किती प्रामाणिक मनुष्य आहे हो हा ! ९ १/२ ह्मणजे अगदींच कमी.

सं०—त्ये बी खरंच !

प्र०–( वाचतो.) " परंतु जरूर असलेली रक्कम धनकोच्या हातांत नाहीं. आणि रिणकोची गरज भागविण्याचा तर त्याचा निश्चय असल्यामुळें तो दुसऱ्याकडून दरसाल दरशेंकडा १० रुपये प्रमाणें रक्कम कर्जी काढणार आहे; सबब रिणकोस वर लिहिलेल्या व्याजाशिवाय हें व्याज द्यावें लागेल. "

सं०—यंव् र सावकार !

प्र०—( त्रासून ) आग लागो या व्यवहाराला ! किती बिलंदर मारवाडी आहे हा ! पक्का लुच्चा आहे. शेंकडा २१ १/२ व्याज ह्मणजे काय झालं ?

सं०—माझ्या हानन्याचाबी अरुथ त्येोच. आपन या कामामंदी पडायच्या आदुगर त्येचा चांगला इचार करा.

प्र०—तं ह्मणतोस तें खरं, पण विचार करण्याची सोय कुठं

आहे ? मला तर पैशाची जरूर आहे. तेव्हां तो हाणेल तीच पूर्वदिशा !

सं०—गाजेबी हानन वायल कुठं हाय ?

प्र०—बरं पुढं काय आहे तें पाहूं. ( वाचतो. ) " पंधरा हजार रुपये रिणको मागतो, तर धनको त्याला बारा हजार रुपये रोख देईल. बाकीच्या ऐवजीं खालीं नमूद केलेल्या यादी प्रमाणें दागदागिना, कपडेलत्ते, व कांहीं किरकोळ सामान त्यास मिळेल. "

मला या सामानाचा काय उपयोग होणार ?

सं०—पन होरं वाचा धनीसाव. सामान लई उमदं हाय असं वाटतंया. मला वाटतं या ल्येकानं कुनीला गंडा तर घातला नसल ?

प्र०—( वाचतो. )

| दागिने | कपडे |
| --- | --- |
| सऱ्याची जोडी १ (झिजकी) | साधा पितांबर १ ( फाटका ) |
| भिकबाळी १ ( मोडकी ) | साधी शालजोडी १ ( ठिगळें लाविलेली ) |

**लांकडी सामान.**

छप्परपलंग १ जाळीदार व वेलबुट्टीच्या मच्छरदानी सहित. ( फक्त एक पाय मोडला आहे; बाकी मजबूत )

पराच्या गाद्यांच्या खुर्च्या ६ ( जुन्या )

सदर प्रकारचीं कोंचें २

वाटोळें मेज १ वरील उंची बनातीसह. ( बनात फाटली आहे व पाय दुरुस्त केला पाहिजे )"

( त्रासून ) आग लागो त्या सामानाला. मला हें घेऊन काय करावयाचं ? ( कागद फेंकून ) टाक तो कागद चुलींत नेऊन.

सं०–( तो उचलून ) न्हाई न्हाई धनीसाच, एवढं वाचाच. मला त्ये समदं ऐकायला होतं.

प्र०–( वाचतो. )

" झुंबर १ , हंड्या ५ ; " छेः पुरे आतां. हें वाचून माझें डोकं फिरावयाला लागलं.

सं०–आतां काय लई नसल. तेवढं संपवूनशान टाका कीं जी !

प्र०–( सुसकारा सोडून वाचतो. )

" राघूचा पिंजरा १ ( हा राघू बोलका असून करमणूक होत नसेल त्याची उत्तमप्रकारें करमणूक करीत होता. हल्लीं पेंढा भरून ठेविला आहे. )

हरणांचीं कातडीं ४ . ( सुरेख रंग देऊन मऊ सूत केलेलीं. )

तंबोरा १ ( उत्तम, फक्त तारा तुटल्या आहेत व खुंट्या गेल्या आहेत. )

खव्रूनगांचें खुराडें १ .

वाघाचें कातडं १ ( तीन हात लांब व दोन हात रुंद. )

अहाहा काय पण उमदा माल ! ! आणखी हा शेवटीं काय

" सदरीं लिहिलेल्या सर्व सामानाची वास्तविक किंमत सहा हजार आहे. परंतु धनकोनें सामान जुनें ह्मणून ती इमानें इतबारें तीनच हजार धरली आहे. " आग लागो त्याच्या इमानाला ! कसला रे हा गळकापू कसाब ! असली नीचपणाची सावकारी कधीं कोणीं ऐकिली आहे काय ! ज्या मालाची किंमत नुसती दोनशें रुपये देखील होणार नाहीं, अशा मालाची किंमत सहा हजार रुपये ह्मणून सांगतो ! इतकं जुलमाचं व्याज घ्यावयाचं तें घेऊन आणखी

तीन हजारांबद्दल माझ्या गळ्यांत हें असलें जुनं, निरुपयोगी व कमी किंमतीचं सामान अडकविणार! ( डोळे मिटून स्तब्ध राहून ) पण करावयाचं काय? "अडला नारायण गाढवाचे पाय धरी" हेंच खरं!! ज्या अर्थी प्रस्तुत आह्मांला पैशांची गरज आहे, त्या अर्थी तो ह्मणेल तें कबूल करणं भाग आहे. जाऊं दे. अशा अडचणी-च्या प्रसंगीं त्यानं आमच्या मानेवर ही सुरीच ठेविली ह्मणावयाची!

सं०—माज्या मना मंदी बोलायचं न्हाई खरं; पन न्हावत न्हाई धनीसाब! मागं त्या येड्या हैबतराव शिरक्यानं त्या + + रांडच्या नादीं लागुनशान कसं घरादाराचं वाटोळं करून घेतलं हाय का दकल? साहजारांचा कागद लिऊन देऊन तीन हजार रुपये रोख घेतलं! आन घरदार तारण लावून सा' महिन्यामंदीच सफाई बुडाला. तसलाच ध्योत तुमचाबी दिसतुया.

प्र०—अरे, तर मग करूं तरी काय ह्मणतोस? ज्यांचे बाप अति कृपण असतात त्या तरुण मुलांची हीच दशा बरं! पण चमत्कार हा कीं "अशा बापाला मरण आलें तर बरें" असें ह्मणणारा जर मुलगा निपजला तर लोक त्याच्या तोंडांत शेण भरून त्याला मूर्ख ठरवावयाला तयारच!!

सं०—( मनांत ) ज्यास्नी मुलांकडं चांगलं ह्मनून घ्यावंसं वाटत असल, त्येनी आपल्या पोरास्नीं गोडीगुलाबीनं वागवावं ह्ये लई नामीं. न्हाई तर अशा शिव्या कंदी ना कंदी मिळायच्याच. ( उघड ) धनीसाब, तुमच्या दादासाबांचा दोडपना आनी चिकटपना बगूनशान अक्शी साधू जरी असला तरी त्येचंबी माथं फिरूनशान जाईल. धनीसाब, तुमास्नी मी येक गुपित सांगून ठेवतों. वंगाळ काम केलं ह्मंजी तुरुंगांत जावं लागनार ह्ये मला ठाव हाय खरं.

पन-देवाच्यान बगा - दादासाब मला सदानूकदा चोर ह्मनत असत्यात. तवा एकांद गावला तसाच त्येस्नी हात दावायचं माझ्या मनामंदी हाय. दादासाबांच्या हतं चोरी केली तर मला पाप लागायचं तर न्हाइच; पन उल्ट पुन्यच लागल !

प्र०-बरं! आण ती यादी इकडे पाहूं! आणखी एकदां वाचली पाहिजे. ( यादी घेऊन जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ— धनार्जीरावांचा सोपा.

[ धनार्जीराव कागदपत्र पहात बसलेले आहेत असे येतात ]

ध०—( कांहीं वेळानें ) पांच नी सात बारा; बाराशीं दोन; हातचा आला एक; एक एक एक; एक नी दोन तीन; तीन नी पांच आठ; आठ आठ आठ; आठ नी तीन अक्रा; अक्राशीं एक; हातचा आला एक; एक नी चार पांच ; पांचांशीं पांच; आणि चौतीसाशीं चौतीस. ( पुनः एकदां तपासून ) अबबब ! ! केवढी तरी रक्कम यंदां बाहेर आहे ही ! ! चौतीस हजार पांचशें बारा. आणखी आजच तो सित्या पंधरा हजारांच्या कुळाचं काय ह्मणणं आहे, तें सांगायला येणार आहे. येऊं दे शिचा ! हो. आपण सावकार गडी ! पोटापुरतं व्याज मिळालं कीं पंधरा हजारांचं कुळ येवो कीं पन्नास हजारांचं येवो, त्याची काय परवा आहे ? ( सीता-

राम येतोसा पाहून गडबडीनें दप्तर गुंडाळून गादी खालीं ठेवितो. ) व सीताराम बेस.

सी०—( बसून ) दादासाहेब, मीं सर्व चौकशी केली. प्रस्तुत आपल्याजवळ जो पैसा मागतो आहे, तो एक तरुण मनुष्य आहे. त्याला पैशाची अशी नड आहे कीं कितीही व्याज मागितलं तरी तो तें मुकाट्यानं देईल. आणि ह्मणूनच त्यानं तुमच्या सर्व अटी कबूल केल्या आहेत.

ध०—पण कायरे, ह्यांत कांहीं अस्मानी सुलतानी नाहीं ना व्हावयाची? रिणकोचं नांव, गांव, ऐपत वगैरे गोष्टींचा तूं चांगला तपास केला आहेस ना?

सी०—तो चांगला संपन्न आहे. त्याची आई नुकतीच वारली आहे. तिच्या नांवानं पेढीवर कांहीं रक्कम आहे. ती थोड्याच दिवसांत त्याच्याच हातांत येणार आहे. नांव, गांव वगैरेची मीं कांहीं पक्की चौकशी केली नाहीं. सहज त्याच्या चाकराची व माझी बाजारांत गांठ पडली. त्यानं माझी अशी खात्री केली आहे कीं, तो कोण आहे हें तुह्मांला समजल्याबरोबर त्याच्या ऐपती विषयीं तुह्मी ब्र सुद्धां काढणार नाहीं. मला सध्यां इतकीच माहिती आहे. बाकी त्याच्या बापाजवळ खूप पैसा आहे. पण तो लेकाचा कवडीचुंबक आहे ह्मणे!

ध०—( तोंड वाईट करितो. )

सी०—आपण कांहीं काळजी करूं नये. तो ह्यातारा इतका कफक्षयी आहे कीं सात आठ महिन्यांच्या आंतच त्याची रवानगी होईल असं दिसतं.

ध०—( उसासा टाकून ) नंतर बराच लाट आहे ह्मणावयाचा

आणि यद्यपि जरी इतपत लाट नसता तरी मनुष्यानं कांहीं थोडं धर्माला जागलं पाहिजे. ह्मणून कोणी कांहीं रक्कम मजजवळ मागि-तली तर मी “ नाहीं ” ह्मणून सहसा ह्मणत नाहीं.

सि०–हें तर खरंच आहे. ( प्रतापराव व संभ्या येतात. )

सं०–धनीसाब, ह्यो कुटंग्या हतं कशापाई आलाया? काय हाय ख्योळ ह्यो? आँ? ह्यो आमचा दल्लाळच न्हवं कां दादासाबा-संग बोलतुया?

प्र०–पण तूं मी अमक्याचा अमुक ह्मणून सांगून माझी मान नाहींना कांपलीस! नाहींतर साराच घोंटाळा होईल. मला वाटतं हा रांडलेक बाबांपासूनच रुपये घेऊन मला व्याजीं देणार!

सं०–मलाबी आतां तसंच वाटतया.

सी०–( संभ्याकडे पाहून ) वाहवा! अगदीं वेळेवर येऊन पोंहोचलास बुआ तूं! मला वाटतं यजमानालाही घेऊन आला आहेस. हेच कां तुझे यजमान? पण मी अमुक ठिकाणीं आहे, असं तुह्मांला कोणीं सांगितलं? ( धनाजीराव रागावले असें पाहून ) दादासाहेब, असा राग करूं नका. शपथपुरस्सर मी कांहीं त्यांना तुमचं नांव किंवा पत्ता सांगितला नव्हता. मग ते कसे आले कोण जाणे! ( प्रतापरावास ) कायहो हें तुमचं करणं? तुम्हाला इथं यावयाला कोणीं सांगितलं होतं? तुमच्या येण्यानं दादासाहेब आमच्यावर रागावले. ( धनाजीरावास ) पण मला वाटतं कीं, यांत कांहीं बिघडलं नाहीं. नाहींतरी तुम्ही त्यांची समक्ष गांठ घेऊन कांहीं बोलणं करणारच होतां! ते फार विश्वासू व सज्जन मनुष्य आहेत. ( आपल्याशीं ) काय गाढव आहेत हो हे! अद्यापिही येथून हालत नाहींत.

ध०–( रागानें ) सीत्या, हे कोण ह्मणून रे तूं समजतोस ?

सी०–( संशयानें ) मी तुह्मांला सांगितलं तोच गृहस्थ हा ! यालाच पंधराहजार रुपये पाहिजेत.

ध०–होय कां ? देतों काढून हां तर मग ! ( रागानें काठी उगारून प्रतापरावाच्या अंगावर धांवून म्हणतो. ) तूंच कां ऋण काढून सण करणारा ?

प्र०–( उपहासानें ) बाबा, आपणच कां हे असले अटीचे व जुलमाचे करार करून घेणारे ?

ध०–ह्याच सीत्या तुला रुपये देणार होता नाहीं कां ? ( त्याला झोंडपतो. तो पळून जातो. संभ्या कोंपऱ्यांत दडून बसतो. ) असं कर्ज काढून आपल्या हातांनीं आपल्याच पायावर धोंडा पाडून घ्यावयाला तयार झालास तोच कां हा तूं माझा कारटा ?

प्र०–असं व्याजाचं ओझं कुळावर लादून त्यांना अन्यायानं लुबाडून गबर होऊन बसावयाला तयार झालां तेच कां आपण आमचे वडील ?

ध०–आणि असलं हें काळं तोंड मला दाखवावयाला तुला धीर तरी कसा झाला ?

प्र०–तुम्हांला तरी आपलं तोंड जगाला दाखवायला धीर कसा होतो ?

ध०–( रागानें जळफळत ) अरे कारट्या, हे असले वायफळ खर्च करण्याची, भरकीदार पोषाक अंगावर घालून शहरांत भटकत फिरण्याची, व बाडवडिलांनीं निढळाच्या घामानं पै पै मिळवून सांठवून ठेवलेली संपत्ति उधळण्याची तुला लाज कशी वाटत नाहीं ?

प्र०—हे असले अश्लाघ्य व आपल्या योग्यतेला कमीपणा आणणारे व्यवहार करण्याची, गरिबांना लुबाडून आपण अगदीं निढळाच्या घामानं पै पै करून सांठवून ठेविलें आहे अशी फुशारकी मारण्याची व अगदीं निकृपणाची. कमाल करून आपल्या माणुसकीला बट्टा लावण्याची तुह्मांला तरी लाज वाटते कां ?

ध०—चल गाढवा, नीघ येथून. मला पुनः तुझं तोंड दाखवूं नको.

प्र०—तुह्मांला अधिक अपराधी कोण आहे असं वाटतं ? मला गरज लागली असतां दुसऱ्याकडून पैसा घेणारा मी अपराधी कीं केवळ पुरून ठेवण्यासाठीं गरिबांना लुबाडून हवातसा अन्यायानं पैसा उकळणारा मनुष्य अपराधी ?

ध०—चल ! निघून चालना हो ह्मणतों ना ? माझा राग अधिक पेटवूं नकोस. ( प्रतापराव जातो. ) या याच्या धाडसापासून मला असा कांहीं संताप आला आहे कीं—पण संताप यावयाचें कांहीं कारण नाहीं. ही आपली लवकरच अद्दल घडली ह्मणून बरं झालं ! याच्या वर्तनावर आतां यापुढें नजर ठेवावयाला तरी सांपडेल ! काय करतां ! अगला हा धाडसी कारटा घरांत चोरी करणार नाहीं कशावरून ! तो कदाचित् बागेंत गेला नसेल ना ! आधीं जाऊन पैसा सुरक्षित आहे कीं नाहीं पाहिलं पाहिजे.. ( जातो. )

सं०—( पुढं येऊन. हांसून ) लई नामी गम्मत उडाली ! धनीसावची आज लई खबाळलं हुतं ! चिमन हाताराची खप्पी हाय ! सित्या बामन तर अक्शी × × × पाय लावूनच पळाला. हतं आतां चिट् पांखरूं बी ऱ्हायलं न्हाई ! ह्यो थोरडा कुठं गलाया ह्ये मी हेरलं ! ह्यानं कुठंबी गाठुळं पुरूनशानी ठेवलंया. म्हून धनीसावांचा

संशय येऊन अक्शी कावराबावरा होऊनशान बगाया धांवला म्हवं! न्हाईतर मसित्या बामनानं दिलेल्या यादिमिदल सामान नीट हाय कां न्हाई त्ये बगायापाईं गेला असन. कसा थेरडा हाय बगा! आमी अक्शी घरामंदीच असून इक्त्या सामानाचा आमाला पत्ताबी लागू दिला न्हाई. लेकाजवळ लई डबोलं असावं असं माझ्या मनाला वाटतंया. जाऊंदे की त्मिभन! आमचं आमाला फुरं झालया. आनू ह्यांची पंचाईत कुठं करीत बसूं. (समोर पाहून) कोन ग ती?

(पार्वती येते.)

पा०—अगबाई!!! हा तर मेला आपल्या संभ्या! संभ्या इकडे ये पाहूं. तूं रे यावेळीं इथं रिकामटेकडा कसा?

सं०—(रागावून) हां! त्यो मागला संभ्या म्हवं बरं कां आतां? आन् कसं म्हंटलस? "तूं र हत कसा?" 'अव जाव, संबाजीराव म्हनायाला तुझं त्वांड दुखतया व्हय? म्हनं तूं र हतं कसा? अग चल! मी हतं कसाबी आलो असन. तुला काय करावयाचं त्ये घेऊन? पन तूं ग हतं कशापाईं आलीस सांग बघूं? (एकीकडे) कशी सटवाई दिसतीया बगा त्मिभन!!!

पा०—अरे मी दुसऱ्या कोणत्या कामासाठीं येणार? नेहमीं-च्याच कामासाठीं हो! कोणाचेंही काम केल्यावांचून दाम कसा बरं मिळेल? माझ्या साऱ्ख्या अनाथ बायकोस लटपट व लबाडी केल्या शिवाय पोटाला कसं बरं मिळेल? बरं, पण धनाजीराव कुठं आहेत तें आधीं सांग.

सं०—त्येंचं कायची काम करायच्या खटपटींत हायेस व्हय?

पा०—होय. त्यांचें आपलं एक लहानसं काम करायचं आहे

झालं!! तें काम झालं कीं ते मला एक छान निपाणकांठीं लुगडं घेऊन देणार आहेत. शिवाय रोख निराळंच!!

सं०—( हांसून ) तुला बक्षीस देनार व्हय? त्यो तुला छान फसविनार!! ह्यो थ्येरडा पका हाय. त्यो तुला येक चिमटभर मातीबी द्यायचा न्हाई बग. आन् येडे पोरी, उगच कां भरातींत पडलीयास? जा गुमान आपल्या वाटनं! ह्मनं लुगडं देतुया लुगडं!! त्येला नकोसं झाल असत्याल पैस! आतांपातुर त्येनं तुला काय बी दिलंया कां? अग ए पोरे, काय खुळीबिळी तर न्हाईस? माझं गुमान ऐक. जा जा आपल्या वाटंनं! ह्यच्यापासन रोख पैसा मिळा-यचं लई कठिन हाय.

पा०—तें सारं खरं. पण अशा कांहीं गोष्टी करावयाच्या असतात कीं त्यांत पैसा खर्च केल्यावांचून चालतच नाहीं.

सं०—अग, त्या धनाजीरावाचा कावा तुला अजून उमगला न्हाई जनूं. त्येचा इंगा लई कठिन हाय. त्येच्या पोटामंदी माया ह्मनून न्हाई बग. त्येच्यापासून पैसा काढील अशी येकबी युगुल या पिरतिनीमंदी गवसायची न्हाई. काम केलंत कीं तुझी पाठ थोपटील, तुझ्यावरुवर ग्वाड ग्वाड गुळावनीवानी बोलल, दांत इचकून हांसल, पन पैसा ह्मटलं कीं धाचं गडाडलंच बग. पैसा ह्मटलं तर कावतोया आन् मंग द्या ह्मटलं हांजी मंग काय इचारूं नगस! अश्शी मारक्या बैलावानी अंगावर धावतुया. आन् ह्यो खप्पी थेरडा तुला बक्षीस देनार! 'देनं' ह्यो सबुदच जनूं त्येला ठावा न्हाई! मंग फुकट देनं कुठलं घेऊन बसलीयास? करज होवं तर माग. एकांद्याला शाबासकीबी फुकट देतों ह्मनत न्हाई! करजाऊ देतों ह्मनतुया! शिव्यासुद्धांबी करजाऊ!!

पा०—हें पहा, तुला त्यांतलं कांहीं कळायचं नाहीं. अरे बाबा प्रत्येक माणसांत कांहींना कांहीं गोम असतेच. ती तेवढी पकडली कीं ते हातांत आलेच पाहिजेत.

सं०—त्येला जर तूं ताळ्यावर आणशील तर मिशीच उतरून ठेवीन. त्येच्यापाशीं तुझा काय बी कावा चालायचा न्हाई. पैशाच्या कामामंदी ह्यो थ्येरडा कुनाच्या बालाबी बोलुं द्यायचा न्हाई. अग, पोटचा ल्योक न्हाईतर आपुन दुखनकरी असला तरी वगद्यापाई एक पैबी खर्चत न्हाई. पैसा मंजी त्येचा द्येव. त्यो असला मंजी झालं! अब्रू गेली तर काय बी फिकीर न्हाई! पैसा मागायपाई येकांदा गिरस्त येतुया ह्मनून सांगितलं कीं पुरं, ह्यातार्‍याचा जीव तवाच घोंटाळतुया! जनूं काय प्रानच चाललाया न्हाईतर ऊर फाटतंया असं इवळतुया बग. पन काय ग, ह्या थ्येरड्यापाई जी इत्की खटपट करतीयास, ती माझ्या धन्यापाई केलीस तर लई नामी व्हईल. त्यो मरद मातुर तुला खास इनाम देईल.

पा०—हें नाहीं सांगलं तर तें आहेच.

सं०—पन-अग पन त्योच हकडं येतुया जनूं. जातों तर मी. ( जातो. )

ध०—( येऊन ) सर्व जिथल्या तिथंच आहे. कांहीं काळजी नाहीं. काय ग पारू, केव्हां आलीस तूं?

पा०—आतांच आलें दादासाहेब. आज आपली तब्येत फार सुरेख दिसते.

ध०—कुणाची माझी?

पा०—आपल्या तोंडावर अशी टवटवी मी तर बाई कधीं कधीं नव्हती पाहिली.

ध०-खांच कां हें तूं बोलतेस ?

पा०-हें काय! मी हो लबाड कशाला बोलूं ! खरोखर आतांशा आपली मुद्रा फार टवटवीत दिसते. सध्यांच्या काळचे पंचवीस वर्षांचे बाप्पे सुद्धां तुमच्या पेक्षां वडील दिसतात.

ध०-( डौलानें ) तरी पण या स्वारीला साठी उलटून गेली आहे.

पा०-नुसतीं साठच नां ? तर मग कांहीं ह्मणण्यासारखं नाहीं. साठावं वर्ष ह्मणजे ऐन भर ज्वानीच ह्मणायाची.

ध०-खरंच. पण आणखी जर मला वीस वर्षं कमी असतीं तर बरं झालं असतं.

पा०-हें काय खूळ ? अहो. आपलं शरीरच इतकं सुदृढ आहे कीं शंभर वर्षांपर्यंत आपल्याला कसली ती भीति नाहीं.

ध०—तुला खरोखरीच कां असं वाटतं ?

पा०—हो! खरोखरीच ह्मणजे! आपलं किनई तेजच तसं आहे. जरा ताठ उभे रहा पाहूं! ( त्याची हनुवटी धरून तोंड वर उचलते. ) अगबाई! हे पाहिलंत कां तुमचं कपाळ किती तरी रुंद आहे तें! याच्यावरूनच तुह्मी दीर्घायुषी होणारसं वाटतं.

ध०—तर मग तुला सामुद्रिकसुद्धां येतं वाटतं ?

पा०—येतं मेलं कसं तरी झालं! दादासाहेब, तुमचा हात दाखवा पाहूं ! अगबाई ! केवढी तरी आयुष्याची रेषा लांब हो ! धन्य आहे बाई !. असली कोणाचीही नसते.

ध०—कुठं ग आहे ती ?

पा०—( दाखवून ) अहो ही नव्हे कां !

ध०—पण अशी असली ह्मणजे काय होतें ?

पा०—ही रेषा दीर्घायुष्य दाखवितें. ( विचार करून ) इश्श ! मी शंभरच काय सांगतें ! दादासाहेब, आपल्याला शंभरावर वीस वर्षं आयुष्य आहे हो !

ध०—अग, असं कधीं तरी होईल कां ?

पा०—हो हो. न व्हायला काय झालं ? आतां तुमचा आपला कोणी गळाच कांपला तर न कळे. पण आप मरणानं तर तुह्मांला शंभरावर विसापर्यंत कसलीही भीति नाहीं. अहो तो पुत्रशोक तुमच्या नशिबीं आहे ना ! पुत्रशोकच कां ? नातू पणतू देखील तुमच्या डोळ्या देखत मरणार असं दिसतं मला.

ध०—तर मग दुधांत साखरच ह्मणावयाची ! बरं तें राहूंदे. पण आमच्या कामाचं काय झालं तें सांग आधीं.

पा०—हें विचारण्याची कांहीं तरी गरज आहे कां ? मीं एकाद्या कामाला हात घातला नी तें तडीला गेलं नाहीं असं कधीं तरी झालं आहे कां ? हीं अशीं लग्न जुळविण्यांत मी फार पटाईत बायको आहें. माझ्या मनांत आलं तर एकाद्या राजकन्येचं एकाद्या आंधळ्या पांगळ्याबरोबरही लग्न लावीन. तशी एकादी अडचण तुमच्या कामांत मुळींच नव्हती. दादासाहेब, त्या बाईची व माझी चांगली ओळख होती. तुमचं मनोगत मीं तिला कळविलं व शिवाय तुमची कच्ची हकीकतही मीं तिला नीट समजाऊन सांगितली.

ध०—( उत्सुकतेनें ) मग ती काय ह्मणाली ?

पा०—हें ऐकून तिला भारीच आनंद झाला. मी तिला शेवटीं ह्मटलं आतां दादासाहेबांच्या मुलीचं लग्न व्हावयाचं आहे, तेव्हां चार दिवस आधीं साहित्य करण्या करितां मथुरेला देशील कां लावून? तेव्हां तिनं तें आनंदानं कबूल केलं. ती ह्मणाली, " खुशाल! मुलगी त्यांचीच आहे." पण काय हो! अहिल्येच्या लग्नाचा मुहूर्त कधीं धरला आहे?

ध०—मुहूर्त जवळचाच धरला होता; पण दोनतीन दिवसांपासून तिच्या पोटांत अतिशय दुखत आहे. ह्मणून मुहूर्त लांबेल कीं काय याचीच मला भीति पडली आहे.

पा०—पण आतां कांहीं विशी चाविशी गुण आहे ना?

ध०—साधारण बरं आहे.

पा०—औषध बिवषध कांहीं?

ध०—अग असल्या दुखण्याला औषध काय करायाचं? गतवर्षी रामनवमीचा सुंठवडा दत्तंभटानं आणून दिला होता, तो पुढें मागें उपयोगी पडेल ह्मणून एका पुडींत बांधून ठेविला होता. त्यांतलाच सवंध चिमूटभर दररोज देतों. त्यानंच दुखण्याचं पाऊल जरा मागं दिसतं.

पा०—(एकीकडे) मर मेल्या! हीच कां पोटच्या पोरांची तुला काळजी? संम्या सांगत होता त्याचा एकेक अनुभव येऊं लागला. (उघड) मग तिला मी केव्हां इकडे आणूं?

ध०—आमचे मेहुणे तुळाजीराव आले आहेत. ते आतां उद्यां अगदीं निघणारच! त्यांना उद्यां गोड करून घातल्याशिवाय निर्वाहच नाहीं. ह्मणून आमच्यांत उद्यां मेजवानीचा थाट उडणार हें

खास. उद्यांच आपली चटणी कोशिंबिरी करावयाला घेऊन येईनास परती ? आणि तूं—तूं सुद्धां इकडेच ये.

पा०—अगबाई ! खरंच कां ? उद्यां जेवणं खाणं झाल्यावर तीच अहिल्येला भेटायला येणार होती. नंतर त्या दोघी मिळून महालक्ष्मीच्या जत्रेला जावं असं तिच्या मनांत आहे. आतां मी तिला आधींच यायला सांगेन ह्मणजे झालं ! !

ध०—कांहीं चिंता नाहीं. जेवण झालं ह्मणजे ती आमच्या गाडींतून जत्रेला जाऊंदे. तिला मी घटकाभर देईन गाडी उसनी. ऐलीही बरोबर जात असली तरी कांहीं हरकत नाहीं.

पा०—( एकीकडे ) गाडी उसनी ? एकून नुसता देणं हा शब्द तोंडांतून यायचा देखील नाहीं कीं काय ? ( उघड ) दादासाहेब, ती आतां आपली होणार ना ? मग तिच्या संबंधानं उसनी हा शब्द लवकरच नाहींसा होणार आहे. तेंव्हां तो आतांपासूनच काढून टाकण्याचा मुहूर्त करांना परता ?

ध०—पण काय ग, किती हुंडा द्यावयाचा तिच्या आईचा बेत आहे ? मुलीचं लग्न आणि त्यांत सुस्थळ ह्मटलं ह्मणजे भक्कम हुंड्याशिवाय वठत नाहीं हें तिला नीट समजाऊन सांगितलं आहेसना ? अग, नुसत्या बायकांना घेऊन काय चाटायच्या आहेत ? त्या लक्ष्मी घेऊन नवऱ्याच्या घरीं गेल्या तरच त्यांना लक्ष्मी हें नांव शोभतं. इतकंही असून मी हुंड्यावांचून देखील लग्न करून घेतलं असतं; पण काय करूं ? लौकिकांत वाईट दिसेल ह्मणून घ्यावं लागतं. या जगांतला एक तरी शहाणा मनुष्य हुंड्यावांचून लग्न करतो आहे कां पहा ! हुंडा घेतल्यावांचून त्यांना शहाणे कोण ह्मणणार ? मी ह्मणतों कांहीं नाहीं तरी निदान दहा बारा हजार कां होईना !

पा०—एकदांच दहा बारा हजार? तें कां हो! ती तुमची झाली कीं दरसाल बारा हजार रुपयांचं उत्पन्न घरांत आलंच ह्मणून समजा.

ध०—( आनंदानें ) काय दरसाल बारा हजार रुपये! अगदीं खणखण वाजवून!

पा०—होय ह्मटलंना? मुलगी पण काय आहे ह्मणाल—अहाहा! रूपानं तशीच, बांध्यानं तशीच, गुणांनीं तशीच, बोलण्याचालण्यांत तशीच, काटकसर करण्यांत तशीच! तिनं आपल्याला उंची उंची पदार्थ खाण्याची देखील संवय नाहीं हो लावून घेतली! नुसती नाचण्याची भाकर व एवढीशी आंबील खाऊनच ती लहानाची मोठी झाली आहे. ती तुमची कारभारीण झाली ह्मणजे घरच्यांना, दारच्यांना, आल्या गेल्यांना, पै पाहुण्यांना रोजच काय पण सणांवारींसुद्धां त्यांशिवाय कांहीं खाऊं देणार नाहीं. दुसऱ्या बायकांसारखं ‘इश्श बाई! मला हेंच नको’, असा कानखरा करणारी नव्हे. या खाण्याच्या मानानं तुमचे दरसाल निदान पांच हजार रुपये तरी वांचतील. दुसरं असं कीं, तिला नेहमीं साधेपणा व नीटनेटकेपणा आवडतो. शालू नकोत, पैठण्या नकोत, उंची उंची लुगडीं सुद्धां नकोत. एकादा सुताडा व एकादी चोळी—मग ती कसल्याही खणाची कां असना—तिला आपली चालेल. हा एक आपला तीन हजारांचा खर्च वांचला. दागिन्यांच्या संबंधानंही तसंच. एक नुसतं मंगळसूत्र जरी तिला दिलं तरी तिची समाधानी होईल. नवरा हाच तिचा दागिना अशीच त्यांच्या घरची ह्मण आहे. दुसरी एकादी मुलगी करून घेतली असती तर अशा फंदांत वर्षाला चार हजार रुपये देखील पुरले नसते. हिला करून घेतल्यापासून तेही वांचतील, मग असे वर्षाला किती चरं? ते पांचनी ते तीन मिळून

आठ आणि चार मिळून बाराहजार कांनतील ना ? मग हा काय हुंडा कीं हुंड्याचा काका ? व तो एकदांच कीं जन्माचा ?

ध०—( वेडावून ) होय तर ! ती म्हणे अमुक अमुक खर्च करणार नाहीं हा हुंडाच झाला. हें पहा, हे असले लपंडावांचे खेळ माझ्यापाशीं चालावयाचे नाहींत. मला रोख कांहींतरी मिळालेंच पाहिजे.

पा०—तुह्मांला हवं तितकं मिळेल हो! त्याचं काय घेऊन बसलां आहांत ? कुठंशी बाई तिनं आपली जमीन आहे ह्मणून सांगितली हो ! कुठंवरं !—ती ती आपल्यालाच वरदक्षिणा ह्मणून देणार.

ध०—मग त्याचा तपास केला पाहिजे. बरं पण पारू, माझ्या मनाला दुसरी एक मोठ्ठ खाते आहे ग. तिच्या योगानं मला चैन ह्मणून पडत नाहीं. ती तरुण आहे होय : तरुण मुलींना जे आपल्यासारखे तरुण पुरुष असतात तेच बहुधां आवडतात. व त्यांनाच सहवास नेहमीं असावा असंही त्यांना वाटतं. ह्मणून मी तिला आवडेन कीं नाहीं याची मला मोठी काळजी लागली आहे. समज, आमचं लग्न झालं व मग तिला आवडेनासा झालों, तर नेहमीं घरांत कलह, त्रास, संताप हींच पहावीं लागतील ह्मणून ह्मणतों.

पा०—अगबाई ! मी तें सांगायला विसरलेंच. अहो, तिच्या स्वभावाची तुह्माला परिक्षाच झाली नाहीं. तिचा स्वभाव इतर पोरींहून अगदीं निराळा आहे. तिला तरुण माणसांचा भारी कंटाळा आहे. ह्मातारीं माणसंच तिला फार आवडतात.

ध०—खरंच कीं काय ?

पा०—तुह्मांला पाहिजे तर तिच्या तोंडून तुमची खात्री करून

देईन. फार काय सांगूं तिला तरुण माणसांचं दर्शनसुद्धां खपत नाहीं. एखाद्या उत्तम केंस पिकलेल्या मनुष्याकडे पाहिलं ह्मणजे तिला किती तरी आनंद होतो ह्मणून सांगूं! जो अधिक वयाचा तोच तिला मोहक वाटतो. ह्मणून मी आपल्याला आधींच सांगून ठेवतें कीं आपण वय लपविण्यासाठीं केसांना कलप कराल, तर तें तिला नाहीं हो पतकरणार! तशांतून गम्मत ही कीं तिला उगीच ऐशीं नव्वद वर्षांचा थेरडा नाहीं आवडत. साठ बासष्ठाच्या दरम्यानचा असला ह्मणजे तिला मोठा आनंद! तिनंच स्वतःएकदां सांगितलं कीं गेल्या सालीं आपल्या लग्नाचा मुहूर्त देखील धरला होता! पण इतक्यांत ह्मणें तिला समजलं कीं नवऱ्याचं वय सारं छप्पन वर्षांचं आहे व त्याला चाळशीही लागत नाहीं. मग काय विचारता? तिनं आईला साफ सांगितलं कीं अशा पोरकट थेरड्याशीं जर माझं लग्न लावशील तर मी विहिरींत उडी टाकीन. मला साठवर्षांचाच म्हातारा नवरा पाहिजे.

ध०—एवढ्या क्षुल्लक कारणा करितां लग्न मोडून टाकिलं.

पा०—होय हो! ती ह्मणाली कीं असल्या छप्पन वर्षांच्या नवऱ्यापासून मला काय सुख होणार? तशांतून दादासाहेब, चाळशी घालणारा नवरा असला तर तो आपल्याला फारच प्रिय आहे असं तिचं ह्मणणं आहे.

ध०—( हांसून ) ही असली गम्मत मी माझ्या साऱ्या जन्मांत पाहिलीही नव्हती किंवा ऐकिलीही नव्हती.

पा०—हा तिचा हट्ट कोठपर्यंत गेला आहे, हें ऐकलं तर आश्चर्य वाटेल. तिनं आपल्या खोलींत तसबिरी ठेविल्या आहेत, त्या कुणाच्या समजलं कां? राम, कृष्ण, अर्जुन अशा तरुण पुरु-

पोंच्या नव्हेत हो! तर वसिष्ठ. वाल्मीक, व्यास, विश्वामित्र अशा लांब पांढऱ्या दाढीवाल्या ऋषींच्या.

ध०—खारोखर हें मोठं नवल आहे हें असं असेल असं माझ्या स्वप्नीं देखील नाहीं. तिचं हें शहाणपणाचं वर्तन पाहून मला फार संतोष होतो. खरोखर मी स्वतःच बायको असतों तर तरूण पोरा-वर कधींही प्रीति केली नसती. तरुण पोरां पेक्षां मला म्हातारे लोक विशेष आवडले असते.

पा०—खरंच तें! तरुण पोरांना जगाचा अनुभव तरी असतो कां! ते आपले आज एका स्त्रीवर प्रीति करतील, उद्यां दुसरी एकादी चांगली ठुसठुशीत नखरेदार पाहिली की तिला आपलंसं करतील, असं हें चालायचंच! तारुण्य हें ज्यांना म्हणून आवडतं तीं माणसं खचित वेडीं असलीं पाहिजेत. मग असल्यांना मनुष्य तरी कसं म्हणावं कोण जाणे! तीं केवळ पशूच असतात. मग अशा पशूंवर कोणीं प्रेम करावं बाई!

ध०—अगदीं खरं बोललीस. माझं म्हणणं तरी हेंच आहे. तो त्यांचा फुटक्या मडक्यासारखा बदबदाणारा घसा, काळ्या बुरणुसां सारख्या दाट मिशा, ते शाई सारखे काळेभोर केंस, छाकट्या सारख्या पगड्या, घागरी सारखे कुल्ले, व रेड्या सारखी गर्दनें पाहून कोणालाही कंटाळा यावयाचाच! असं असून कांहीं कांहीं पोरी तसल्या कारट्यांवर फिदा होतात याचंच मला आश्चर्य वाटतं.

पा०—तुमची व त्यांची तुलना केली तर ते तुमच्यापुढें शुद्ध बैलोबा दिसतात. तुमच्यांत कांहीं मनुष्यपणा तरी आहे. तुमच्याकडे पाहूं नये असं कुणालाही वाटत नाहीं. हें असलं रूप व हा असला

पोषाक पाहिला तर तुम्ही खचित एकाद्या अप्सरेच्यासुद्धां मनांत भराल.

ध०-तर मग मी फार सुंदर दिसतों ह्मणावयाचा !

पा०-खरोखर दादासाहेब, हें आपलं रूप फारच मनोहर आहे. तुमचं चित्र काढून दिवाणखान्यांत ठेवण्यासारखं आहे. जरा चार पावलं टाका पाहूं! ( तो फिरतो. ) वा: ! चालणं देखील किती दबदार ! तुमचं हें शरीर फारच बांधेसूद व सुटसुटीत आहे. आणि त्यांत पंगुपणा मला तो कुठेंही नाहीं.

ध०-मला कोणचीही खोड नाहीं याबद्दल मी खरोखरच आपल्याला नशिबवान समजतों. पण फक्त हा कफच कायतो वारंवार येऊन मारा त्राम देतो ग !-बाकी- ( खोंकतो. )

पा०-कफाच काहीं ह्मणण्यासारखं नाहीं. खोंकतांना तुमचं तोंड जास्तच खुलतं.

ध०-पण कायग तिनं मला कधीं पाहिलं आहे काय ?

पा०-नाहीं. पण मी तिच्यापाशीं तुमचे गुण, तुमचा स्वभाव, तुमचं ऐश्वर्य इत्यादिकांचं वर्णन हुबेहुब केलं आहे. व आपल्या बरोबर लग्न केल्यापासून किती फायदा होईल हेंही तिला नीट समजावून सांगितलं आहे.

ध०-ठीक आहे. तुझे मजवर अनंत उपकार आहेत.

पा०-दादासाहेब, माझं एक थोडसं मागणं आहे. ऐकालकां? मजवर एकानं फिर्याद केली आहे. आणि जवळ पैसा मुळींच नसल्यामुळं मी या खटल्यांत हार बुडणार असं वाटतं. आणखी माझ्यावर पूर्णकृपा आहे ह्मणून ह्मणते कीं आपण जर या संकटांत

मला हात द्याल, तर मी आपली फार ऋणी होईन. ( धनाजीराव रागानें पाहून ) पण ऐकलंत कां! तिनं आपल्याला जर प्रत्यक्ष पाहिलं, तर तिला किती आनंद होईल याची आपल्याला कल्पना देखील नाहीं. ( धनाजीरावाची मुद्रा आनंदित होते. ) आपल्या पासून तिला फार सुख होईल व आपली आनंदित मुद्रा पाहून तिचं अंतःकरण प्रेमानं अगदीं भरून जाईल. ( त्याच्या पायांकडे पाहून ) आणि हें काय? हा पठाणी जोडा घातला आहे वाटतं? वा: ! तशांतून तो फाटका व ठिगळं लावलेलाच आहे ना? आतां तर ती खास अगदीं खुळी होऊन तुमच्या पाठीस लागेल. कारण, तिच्या साध्या स्वभावामुळं असला फाटका व ठिगळं लावलेलाच जोडा तिला फार आवडतो.

ध०—( मोठ्यानें खदखदां हांसून ) तुझ्या या बोलण्यानं मला खचित हर्षवायु होणार !

पा०—मी आपल्याला खरंच सांगतें बरं का? या फिर्यादींत माझं बरंच नुकसान होणार आहे. ( धनाजीराव पुनः रागावतो. ) परंतु आपण मज गरीबावर दया केली तर माझं खचित कल्याण होईल. तिनं तुमचं नांव ऐकिल्याबरोबर तिला जो आनंद झाला, तो पहावयाला जर आपण स्वतःच तिथं असतां, तर फार चांगलं झालं असतं. ( धनाजीरावाची मुद्रा पुनः आनंदित होते. ) मी जेव्हां तुमचे सद्गुण, तुमचा काटकसरी स्वभाव त्या बायांपुढं गाऊं लागलें, तेव्हां तिच्या नेत्रांतून आनंदाश्रूंचे ओघळ वाहावयाला लागले! व असल्या नवऱ्या बरोबर माझं लग्न होईल असं त्या मुलीला होऊन गेलं.

ध०—मला या तुझ्या भाषणानं आनंद झाला खरा; तरी मी तुला खात्रीनं सांगतों कीं—

पा०—मी कांहीं फार मागत नाहीं. मला यावेळीं अगदीं थोडे—

पंचवीस–वीस–निदान दहा कां होईनाव–द्याच ! ( धनाजीराव पुनः रागावतो. ) त्याच्या योगानं माझं कल्याण होईल व मी जन्मभर तुह्मांला दुवा देत राहीन.

ध०–बरं जा आतां तूं–माझं पत्र लिहावयाचं उरलं आहे, तें मी संपवितों जातों.

पा०–दादासाहेब, वेळ काय ती हीच आहे. या वेळेलान कांहीं मदत कराल तर पहा. पुनः मदत करूं ह्मणाल तर असली वेळ पुनः नवस केल्यानं सुद्धां यावयाची नाहीं.

ध०–तुह्मांला जत्रेला जाण्या करितां गाडी तयार झाली कीं नाहीं पहातों. ( जावयास निघतो. )

पा०–दादासाहेब, हा प्रसंग आला नसता तर मी कधींही आपल्याला आग्रह केला नसता.

ध०–स्वयंपाकही लवकरच करविला पाहिजे. नाहीं तर अवेळीं भोजन ह्मणजे आजारी पडण्याचा प्रसंग.

पा०–दादासाहेब, एवढी विनंति अमान्य नका करूं.

ध०–मला आतां गेलंच पाहिजे. ( कानोसा घेऊन ) कोणी हांका मारीत आहे वाटतं. आलों हो आलों. थांबा अंमळ. ( पार्वतीस ) नंतर येऊन मला भेट हूं.

पा०–मर मेल्या. आतां माझं खेटर आडलंय तुला भेटायला. संभ्या सांगत होता तें अक्षरशः खरं बाई ! मला चिक्कू आहे मेला ! गेला तर गेला ! प्रतापराव तरी आहेना ! त्याच्यासाठीं खटपट करूं ह्मणजे झालं. तो कांहीं असा नाहीं फसवायचा. कसं कां असेना ! आधीं पैसा घेतल्या वांचून कोणाच्याच कामाला हात घालायचा नाहीं. नाहींतर “ गरज सरो नी वैद्य मरो ” असं व्हायचं. ( जाते. )

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ--धनाजीरावांचें घर.

[ धनाजीराव, प्रतापराव, अहिल्या, विश्वासराव, जगन्नाथ, तान्या, मन्या, सोन्या येतात. ]

ध०—चला रे चला ! सर्व इकडे या. आज प्रत्येकाकडे एकेक कामगिरी सोंपवून देतों. मी सांगतों त्यांत जर कां चुकलां तर पाठीचीं चमडीन् चमडीं लोळवीन गुलामांनों ! तान्या, चल ये पुढं. तुझ्याकडं काय काम आहे, तें समजलं कां ? ( त्याच्या हातांतल्या केरसुणीकडे पाहून ) वाः ! तूं तर बोआ आज अगदीं आपलं शस्त्र घेऊन सज्ज होऊन राहिला आहेस ! ठीक आहे. आज जिकडे तिकडे झाडून अगदीं स्वच्छ करून टाकायचं एवढंच काम तुझ्याकडे.

ता०—भिंतीही झाडायच्या काय ?

ध०—नको. अरे भिंती झाडल्यास तर त्या झिजून झिजून पडतील ना ! फक्त खालची जमीन तेवढी झाडावयाची. पण ती सुद्धां मोठ्या जोरानं झाडावयाची नाहीं हं : ! अगदीं हळु. झाडणीं जमिनीला लागेल न लागेल अशा बेतानं. नाहींतर आजच सर्व जमीन नाहींशी होईल. झाडून दाखीव पाहूं मला एकदां !

ता०—( साधारण जमिनीस लावून पण हळूहळू झाडतो. )

ध०--अंः हंः अंः हंः ! आणखी वरूनच !!

ता०-( वरूनच पण जोरानें झाडतो. धुरळा उठून तो मंडळीच्या नाका तोंडांत शिरतो. सर्व मंडळीस खोकतां खोकतां पुरें होतें. )

ध०—( खोंकत. ) वाः ठीक आहे. असंच असंच !

जग०-( मनांत ) हा दिवाणखाना झाडून किती दिवस झाले कोण जाणे ! कोण धुरळा हा ! वावटळ उठल्याप्रमाणं दिसत आहे. ( उघड ) पाणी तरी शिंपावं !

ध०-चुप! आमच्या आडाचं नको. संपेल. शेजारच्या आडाचं आणून शिंपा हवं तर !

ता०-( खोकत ) ह्येच कां काम ?

ध०-शिवाय जेवण आटपे पर्यंत हीं सर्व भांडीं तुझ्या ताब्यांत. जर कां त्यांतलं एकादं गमावलं किंवा फुटलं तर त्याबद्दल तुला जबाबदार धरून तुझ्या पगारांतून पैसे काटून घेईन. याद राखून ठेव !!

ता०-मी कां वळनंच होगाडतों का काय ! नग बा ह्ये माझ्या ताब्यात. बद्दलाम इविभन ! मी झकपक् करूशान ठेवीन ह्यांजी झालं !!

ध०-फार शाहाणा आहेस. तें सामान तूं आपल्या ताब्यांत. घेतलंच पाहिजेस. जा आतां तूं. नीट व्यवस्था ठेव. ( तो जाऊं लागतो. ) अरे ए, इकडे ये. आणि तो केर टाकून देऊं नकोस. एके ठिकाणीं जपून ठेवीत जा. खत होईल. व विकून चार दोन पैसे करतां येतील. ( तो जातो.) अरे ए सोन्या, मन्या, तुह्मीं काय करतां रे ! हंः जेवावयाला वाढावयाचं काम तुमचं. त्यांत मात्र फार सावधगिरी ठेवावयाची हं ! नाहींतर उगीच उधळेपणा करीत सुटाल.

जेव्हां अगदीं पानांतलं संपेल, तेव्हां मात्र थोडं थोडं आणून वाढावयाचं, हा आपला क्रम ठेवा. मोल्यवान पदार्थांचा आग्रह बिलकूल करावयाचा नाहीं. कोणी कितीही हांका मारूं दे. मी स्वतः पुष्कळ हांका मारल्यावांचून जर कां बाहेर आलांत, तर तंगडीच मोडून टाकीन. मीठ, तिखट, भाजी पाला, पाणी, याचा आग्रह मुबलक करा. कांहीं फिकिर नाहीं.

ज०–( आपल्याशीं ) हो ! जर कदाचित आग्रह झाला तर मंडळींना कैफ येईल एखादा ! !

सो०–तर मग सामोरं जायाला आमीबी आपलीं डगलीं चडिवतों धनीसाव.

ध०–हां. तुह्मी इथेंच चुकतां. बेट्यांनो, इतकी घाई नको. मंडळी जमायला लागली कीं कपडे चढवावयाला लागावं. आणखी ते नीट जपून वापरा. नाहींतर खुळ्यासारखं वागून ते अगदीं खराब करून टाकाल.

ज०–पानसुपारीचीही तयारी झाली पाहिजे. मला वाटतं केवड्याच्या वासाची पक्की पानं विकत आणावीं.

ध०–शहाणा आहेस तूं. पक्की पानं थोडीं मिळतात. केवड्यांचा वास आपण घरींच लावूं. अरे आपल्या ओढ्याच्या कांठीं केवड्याचीं बेटं आहेत. त्यांच्या खालून वाहत असलेलं पाणी आणून त्यावर शिंपडा ह्मणजे वास लागेल चांगला. सोन्या, तुझ्याकडे पानसुपारीचं काम. आधीं विडे तयार करून ठेव. मंडळीपुढें तबक, डबा वगैरे कांहीं ठेवावयाचं नाहीं. कारण फार सामान दिसलं कीं ते आधाशासारखे खातात. ह्मणून ठेवूंच नये हें चागलं. विडे करतांना सुद्धां सावधगिरी ठेवावयाची हं ! दोन पानं–एक मोठं व एक लहान–एका सुपारी

तवा दहावा किंवा बारावा हिस्सा इतकी सुपारी, चुना हवा तर सडकून लाव. लवंगा सवंग मिळतात, त्या हव्या तितक्या घाल. पत्री जायफळाचा नुसता वास लावावयाचा ! समजलं का ?

म०—समाजलं—पन धनीसाव, माझ्या डगल्याच्या होरच्या आंगाला येक तेलाचा डाग पडूनशान लई घान दिसतुया.

ध०—( रागानें ) कसल्यारे तेलाचा डाग पडला ?

म०—मुरदाड धनीसाब ! कल ती पनती उचलली न्हाई कां दिवानखान्यांतली, तवा हें समदं झालं बगाया.

सोन्या—अन माझावी चोळणा पाठीमागं घुशीनं कातरलाया.

ध०—( एकीकडे ) या गाढवांची नेहमीं कुरकुर. माझं हें असंच झालं; माझं हें तसंच झालं. ( उघड ) चिप्प ! कांहीं हरकत नाहीं. चोळणा पाठीमागं फाटला आहेना ? तर मग तूं आपली पाठ भिंतीशीं टेंकून उभा रहा. मंडळीकडे तोंड करून उभा राहिलास ह्मणजे त्यांच्या नाहीं लक्षांत येणार. आणि मन्या, तूं आपला पट्टा तो डाग झांकून जाईसा घाल ! ( कसें करावयाचें तें त्याला स्वतः दाखवितो. ) जा, तुझी आतां.

म०—कसा कावा हाय बगा चिभन ! नवं डगलं मिळावत म्हून बगत होतों, पन न्हाई सादलं ! ( जातात. )

ध०—( अहिल्येस ) एले, तूं काय करतेस ? हं ! मंडळी जेवून उठली कीं त्यांच्या पानांतलं सगळं खरकटं काढून ते व्यवस्थेशीर ठेव बरं. कांहीं नास होऊं देऊं नको. हीं असल्या प्रकारचीं नाजुक कामंच तुझ्या सारख्या तरुण मुलींना योग्य !!

अ०—एवढंच ना ?

ध०—आणि ती मथुरा आली कीं तिचा चांगला आदरसत्कार कर. ती तुलाच भेटावयास येणार आहे. समजलीस कां ? नंतर दोघी मिळून महालक्ष्मीची जत्रा पाहून या. गाडी बाहेर तयार आहे. जा तर तूं !

अ०—ठीक आहे. ( जाते. )

ध०—अहो अक्कडबाज प्रतापराव, काल आपण जो आमचा अपराध केला आहे, त्याबद्दल मी आपणांला क्षमा करितों. पण आतां तरी नीट जपून वागा ! ती आली ह्मणजे तिचा अपमान करावयाचा नाहीं हें नीट लक्ष्यांत ठेव. व असला हा आंबट, दुर्मुखलेला चेहरा घेऊन तिच्या समोर उभा राहूं नकोस.

प्र०—काय ? त्या सुंदरीचा अपमान ? आणि तो मी करणार ! छें: बाबा, चुकलां तुह्मी !

ध०—अरे अशा बमेंड्या मारूं नकोस. दुसरं लग्न करावयाला तयार झालेल्या आह्मां बापांना तुझ्या सारख्या सत्पुत्राचे गुण पूर्णपणें माहित असतात. व ते आपल्या सावत्र आईचा मान किती ठेवतात हें ही पण मी जाणून आहें. जर कालच्या अपराधांबद्दल मीं तुला क्षमा करावी अशी तुझी इच्छा असेल, तर तूं तिचा आदर चांगल्या प्रकारें केला पाहिजेस.

प्र०—बाबासाहेब, खरंच पुसाल तर, ती माझी सावत्र आई या नात्यानं मीं तिचं स्वागत करावं, हें कांहीं माझ्या मनाला नीट वाटत नाहीं. परंतु नुसता तिचा आदर करावयाचा असंच जर सांगत असाल, तर मी तुमच्या आज्ञेच्या बाहेर काडीमात्र जाणार नाहीं.

ध०—कसंही समज. पण आदरातिथ्य कर ह्मणजे झालं.

प्र –पहा तर खरं! इतका कांहीं उत्तमप्रकारें आदर करितों कीं तुह्मांला बोलावयाला मुळींच जागा ठेवीत नाहीं.

ध०—तूं शहाणाच आहेस. तुला कांहीं अधिक सांगावयास नको आहे. जा तूं आतां. पण सांगितलेलं नीट लक्ष्यांत ठेव! (प्रतापराव जातो.) विश्वासराव, थांब जाऊं नकोस. तुह्मीही आह्मांला या प्रसंगीं मदत पाहिजेच आहे. जगन्नाथ, आतां शेवटीं तूं एकटा राहिला आहेस. तुझ्याकडेही एक काम सोंपवून देतों.

ज०—पण मला आधीं आपण एवढं सांगा कीं आपण जी कामगिरी सोंपविणार, ती गाडी हांकणाऱ्या जगन्नाथाकडे कीं स्वयंपाक करणाऱ्या जगन्नाथाकडे!

ध०—दोघांकडेही.

ज०—पण आधीं कोणाकडे?

ध०—प्रथम आचाऱ्या जगन्नाथाकडे.

ज०—हा असं काय? थांबा तर मग. (अंगावरचा गाडीवानाचा डगला काढून टाकून देतो व आचाऱ्याच्या वेषांत उभा राहतो.)

ध०—हें रे काय? हा काय फाजीलपणा चालविला आहेस तूं?

ज०—मी जगन्नाथ गाडीवाला होतों, तो हा पहा मी गाडीवाल्याचा आचारी बनलों. हं, तर मग बोला आतां दादासाहेब, माझ्याकडे कोणती कामगिरी सोंपविणार ती?

ध०—अरे, आज आमच्या घरीं एक जंगी मेजवानी व्हावयाची आहे, हें तूं आतां ऐकलं असशील?

ज०—(बाजूला) जंगी मेजवानी? मोठं आश्चर्य आहे बोआ!

ध०—तेव्हां आजचा स्वयंपाक तूं चांगला करशीलना ?

ज०—आपण पैसा जर भरपूर खर्च कराल, तर स्वयंपाक फारच उत्तम करीन. पण–

ध०—( त्रासून ) हा गाढवांनों ! नेहमीं पैसा ! या गाढवांना रात्रंदिवस पैशावांचून दुसरं कांहीं दिसत नाहीं. नेहमीं आपला " पैसा ! पैसा ! ! पैसा ! ! ! " पैशासाठीं गुलाम अहोरात्र कंठशोष करीत असतात. पैसा ह्मणजे जणूं काय या गाढवांचं जीवितच ! पैसा नसला तर मरतील कीं काय कोण जाणें.

वि०—असला हा उद्धटपणाचा जबाब आपण तर बोआ आजन्मांत ऐकिला नव्हता. अरे जग्या, पैसा दिल्यावर उत्तम पक्वान्नं करणं हें कांहीं मोठंसं नवल नाहीं. पैसा खर्च केल्यावर एकादा मूर्ख मनुष्य सुद्धां तें करील. परंतु खरा शहाणा जो आहे तो अगदीं थोड्या पैशांत काय हवं तें करून दाखवील.

ज०—अगदीं थोड्या खर्चात उत्तम उत्तम पक्वान्नं ?

वि०—अरे होय होय.

ज०—हें कसं करावयाचं यांतलं इंगित जर, राव, आपण मला सांगाल, तर आपले माझ्यावर फार उपकार होतील. आणि आपणच जर आमची जागा स्विकारून आजचा मेजवानीचा टोलेजंग समारंभ उरकून न्याल तर दादासाहेबही आपले फारफार आभारी होतील.

ध०—( रागानें ) गप्प बैस मूर्खा ! आमचं चाललं आहे काय व तूं बडबडतो आहेस काय ?

ज०—दादासाहेब, थोड्या पैशांत उत्तम पक्वान्नं करावयाला या राजश्रींनाच सांगा.

ध०—मी तुलाच सांगतों. व याचा जबाब तूंच मला दिला पाहिजेस.

ज०—आज किती पात्र होईल बरं ?

ध०—अरे निदान आठ किंवा दहा हें आपलं ठेवलेलंच.

ज०-बरं ते सारे लठंभारती आहेत कां कांडी पाहिलवानच आहेत?

ध०—जग्या, तूं हल्लीं फारच बेजबाब बोलूं लागला आहेस ! पण कोरड्याखालीं झोडपीन लक्षांत ठेव. पण हें नीट एक आधीं. दहा जरी मंडळी जेवावयाला येणार असलीं तरी स्वयंपाक ह्मणून आठांचाच करावयाचा ! कारण, आठ माणसांत दोन माणसं हवीं तशीं खपतात.

वि०—दादासाहेबांचं ह्मणणं अगदीं बरोबर आहे. आठांत दोनच कां चांगलीं चारसुद्धां खपतील !

ज०—चारच कां ? अर्धपोटीं साऱ्यांना उठविलं तर आणखीं सुद्धां आठ खपतील. व साऱ्यांना स्वयंपाकाचा नैवेद्यच दाखवावयाच असेल तर लाखों सुद्धां खपतील !

वि०—किती रे उद्धट तूं ?

ज०—( आपल्याशीं ) हा किती तोंडपूजा आहे ह्मणून सांगूं ! मोठा—

ध०—कायरे विचार कसला करतोस ?

ज०—कांहीं नाहीं ! इतक्या मंडळीला अन्न किती लागेल याचा हिशेब करीत होतों. दादासाहेब, कमींत कमी ह्मणाल तर, अडेश्रीचा दळया, एका शेराचा मोतीचूर; पांचशेर दह्याचं श्रीखंड—

ध०—हा रे कशाचा हिशेब? तुझ्या मनांत आज साऱ्या गांवाला मुक्तद्वार करावयाचं आहे वाटतं?

ज०——नंतर भजीं, सांडगे, पापड, मेतकूट, तिखटं, कोशिंबिरी—

ध०—( त्यांच्या तोंडावर हात ठेऊन ) अरे चोरा! मला काय पिळून काढावयाचा बेत केला आहेस होय?

ज०—साखरभात दोन शेरांचा; वांगीभात दोन शेरांचा; बटाटेभात शेराचा; पांढरा भात मात्र अडेश्रीचा;—

ध०—( पुनः त्याचें तोंड दाबून धरून ) अजून आणखी बडबड?

वि०—( जगन्नाथास ) तुझ्या मतांत काय सर्वांना ठार मारावयाचं आहे वाटतं! अरे, दादासाहेब जे या मंडळींना मोठ्या प्रेमानं आमंत्रण करणार ते तरी काय सर्वांना अजीर्ण होऊन त्यांचा प्राण जावा ह्मणून? " भुकी राखी अर्धा कोन " हें भिऱ्या एवढ्या पोरांना देखील ठाऊक आहे किंरे गाढवा? तसंच " अन्न तारक व अन्न मारक " असं सारे वैद्य देखील रात्रंदिवस कपाळकूट करीत असतात. व—

ध०—अहाहा! कसं सोन्यासारखं भाषण करितो आहे!!

वि० जगन्नाथ, मी तुला खात्रीनं सांगतों कीं असा हा अधाशीपणा व तोही खाण्याच्या कामांत करणं ह्मणजे शुद्ध यमाजी भास्कराच्या घरीं आपण होऊन जाण्यासारखं आहे. ह्मणून ज्यांना आह्मीं मित्रत्वाच्या नात्यानं मेजवानी देणार त्यांना अत्याग्रह करतांच उपयोगी नाहीं. परवांच रे मी कुठंसं वाचलं आहे!—काय बरं तें?—हां! " आपण खाण्यासाठीं जगूं नये तर जगण्यासाठीं खावं. "

ध०—अरे गद्ध्या जग्या, पहा हा कसा बृहस्पति सारखा भा-

पण करितो तो ! नाहींतर तूं ! आज कैक वर्षं माझ्या सहवासास आहेस, पण वेट्या, काटकसर ह्मणजे तुझ्या गांवींही नाहीं. विश्वासराव, किती गोड तुझी वाणी ही ! ये ये मला घट्ट आलिंगन दे ! ये रे ! छेः मला राहवत नाहीं. ( आलिंगितो. ) हें फक्त तुझ्या त्या मर्थांच्या वाक्या करतां बरं ! आजन्मांत मी असं सर्वोत्कृष्ट वाक्य कधींही ऐकिलं नव्हतं. कसं कसं ह्मटलंस ? "आपण खाण्यासाठीं जगावं, जगण्यासाठीं खाऊं नये." छे छे, असं नव्हे तें कसं तें फिरून सांग पाहूं !

वि०—"खाण्यासाठीं जगूं नये जगण्यासाठीं खावं."

ध०–( तीन तीनदां तेंच वाक्य घोंकतो. ) ऐकलंस कां जग्या ? हें कोणत्या महापुरुषाचं ह्मणणं आहे रे विश्वासराव ?

वि०—तें माझ्या नीटसं लक्षांत नाहीं.

ध०—कांहीं हरकत नाहीं. तुझ्याजवळ एकदा कागदाचा चिठोरा असेल, तर त्यावर हें वाक्य नीट लिहून ठेव. विसरूं नकोस ! मग मी तें आमच्या स्वयंपाक घरांतील भिंतीवर कोळशानं मोठ्या अक्षरांनीं लिहून ठेवीन.

वि०—ठीक आहे ! दादासाहेब, हे असले रडत राऊत घोड्यावर स्वार काय कामाचे ? हा मेजवानीचा थाट मीच आपल्याशिरावर घेतों ह्मणजे बरं. असं केल्यानं अगदीं होतां होईल तों हात आखडावयास सांपडेल.

ध०—कां होईना !

ज०—( मनांत ) फार उत्तम झालं. औषधावांचून खरूज गेली. मला तरी काम करावयाची कुठं हौस आहे ?

ध०--पण, विश्वासराव, हें नीट लक्ष्यांत ठेव बरं कां? कीं पदार्थ मंडळींना आवडतील असेच करावयाचे. पण त्यांत गोम ह्मणून इतकीच ठेवावयाची कीं त्यांना ते फार न जातील असे बनवावयाचे. घ्यावे सारखे तर वाटावे घेतले तर जाऊं नयेत. त्याच प्रमाणं श्रीखंडांत साखर इतकी दडपून घाल कीं पहिल्या घांसासरसी मिठीच बसली पाहिजे. वांगी भातांत तिखटाची रेलचेल. पहिल्याच घांसाला झणझणलं पाहिजे.

ज०--( आपल्याशीं ) वा: खाशी युक्ति ! !

वि०--आपण अगदीं काळजी करूं नका. तें सर्व माझं काम.

ध०--जग्या, आतां तूं माझी गाडी झाडून पुसून स्वच्छ कर जा.

ज०--हें आपण गाडीवाल्या जगन्नाथाला सांगतां आहां वाटतं? थांबा तर क्षणभर ! ! ( अंगांत गाडीवानाचा डगला अडकावितो. ) काय ह्मणतां दादासाहेब?

ध०--मी तुला असं सांगतों कीं, माझी गाडी धुवून पुसून स्वच्छ कर. घोड्यांवर सामानसुमान घालून जत्रेला जाण्याची तयारी करून ठेव.

ज०--काय घोडे तयार करूं? नशीब माझं ! ! दादासाहेब, देवाची शपथ हो, त्यांना आतां एक पाऊलही उचलावयाची ताकद नाहीं. आतांशा त्यांना रोजच्या रोज उपास पडताहेत. ते आतां इतके रोड झाले आहेत कीं, त्यांना आतां हाडांचे सांपळे ह्मटलं तरी चालेल.

ध०--अरेरे ! ! ! तर मग फारच वाईट झालं ह्मणावयाचं.

पण काय रे, त्यांना हल्लीं कांहीं एक काम नसून ते इतके रोड रे कशानं झाले ?

ज०—कांहीं काम नसलं ह्मणून त्यांच्या पोटाला नको वाटतं ? गरीब बिचारे प्राणी ! त्यांना खायला यथेच्छ घालून त्यांच्याकडून काम करून घेतलं तर ते खासे लठ्ठ दिसतील. दादासाहेब, त्या बिचाऱ्या प्राण्यांच्या रोड शरीराकडे पाहिलं कीं काळीज कसं करपून जातं. त्यांच्यावर माझं अतोनात प्रेम आहे, ह्मणून मला इतकं वाईट वाटतं. त्यांचं दुःख पाहून माझ्या डोळयांचं पाणी खळत नाहीं. तें दुःख मला सहन करावयास लागतं तरी पतकरतं असं मला वाटतं. प्रत्येक दिवशीं मी उपाशीं रहातों. पण माझ्यांतली अर्धी भाकर मी त्या मुक्या जनावरांना घालतों. अशा प्राण्यांवर दया न करणं हें केवढं निर्दयपणाचं व कठोर अंतःकरणाचं काम आहे याचा विचार तुह्मीच करा.

ध०—तूं ह्मणतोस तें खरं; पण महालक्ष्मीपर्यंत जाऊन येण्याचं कांहीं त्यांना कठिण पडणार नाहीं

ज०—त्यांना गाडीस जुंपावयाची माझी छाती होत नाहीं. अशा स्थितींत त्यांच्यावर चाबूक उचलावयाचा ? इतका कठोरपणा नाहीं माझ्यानं होत ! हरहर ! ! त्यांच्या आंगांत ताकद नसतांना बळंच त्यांच्याकडून काम करून घेणं हा मूर्खपणा नव्हे काय ? त्यांच्यानं गाडी ओढवेल असं का वाटतं तुह्मांला ? त्यांचं पाऊलच जर त्यांना उचलत नाहीं, तर ते गाडी काय ओढणार ?

त्रि०—दादासाहेब, जाऊं द्या त्याला. मी त्या शेजारच्या रामजीला बोलावतों. तो गाडी हांकण्याच्या व स्वयंपाक करण्याच्या अशा दोन्ही कामांत पटाईत आहे.

ज०—कां आणावा ? ते दुसऱ्याच्या हातून मेलेले बरे ! माझ्या हातून न मरोत !

वि०—जगन्नाथ मोठा समजूतदार आहे खरा !

ज०—आणि आपणही मोठे परीक्षक आहां खरे !

ध०—गप्प बैस मूर्खा !

ज०—दादासाहेब, हा असला तोंडपुजेपणा मला बिलकुल आवडत नाहीं. हा पाजी मनुष्य जें कांहीं करतो तें सर्व आपल्याला खुष ठेवण्याकरितांच ! अहो, भाकरी, भात, चटणी, मीठ, फार काय सांगूं दारापुढं शेण पडलं तरी त्यावर सुद्धां याची नजर आहेच. मी आपल्याला खात्रीनं सांगतों कीं कंजुषपणामध्यें याची कडी तुमच्या वर आहे. तुमच्याविषयीं गांवांतले लोक इतकं कांहीं वाईट बोलतात कीं, तें, शिवशिव, माझ्यानं ऐकवत सुद्धां नाहीं ! आपण मला इतके जरी कठोरपणानं वागवितां, तरी आपल्याबद्दल माझ्या मनांतली पूज्यबुद्धि अगदीं कायम आहे. घोड्यांविषयींचा विचार सोडून द्याल, तर तुमच्या सारखा मनुष्य साऱ्या दुनियेंत मिळणार नाहीं असं वाटतं.

ध०—लोक असं मला काय काय ह्मणतात रे

ज०—आपण जर रागावत नसाल तर सांगतो.

ध०—छेः राग कसला रे खुळ्या ? सांगितलंस तर तुझे माझ्यावर उपकार होतील.

ज०—छेः दादासाहेब, तें ऐकिलं कीं आपणांला राग येणार व माझी पाठ मऊ होणार.

ध०—वेडा आहेस तूं. लोक आपल्या विषयीं काय ह्मणतात हें समजलं तर मला फार आनंद होतो.

ज०—काय सांगूं दादासाहेब, प्रत्येकजण आपल्याला हंसत असतो. आपला हा कंजुषपणा पाहून जो तो आह्मांला थट्टेंत ह्मणा किंवा खरेपणानं ह्मणा हवे तेथें, हवे तसे टोमणे मारितो. आपल्या कंजुषपणाच्या गोष्टी निघाल्या ह्मणजे त्यांत सर्वांचं अंतःकरण कसं तल्लीन होऊन जातं. एक ह्मणतो, अहो दादासाहेबांनीं मुहूर्त वगैरे पाहण्या करितां आपल्या स्वतःचीं निराळींच पंचागं करून ठेविलीं आहेत. तीं छापवून जगांतील कृपण मनुष्यांवर उपकार करावा असा त्यांचा बेत आहे. तीं पंचागं दुसऱ्या मनुष्यांच्या उपयोगी नव्हत. लोकांच्या पंचागांत महिन्यांतून दोनच एकादशा असतात, तर त्यांच्या पंचागांत आपल्या सात आठ एकादशा, पांच सात प्रदोष; दहा बारा सोमवार; इत्यादिकांची अगदीं रेलचेल आहे. व हे इतके उपास घरच्या प्रत्येक माणसानं व जनावरानं केलेच पाहिजेत अशी त्यांची सक्त ताकीद आहे. असं केल्यानं काय होतं ह्मणाल, तर भोजनखर्च वांचतो. दुसरा ह्मणतो, अहो, ते सणावाराच्या दिवशीं पोळी घालावी लागेल ह्मणून चाकरमाणसांना कांहींना कांहीं निमित्त सांगून बाहेर काढून लावितात. तसेंच, त्यांची चाकरीची मुदत संपत आली कीं त्यांच्या बरोबर विनाकारण भांडून, रागावून त्यांना घराबाहेर घालवून देतात. ह्मणजे त्यांचा पगार द्यावा लागत नाहीं. परवां एकजण सांगत होता, कीं शेजारच्या घरचं मांजर घरांत शिरलं व शिंक्यावरचं दूध प्यालं. त्याबरोबर दादासाहेबांनीं सरकारांत फिर्याद ठोकली ! कालच एकजण ह्मणाला कीं, परवां रात्रीं दादासाहेब पागेंत गेले, व तेथें घोड्यांचा तोबऱ्यांत उरलेले फार दिवसांचे उष्टे हरभरे गोळा करूं लागले. इतक्यांत त्यांचा मोतद्दार ह्मणजे मी

उठलों व चोर असावा अशा भ्रांतीनें मी तुह्माला अंधेरांत मारे कोर-ड्याखाली झोडपून काढिलें! पण धन्य आहे दादासाहेबांची! ते ह्या-बद्दल मला एक अवाक्षरही बोलले नाहींत. अशा एकना दोन, हजारों लोक हजारों गप्पा ठोकितात. त्या सांगून काय उपयोग? आपण आ-हांत तोपर्यंत आह्मांला बाहेर तोंड काढावयास लाज वाटते. सर्व लोक आपल्याला हंसून रहात नाहींत तर कृपण, चिकू, नीच, हलकट, कवडीचुंबक, कंजुष, अशा फार गोड विशेषणांनीं आपली पूजा करीत असतात.

ध०–( रागानें स्वाचा बदलून ) तूंच हरामखोर, मूर्ख, गाढव, लुच्चा, पाजी, मनुष्य आहेस.

ज०–हें हेंच पहा! तरी मी आपल्याला पूर्वींच सांगत होतों कीं जर मी खरं सांगितलं तर आपण रागावणारच ह्मणून!

ध०–जग्या मादरचोदा, तुला बोलायला अगदीं समजत नाहीं. शिक शिक तें या विश्वासरावापासून. नंतर माझ्याशीं बोलूं लाग. म-ध्यंतरीं जर बोलूं लागशील तर मुसकूट फोडून टाकीन गुलामा! वि-श्वासराव, जा याला घेऊन. नीट समजून दे. ( धनाजीराव एका बाजूनें व विश्वासराव व जगन्नाथ दुसऱ्या बाजूनें जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळ–धनाजीरावांच्या घरांतील सोपा

( जगन्नाथ व विश्वासराव प्रवेश करितात. )

ज०–मुसकूट फोडणार ह्मणे! मी कुठं असल्या धमकावणीला

मिणार आहे? लांकडाचं असत तर कदाचित् म्यालों असतों.

वि०-( हांसून ) जगन्नाथ, तुझ्या या निरग्रहपणाचा परिणाम शेवटीं तुलाच भोगावा लागला ह्मणून मला फार वाईट वाटतं.

ज०-अहो शिष्ट, ( गाल चोळीत ) आपण येथून चालते व्हा कसे! माझ्यापुढें येऊन लुच्चेपणा करण्याची आपल्याला बिलकुल जरूर नाहीं. आपणांला जेव्हां असं चवदावं रत्न मिळेल, तेव्हां आपण हांसत बसला, तर खुशाल बसा. पण माझ्याकडे पाहून जर दांत विचकाल, तर मात्र याद राखून ठेवा.

वि०-जगन्नाथ, तूं असा रागावूं नकोस. मी तुझी हवीतर क्षमा मागतों.

ज०-( आपल्याशीं ) हा मला भितो आहेसा वाटतो. तर आपण आतां जरा उग्र मुद्रा धारण करावी. आणि जर कां हा अधिकाधिक भिऊं लागला, तर मात्र दादासाहेबांनीं मला मारलेल्याचा सूड याच्यावर उगवावा! ‘ वड्याचं तेल वांग्यावर ’ असंच पाहिजे या चोराला! ( विश्वासरावास ) अहो, कोठावळे ऊर्फ लुडबुडेराव ऊर्फ पाजीपंत, ही वेळ हांसण्याची नव्हे हें आपल्या लक्षांत आलं नाहीं वाटतं? मला एवढं तरी हंसूं येतं कां पहा? जर आतां तूं मला अधिक खवळशील तर मग तुला हंसण्याची दुसरीच तऱ्हा दाखवीन. आतां दांत विचकतोस त्यावेळेस भोंकाड पसरावं लागेल! ( त्याला मागें ढकलतो. )

वि०--अरे मूर्खा, हळू ढकल!

ज०-कोणरे मूर्ख? तुझा बाप असेल! आणि हळू ढकलूं? तें कां बरं? मला तसं करावंसं वाटत नाहीं तर?

वि०—हें असं रे काय करतोस?

ज०—कसं रे करितों? तूं अतिशय उद्धट, गाढव मनुष्य आहेस !

वि०—जगन्नाथ——

ज०—जगन्नाथ बिगन्नाथ कुजची जानता नाहीं ! गप्प बैस. माझ्या बरोबर बोलूं नको, ह्मणून मी तुला तीनतीनदां बजाऊन सांगतों आहे. एकदां जर कां मी हातांत काठी घेतली तर मरेमरेपर्यंत झोडपून काढीन सांगून ठेवतों.

वि०—( रागावून ) काय करणार रे तूं काठी घेऊन? ( त्याच्या आंगावर जाऊन त्याला ढकलतो. )

ज०—( भिऊन ) छेः काठी घेऊन मी काय करणार आहे ! मी त्या विषयीं मुळीं नांवसुद्धां काढीत नाहीं !

वि०—काय रे ए पाजी, माझ्या मनांत आलं तर तुझा खरपूस समाचार घेण्याजोगी ताकद माझ्या अंगांत आहे, हें तुला माहीत आहे ना?

ज०—( भिऊन ) आहे बुआ !

वि०—तूं भाडेकरी गाडीवान असून आचाऱ्यांतला एक पायपोस-खाऊ आहेस हें तूं अद्यापि नाहीं ना विसरलास?

ज०—छे छे. तें मी कसा विसरेन बरं? माझी पदवीच आहे ती !

वि०—आणखी माझी मात्र योग्यता तुझ्या लक्षांत येत नाहीं अं?

ज०—हें पहा विश्वासराव, मी तुमची मनापासून क्षमा मागतों.

वि०—तूं मला मारणार होतास नाहीं कां?

ज०—छेहो ! मी उगीच थट्टेनं तसं बोललों !

वि०—( त्यास बडवून ) ही असली थट्टा मला आवडत नाहीं. व त्यापासून असे परिणाम होतात हें नीट लक्ष्यांत ठेव. ( जातो. )

ज०—(आल्याशीं ) आग लागो यांच्या हातांला ! थट्टा ह्मणतां ह्मणतां यानं मला खरंच मारलें किंहो ? हें नाहीं मी सहन करणार. कधीं तरी सूड घेईनच घेईन. आज आपली आह्मी झक मारिलीनी खरं बोललों. आजपासून जर एक खरा शब्द तोंडांतून काढीन तर शपथ ! दादासाहेबांनीं मला मारलं याचं नाहीं मला फारसं वाईट वाटत. पण या गाढवाला मला मारण्याचा काय अधिकार होता ? बरं आहे पाहून घेईन. ( जातो. )

## प्रवेश ३

स्थळ—धनाजीरावांचें घर.

[ पार्वती व मथुरा बसल्या आहेत. ]

म०—मला तर बाई, इथं आल्या पासून कसंसंच वाटूं लागलं आहे. भीतीनं ऊर किनई अगदीं धडधडतो आहे !

पा०—इश्श ! इथं ग तुला भीति कशाची वाटते ?

म०—हें कांहीं सांगायला कां पाहिजे ? अहो, ज्या शस्त्रानं आपला घात होणार, त्याच्याकडे पाहिलं ह्मणजे नाहीं कां भय वाटणार ? ह्मणूनच धनाजीरावा बरोबर माझं लग्न लागायचं हें मनांत आलं किनई ह्मणजे वाईट वाटतंच. तशांतून आपण त्यांच्या घरीं आलों आहोंत. मी कांहीं येणार नव्हतें, पण आईनं सांगितलं ह्मणूनच आलें बरं !

पा०—खरंच बाई ! त्यांच्याशीं लग्न लावण्यापरीस विहिरींत उडी टाकणं बरं ! हल्लीं तुझं चित्त ताळ्यावर नाहीं, हें मला समजतें हो ! मला वाटतं तो परवांचा तो—तूं सांगितलास तोच—तुझ्या मनांत घोळत असावा ! नाहींग घोळत ?

म०—( लाजून ) हें कशावरून तुम्हीं जाणलंत पण ?

पा०—अग तुझ्या मुद्रेवरून ! नुसत्या मुद्रेवरून अंतःकरणांतलं सारं समजतं !

म०—खरंच गडे ! माझ्यानं आतां नाहीं ह्मणवतच नाहीं. ते किनई वारंवार आमच्या घरीं येतात. व घटका दोन घटका आईशीं बोलत बसतात. त्यांची चालचालणूक पाहून माझं मन कसं अगदीं वेडं झालं आहे !

पा०—पण तो आहे तरी कोण ?

म०—तें नाहीं बाई मला ठाऊक. पार्वतीबाई, मी जर स्वतंत्र असतें, तर खचित त्यांच्याबरोबरच लग्न केलं असतं. धनाजीरावांत व त्यांच्यात किती तरी अंतर !

पा—( मनांत ) प्रतापरावाविषयीं गोष्ट काढायला ही संधि बरी आहे. ( उघड ) पण त्यांच्याहीहून एखादा सुंदर व गुणी पुरुष तुला दाखवून दिला तर ?

म०—नको ग बाई ! माझं मन एके ठिकाणीं गुंतलं आहे, तेवढंच पुरे ! आतां तें प्राण गेल्यानेंही ढळणार नाहीं. करायचं तर त्यांच्याशींच लग्न करायचं; नाहींतर आंच मरायचं !

पा०—पण बाई नीट विचार कर हो ! हीं अमलीं उल्लू पोरं वरून चांगलीं गोजिरवाणीं दिसतात, चांगलं गोड बोलतात, पण

घरांत झटलं तर अठराविश्वे दरिद्र! त्यांच्यापेक्षां श्रीमंत ह्यातारा नवरा बरा बाई! आता ह्यातान्या पासून थोडा त्रास होईल व अंमळ अडचणीही सोसाव्या लागतील हें खरं. पण सारा जन्म काहीं असाच जायचा नाहीं. सुदैवानं ते थेरडावा लवकरच गाशा गुंडाळतील. मग काय दुधांत साखरच! मग काय एकदां पैसा हातांत आला कीं मना जोगता दुसरा नवरा पाहून पाट लावावा ह्मणजे झालं!

म०—इश्श! हें काय बोलणं!! जळो तो मेला पैसा आपल्याला सुख व्हावं ह्मणून दुसऱ्याचं मरण चिंतावं ही रीत कोण बाई!

पा०—अहाहा!–नको असं ओढून ताणून चंद्रबळ आणायला! ह्यांच्याशीं तुझं लग्न तर होऊं दे कीं पहा दोन तीन महिन्यांच्या आंतच—

म०—आंतच काय?

पा०—अग, जाईल उलथून मेला! मग काय? मथुराबाई सरदारणीच्या स्वरूपासाठीं व पैशासाठीं हवे तितके गेले गोंडा घोळायला तयार होतील! अगबाई! धनाजिरावच इकड आले वाटतं?

म०–इश्श ग बाई! कायग बाई तरी हें मरत मढें? एखादं माकड देखील बरं असतं. (धनाजीराव येतो.)

ध०—सुंदरी, ही मी चाळशी घातली आहे, ह्मणून कांहीं वाईट वाटूं देऊं नको. तुझ्या सौंदर्याविषयीं शंकाच नाहीं. तें ह्मणजे चाळशी लावून निरखून पाहिलं पाहिजे असं मुळींच नाहीं. परंतु आकाशांत जशी चमचमणारी चांदणी असते, तशीच तूंही या मृत्युलोकची चांदणीच आहेस. म्हणून आकाशांतील चांदणी जर तिचें खरं स्वरूप समजण्य करितां दुर्बिणीतूनच पहावी लागते, तर तुलाही तसंच पाहिलं पाहिजे. म्हणूनची ही चाळशी घातली आहे नाहींतर तूं रागावशील एखादा म्हणूनच सांगतों. पारू, अग ही कांहींच बोलत नाहीं! मला असं वाटतं

कीं सूर्य जसा न बोलतां गपचुप रीतीनें लोकांना दिपवीत आकाशांत संचार करितो, तद्वत ही ही मुकाट्यानच मला दिपविते.

पा०–( त्यास एकीकडे ) अहो, तिला अजून अनोळखी मनुष्या-बरोबर बोलण्याची संवय नाहीं, ह्मणून ती लाजते झालें ! तरुण मुलीं-च्या अंगीं अशी मर्यादा असली तर ती त्यांना शोभून जाते. पहिल्या खेपेला या अशाच करावयाच्या ! एकदां तुमची तिची ओळख तर होऊं द्या कीं मग पहा ती कशी चुरुचुरु बोलते.

ध०–खरंच तें ! ( मथुरेस ) ही पाहिलीस कां माझी मुलगी तु-झाच भेटायला इकडे येत आहे. ( अहिल्या येते. )

म०–अहिल्याबाई, शेजारीं असून मी तुह्मांला इतके दिवस भेटलें नाहीं ह्मणून रागावूं नका बरं? मी तुमची क्षमा मागतें. मी केव्हांच यायची ! पण आई आजारी होती त्यामुळं नाहीं बनलं !

ध०–किती मधुर भाषण हें?

अ०–मी नाहीं रागवलें बरं ! मला जर अशी नड असती तर मी देखील असंच केलं असतं. खरं ह्मटलं तर मींच तुह्मांला आधीं येऊन भेटावं ! नाहीं आलें हा माझाच दोष.

ध०–( अहिल्येस ) कशी शहाणी आहे पाहिलंस ना? वाईट एवढं तरी बोलतें कां? नाहींतर तूं—

म०–( पार्वतीस एकीकडे ) किती ग बाई तोंडाची वस्सदिशीं घाण येते जळ्ळी !

ध०–( पार्वतीस ) काय ह्मणणं होतं आहे?

पा०–ती ह्मणते कीं आपण कसे अगदीं सर्व गुणांनीं पूर्ण आहां.

ध०–( हात जोडून ) हे देवी, तूं हा जो मला मान दिलास त्या-बद्दल हा दास तुझा फार फार ऋणी आहे.

म०–( एकीकडे ) काय ग बाई तरी विलक्षण प्राणी हा?

ध०–खरोखर हे तझे उदात्त विचार ऐकून माझ्या मनाला फार आनंद होत आहे. अशा लहान वयांत असले पोक्त विचार! फारच योग्य.

म०–( पार्वतीस ) पार्वतीबाई, हें नाहीं मला आतां खपत. चला मला वरीं घेऊन. ( प्रतापराव येतो. )

ध०–हा पहा माझा मुलगाही तुझा आदर करण्याकरितां आला.

म०–( एकीकडे पार्वतीस ) अगबाई! पार्वतीबाई! हा पाहिलात कां नशिबाचा कसा योग आहे तो! मी ज्यांच्या विषयीं तुम्हांला सांगत होतें, तच हे! ( लाजून बाजूस होते. )

पा०–असंं असं!! तरीच! मला वाटलं तेंच खरं!

ध०–सुंदरी, माझीं मुलं इतकीं मोठीं असून अजून लग्नावांचून राहिलीं आहेत, याचं तुला आश्चर्य वाटलं पण लग्नाचं काम एकाएकी जमून येत नाहीं म्हणूनच राहिलं. आतां मात्र त्यांची लग्नं मी लवकरच करणार आहे.

प्र०–[ मथुरेकडे पाहून आपल्याशीं ] अहाहा! असा हा योग जुळून येईल असं स्वप्नांत देखील वाटलं नव्हतं. तथापि परवां बाबांनीं आपला कांहीं विचार मला कळविल्यामुळं मला फार असमाधान झालं आहे.

म०–( आपल्याशी ) हें असं होणार हें मला आधीं कळलं असतं तर फार चांगलं झालं असतं. जळ्ळी ही साडी सोडून पैठणी किंवा परवांची चंद्रकळा तरी नेसून आलें असतें.

ध०–( कानोसा घेऊन ) बागेकडे गलबला कसला बरं होत आहे? जाऊन पाहिलं पाहिजे. ( उघड ) मी अंगळ जाऊन येतों अं.

[ जातो. ]

प्र०—( तिला ) खरोखर, बाबांनीं तुझा परामर्ष घेण्याच्या कामीं माझीच योजना केली, हें पाहून मला फार संतोष होतो. परंतु—

ध०—( येऊन बाजूस उभा रहातो. ) तिकडलं सर्व यथास्थित आहे. पण इकडे आमचे सुपुत्र काय ह्मणतात तें ऐकूं.

प्र०—परंतु जर कां आमच्या बाबांचं लग्न आपल्याशीं व्हावं अशी तुझी इच्छा असेल, तर मात्र या प्रतापाच्या संतोषाचं निर्मूलन आतांच झालं असं समजलं पाहिजे. तसा तुझा उद्देश असल्यास त्या नात्यानं मान राखणं माझ्या हातून होणार नाहीं. व तसा उद्देश तुझ्या मनांत असेल असं मलाही पण वाटत नाहीं. कांहीं मंडळींना हें माझं बोलणं कडू लागेल. पण त्याची खरी किंमत तूं जाणतेस असं मी समजतों. तुझा बाबांशीं जर विवाह झाला तर माझी अवस्था काय होईल याचा तूं पुरता विचार कर. मी कोण, कोणाचा, काय करतों हें सर्व तुला आतां कळलंच आहे. आणखी तुला खात्रीनं सांगतों कीं, मी तुझं लग्न बाबांशीं कधींही होऊं देणार नाहीं.

ध०—( एकीकडे ) काय उद्धटपणाचं भाषण हें ? आणि तेंही तिच्याशीं ? धन्य आहे असल्या मुलांची ! ! !

प्र०—कां मुग्धपणा कां ? एकदां मनांत काय आहे तें समजलं ह्मणजे बरं.

म०—( पार्वतीस ) मी काय सांगूं बाई ? जसं आपल्याला वाटतं तसं लोकांनाही वाटायचं ! एवढं समजून स्वस्थ बसावं !

ध०—( एकीकडे ) तिचं ह्मणणं रास्त आहे. मूर्खपणाच्या भाषणाला अशाच खडखडीत जबाब पाहिजे. अरे कारट्या, आतां

तरी स्वस्थ बैस. हा कारटा किती उद्धट आहे पहा ! बेत्याला कोणापाशीं कसं बोलावं हें मुळींच समजत नाहीं.

पा०—( थट्टेनें ) कां प्रतापराव, ही मुलगी कोणच्या निमित्तानं वाड्यांत आली आहे आणि तुली चालविलंय काय याची कांहीं शुद्धि आहे कां ? दादासाहेबांना कळलं तर काय ह्मणतील ?

प्र०—पार्वतीबाई, तुमच्या सारखा पोक्तपणा लहान वयाच्या माणसांत कसा येईल ?

ध०—( एकीकडे ) माझ्या कारट्याच्या अंगीं पोक्तपणा नाहीं ह्मणते, पण तेंही खुबीनं ह्मणते. आणि त्याच्या छिचोरपणा लक्ष्यांत आला असूनही त्याबद्दल रागावत नाहीं. यावरून ही मोठी खुबीदार व क्षमाशील बायको दिसते.

प्र०—मला असलं पडद्यांतलं बोलणं नको. एक घाव कीं दोन तुकडे. मी तुझ्या आईला भेटायला येतो, तेव्हां मात्र उभयतांची दृष्टादृष्ट होते. तेवढ्यावरून उभयतांच्या मनांत काय आहे याची परस्परांना कल्पनाच असेल. व असा हा समक्ष भेटीचा महा योग जुळून आला असतांही जर खुलासा होणार नाहीं तर याहून अधिक दुर्दैव तें कोणतं ?

म०—( पार्वतीकडे तोंड करून ) एक निश्चय असेल तर पाहिजे तें होईल. तोच जर नसेल, तर मग जळ्ळं बोलून तरी काय उपयोग ?

प्र०—माझा तर निश्चयच आहे कीं, लग्न लावीन तर तुझ्याशींच. नाहीं तर आजन्म तसाच राहीन.

म०—( पार्वतीस ) अगबाई ! किती घोर प्रतिज्ञा ही ! ! इतका दृढनिश्चय असल्यावर मग देव तरी पावल्या शिवाय कसा राहील ?

ध०—( रागानें पुढें येऊन ) अहारे दृढनिश्चयाच्या पुतळ्या ! ! " तेरड्याचा रंग तीन दिवस " ह्मणतात तशी अवस्था ! उल्लू कारटी तोंडास येईल तसं भकतात. याला लाज तरी वाटते कां पहा ! कारट्या, अजून तरी ही तुझी चाल रीत बदल !

वि०—( बाहेर येऊन ) हां. आलं लक्ष्यांत. हा सगळा घोटाळा प्रतापरावाचाच. तरी ह्मटलं दादासाहेब इतके कां ओरडताहेत ?

ध०—तुझ्या मनांतले हे सर्व दुष्ट हेतु सोडून दे. व तिच्याशीं अगदीं निराळ्या तऱ्हेनं बोल.

प्र०—ठीक आहे बाबासाहेब ! आपली जर तशी इच्छा आहे तर मी आपली चालरीत बदलून तिच्याशीं निराळ्या तऱ्हेनं बोलतों. सुंदरी, मी आतां माझे बाबा धनाजीराव आहेत अशी कल्पना कर—व मी काय ह्मणतों तें नीट ऐकून घे. खरोखरच हे देवी, तुझ्यासारखी सौंदर्यलतिका या त्रिभुवनांत दुसरी कोणीही नसेल. तुझा हा सुकुमार देह, ही सुवर्णा सारखी कांति, हा ओंठांचा लुसलुशीतपणा, हें सरळ नाक, या धनुष्याकार भृकुटी, हें विशाळ कपाळ, हे काळेभोर भुंग्यांसारखे केश, हे हरणी सारखे नेत्र, सिंहासारखी बारीक कटी हीं सर्व पाहून स्वर्गींच्या अप्सरा देखील लाजतील. तुझ्या संनिध राहून सांनिध्यजन्य सुख भोगावं हीच कायती माझी इच्छा ! तुझा पति होणं हाच माझा थोरपणा व तूं माझी अर्धांगी होणं हेंच माझं वैभव ! ! ! मोठमोठे राजे, राजपुत्र यांच्य

नशीबीं सुद्धां विधात्यानं असलं अनुपम सुख लिहिलं नसेल. मला असं वाटतं कीं, तूं एकदां माझी झालीस कीं, विधात्यानं लपवून ठेवलेला सौंदर्याचा अमूल्य निधीच मला प्राप्त झाला असं मी समजेन. तुझ्याशीं विवाह करून तुलाच आपली, धर्मपत्नी व सहचारिणी ह्मणावं हीच काय ती माझी महत्वाकांक्षा. व हीच काय ती माझी जन्मास झाल्याची इतिकर्तव्यता ! मग–;

ध०—( रागानें ) अरे कारट्या, काय बडबडतो आहेस हें ?

प्र०—मी तुमच्याबद्दल तुमच्या वतीनं या देवीला आळवून प्रसन्न करून घेत आहें.

ध०—( दांतओंठ खाऊन ) गाढवा, माझं तोंड कांहीं कोंकणांत गेलं नाहीं ! माझी जीभ काय झडून पडली आहे ह्मणून तूं माझ्या वतीनं बोलणार ? मला तुझ्यासारखा गाढव वकिलांची मुळींच जरूर नाहीं. अरे कोण आहेरे तिकडे ? तें तरट घेऊन या.

पा०—नको दादासाहेब. बोलण्यानं बोलणं वाढेल. वेळ फार झाला. आधीं जत्रेला जाऊन येऊन जेवण आटपूं व नंतर बोलत बसूं.

ध०—ठीक आहे. कोण आहे रे तिकडे ? गाडी तयार करून घेऊन या. बोलण्याच्या नादांत पुष्कळ वेळ होऊन गेलो. अरेरे ! आतां जेवण करून गेलां तर जत्रेला उशीर होईल. खरी मौज ती उशिरानं पहावयास सांपडणार नाहीं. ह्मणून मग येऊनच जेवण-करावं हें चांगलं. कांहीं खाऊन पाणी प्यालां असतां, तर बरं झालं असतं. आतां बाजारांतून कांहीं आणलं तर उशीर होईल. तोंपर्यंत पानंसुद्धां मांडून तयार होतील.

म०—छेः असा कितीसा उशीर होणार आहे?

ध०—पण आतां बाजारांतून फळफळावळ, मिठाई वगैरे आणवावयाची ह्मणजे उशीर होणारच!!!

प्र०—त्याची अगदीं काळजी करूं नका. मी सर्व व्यवस्था केली आहे. पद्माणा लंब्याच्या दुकानांतून जवारी सामान व अबदूल बागवानाच्या दुकानांतून, अननस, खरबुज नारिंग, अंजीर, आंबे, पेरू, इ० फळफळावळ तुमच्या नांवावर उधार आणवून ठेविली आहे.

ध०—( एकीकडे विश्वासरावास ) पाहिलंस ना हें या कारट्याचं कृत्य?

वि०—खरंच याचं डोकं अगदीं भकून गेलं आहे.

प्र०—काय बाबा, इतकी फळफळावळ पुरणार नाहीं असं आपल्याला वाटतं कीं काय! ( मथुरेस ) तर मग आपण बाबांवर घुस्सा करूं नका. तो अपराध माझा आहे.

म०—हें काय बाई बोलणं!

प्र०—( मथुरेस ) काय हो पण, आमच्या बाबांच्या हातांत आहे, तसली हिऱ्याची आंगठी आपण कधीं तरी पाहिली होती का? कशी चमकदार आहे, पहा तर खरी!

म०—खरंच बाई! अगदीं नक्षत्रासारखी आहे!

प्र०—( बळेंच धनाजीरावाच्या हातांतून काढून ) पहा तर खरी! अगदीं जवळून पाहिल्यावर फारच उत्तम दिसते. ( देतो. )

म०—अगबाई! किती सुंदर आहे पण!! इचं तेजच कांहीं विलक्षण आहे! हां ध्या परत. ( देऊं लागते. )

प्र०—छेः छेः नको, नको ! ! ती आपल्याच सुंदर हातांत असूं द्या. ती बाबांनीं तुझांला नजर केली आहे.

ध०—कोणीं मीं?

प्र०—बाबा, तुमच्याकरितां त्यांनीं ती आंगठी आपल्या हातांत घालावी असं तुह्मांला वाटत नाहीं काय?

ध०—काय ह्मणतोस?

प्र०—खरोखर हा मोठाच चमत्कार आहे ! ( मथुरेस ) अहो, ठेवा ती तुमच्याच हातांत. ती तुह्मी परत न करावी अशी त्यांची इच्छा आहे. व ती घेण्यासाठीं आग्रह कर ह्मणून ते पहा मला आंतल्या आंतच खुणावताहेत ! ( धनाजीरावास ) मी त्याची सर्व व्यवस्था करितों. तुह्मी अगदीं निश्चिंत असा !

म०—मी नाहीं बाई—

प्र०—माफ करा. ते कांहीं आतां ती परत घेणार नाहींत. एकदां त्यांनीं दिली ती दिली.

ध०—( एकीकडे ) काय करूं रे? हा कारटा कसा दिवठा, घरबुडवा निपजला पहा ! मला सर्वस्वी बुचाडतो आहे.

म०—पण मी असं ह्मणतें—( देऊं लागते )

प्र०—नका नका. कांहीं ह्मणूं नका व परतही देऊं नका. तसं केलं तर आपला अपमान झाला असं वाटून ते कदाचित रागानं लाल होतील.

म०—पण माझं ऐकायचं—

प्र०—नाहीं बिलकुल ऐकायचं नाहीं.

ध०—( एकीकडे ) मरूं दे शिंचा कारटा !—

प्र०—तुह्मी नको नको ह्मणून परत करतां ह्मणून पहा त्यांच्या अंगाचा कसा संताप झाला आहे तो !

ध०—अरे चांडाळा—

प्र०—पहा ते आतां अगदीं निराश झाले आहेत. त्यांची मुद्रा तरी पहा कशी कावरीबावरी दिसते ती ! ह्मणा तर होय व घ्या ती ठेवून कशी !

ध०—अरे गाढवा प्रताप्या,—

प्र०—खरोखर बाबा, हा कांहीं माझा अपराध नव्हे. मी त्यांना एकसारखा आग्रह करीत आहे. पण त्यांचा दुराग्रह सुटत नाहीं याला मी काय करूं? तुमचें औदार्य त्यांना माहित नाहीं ह्मणून त्यांना भीति वाटते.

ध०—अरे अगदींच हरामखोर आहे हा ! ( रडकुंडीस येऊन ) विश्वासराव—

प्र०—हें पाहिलं ? आपण त्यांची विनंति मान्य करीत नाहीं ह्मणून आह्मांला मात्र मधल्यामध्यें शिव्या !

ध०—अरे नीचा—

प्र०—आतां जर अधिक ओढूनताणून आणाल तर त्यांचा संताप अगदीं विकोपाला जाईल बरं !

पा०—हेंग काय ? त्यांना आग्रहच आहे, तर घेईनास ती आंगठी !

म०—आपण रागावत असलां तर मी घालतें ही हातांत. आतां ती परत देण्याचा मी विचार देखील मनांत आणणार नाहीं. उगीच संतापूं नका.

प्र०—ठीक. आतां त्यांचं चांगलं समाधान होईल !

सोन्या—( येऊन ) सरकार, कुनी गिरस्त भाइर आलाया ! आपनासंगं बोलायचं हाय ह्मनतुया.

ध०—जा त्याला उद्यां भेटायला सांग.

सो०—पैसा आनलाय त्येनं.

ध०—हां ! थांब तर हा मी आलोंच !

प्र०—बाबा, तोंपर्यंत या सर्वांना घेऊन मी बागेंत बसतों. मग तुह्मी आल्यानंतरच फराळ आटपूं.

ध०—( रागानें ) बागेंत रे कशाला ? घरांत काम कोण पडलं आहे ! आणि निघाला बागेंत गप्पा छाटायला !! या दोघींना घरांत जाऊंदे. अहिल्या एकटीच काम करीत असेल तिला मदत करायला लागतील. तुह्मीहि आपल्या कामाला लागा. ( विश्वासरावास ) या कृत्यांत तूं मात्र विचार करून वाग ! जितकं उरेल तितकं उरीव. ह्मणजे मग तें आपण दुकानदाराकडे परत करूं- त्या कारभ्यासारखा तूं ही उधळेपणानं वागूं नको.

वि०—ठीक आहे.

ध०—( एकीकडे ) अरे कारभ्या, तूं मला बुडवायला पाहतोस काय? ठीक आहे ! !

( सर्व जातात. )

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

स्थल—धनाजीरावांचा वाडा.

[ अहिल्या, मथुरा, व पार्वती काम करीत बसल्या आहेत व प्रतापरावही आहे. ]

प्र०—( पार्वतीस एकीकडे ) पार्वतीबाई, तिला पुनः नीट खोदखोदून विचारून तिचा तेवढा निश्चय काढून घ्या. मी होतों तर बाजूला. ( उघड ) लागलां उद्योगाला? मी अंमळ बाहेर जाऊन येतों अं. ( जातो. )

अ०—खरंच, मथुरा वहिनी—हो! आतां तुह्मी आमच्या वहिनी होणार!—दादांची तुमच्यावर कितीतरी प्रीति जडली आहे ह्मणून सांगूं?

म०—( चिंताक्रांत होऊन ) पण उपयोग काय? मी स्वतंत्र का आहे?

अ०—तुह्मी अशा चिंताक्रांत होऊं नका गडे. अशा कामाला जळीं हजारों विघ्नं यावयाचीं. टांकीचे घांव सोसल्या खेरीज देवपणा कसा बरं येणार? धीर धरा. ह्मणजे सारं मनाप्रमाणं घडून येईल. तुमच्यासाठीं किनई माझा जीव तिळतिळ तुटतो.

म०–माझी तुह्मीं इतकी काळजी करितां हें पाहून मला वाई भारी-च आनंद होतो. माझीही पण तुह्मांला हीच विनंति आहे कीं तुमचें प्रेम आज जसं माझ्यावर आहे, तसंच निरंतर असूं द्या हो! नाहींतर मग माझ्याशीं नणंदेप्रमाणं तुटकपणानं वागायला लागाल! या संकटांत तुमच्या सारखीं माणसं पाठीराखीं असलीं ह्मणजे मी कश्शालाही भिणार नाहीं.

पा०–तुह्मीं दोघंही तशींच! आपलं मनोगत तुह्मी जर मला आधींच सांगितलं असतं, तर काय बरं झालं असतं? या गोष्टी मी इतक्या थराला खचित येऊं दिल्या नसत्या.

प्र०–(आपल्याशीं) मी तरी काय करूं! माझं दुर्दैव ह्मणूनच तुह्मांला हें सांगावयाची मला बुद्धि झाली नाहीं.

पा०–पण आतां तरी तुझा निश्चय कसा काय आहे तो मोकळ्या मनानं सांग पाहूं?

म०–माझा अभागीचा कसला निश्चय घेऊन बसलां आहांत? आणि तो चालून देणार तरी कोण? आह्मी स्त्रिया ह्मणजे जन्मा-पासून परतंत्र! नुसती आशा धरून बसलें आहें. या पेक्षां मी अधिक तें काय करणार?

प्र०–(आपल्याशीं) तर मग आशेपलीकडं दुसरं कांहीं नाहीं? आशा सफळ होण्या सारखी कांहीं खटपट?

पा०–जर तुझी इच्छा आहे, तर ती पूर्ण करून घेण्याला कांहीं खटपट नाहीं का करायची?

म०–मी काय करूं ह्मणतां? सांगाल तसं वागेन. काडी इतकी

चुक करणार नाहीं. आपणच माझ्या जागीं आहांत अशी कल्पना करा. व अशा स्थितींत मला काय करितां येईल, हें आपणच सांगा. तुम्ही मला एखादी भलती सलती गोष्ट न सांगतां अगदीं मर्यादेची व मुलींना साजेल अशीच गोष्ट सांगाल. होय ना? मी भीड, मर्यादा, सारी एकीकडे ठेविली तर लोक काय बरं ह्मणतील? शिवाय माझी आई मला पूज्य नाहीं कां? तिनंच मला लहानपणापासून मोठ्या प्रेमानं वाढविलं. आतां काय मी तिच्याकड व तिनं माझ्याकडं पाहून दिवस काढावे अशी स्थिति आहे! अशा स्थितींत ती माझ्यावर कितीतरी प्रेम करिते. अशा माउलीचे मला नको का ऐकायला? आतां एक बरीक उपाय दिसतो. कसं तरी करून आईचं मन वळविलं पाहिजे. तिचं मन वळविलं कीं मी काय त्यांचीच—( लाजते. ) तिला तुह्मी काय हवं तें सांगा. व काय हवं तसं करा. माझ्या ह्मणण्याप्रमाणं लग्न करावं असा जर तिचा विचार दिसला, तर मीही तिच्या जवळ ही गोष्ट काढीन. मग यांत थोडी मर्यादा बाजूला ठेविली तरी हरकत नाहीं. पण तुह्मी मात्र खटपट केली पाहिजे.

म०—( आपल्याशीं ) आतां पार्वती काय उत्तर देते तें पाहूं.

पा०—हो हो. न करायला काय झालं? तुह्मां दोघां करितां इतकं का माझ्या हातून होणार नाहीं! मी कांहीं इतकी दगडासारख्या हृदयाची नाहीं हो! सांगा तर मग मी तुमच्यासाठीं काय करूं तें?

म०—मी काय सांगूं? मला पोराला काय सुचणार? हवंतर तिकडंच विचारून पहा कांहीं युक्ति सुचली तर!

अ०—( थट्टेनें ) अगबाई! इतक्यातच झाली कां सुरुवात इकडं

तिकडं म्हणायला ? पार्वतीबाई, आजपर्यंत केलंत तें निस्तरा आतां काढा कीं एकादी युक्ति !

पा०—हें काम किनई भारी अवघड आहे बाई ! ( मथुरेस ) तुझी आई चांगली शहाणी आहे. ती कांहीं या करण्याला नाकबूल होणार नाहीं. म्हाताऱ्या बापाला देण्यापेक्षां तरण्या मुलाला द्या असं जर तिला समजावून सांगितलं, तर ती खचित ऐकेल. पण धनाजीराव—

प्र०—( आपल्याशीं ) गाढव आहेत यांत बिलकुल शंका नाहीं.

पा०—त्यांना जर आतां "नाहीं" म्हणून खडखडीत जबाब दिला तर त्यांनां फार वाईट वाटेल व ते प्रतापरावाचा द्वेष करूं लागतील व तुमच्या लग्नामध्यें हजारों विघ्नं आणतील. म्हणून म्हणतें कीं त्यांनीं आपण होऊन तुला नाकारलं तर फार चांगलं होईल. तेव्हां तूं किनई, मथुरे, त्यांना तुझा अगदीं कंटाळा येईल व दृष्टीसमोर देखील नकोशी वाटशील अशा रीतीनं वागूं लाग.

प्र०—( आपल्याशीं ) वाः ही युक्ति सर्वोत्कृष्ट आहे.

पा०—अशा रीतीनं वागलं तरच कांहीं संभव आहे. पण पुढं आतां काय करायचं ? थांबा हं: ! कांहीं विचार सुचतो कां पहातें ( विचार करून ) हं: आतां नीट ऐका. आतां आपण अशी कंडी उठवूं-या कीं गांवांत एक तरुण विधवा स्त्री आली आहे. लोकांना इतकंच सांगायचं कीं ती मोठ्या कुळांतली असून मोठमोठ्या जहागिरदारांनी तिला मागणी करावी अशी तिची योग्यता आहे. नंतर मीच जाऊन धनाजीरावानां सांगेन कीं, दादासाहेब, ती मोठी श्रीमंत आहे. तिचं घर, दार, मळे, दळे सारं कांहीं यथास्थित असून तिच्या जवळ आज रोख चार लाख रुपये शिल्लक आहेत. व ती तुमच्याच

स्वरूपाला व गुणाला भुलून इथं आली आहे. लवीन तर तुमच्या-शींच पाट लावीन नाहीतर सारा जन्म गोसावीण होऊन राहीन असा तिचा निश्चय झाला आहे. पाट लावून घेण्यास आपण कबूल असल्यास आपलं सर्व कांहीं तुमच्या हवालीं करते असं तिचं ह्मणणं आहे. इतकं सांगितल्यावर जर ते पावळले नाहींत, तर मग काय? ते लागलीच नाचायला लागतील. मथुरेवर त्यांची प्रीती असेल; पण तिच्या पेक्षां त्यांना पैसा अधीक प्रिय आहे. पैशाच्या आशेनं ते तुमच्या लग्नाला अनुमोदन देतील. एकदां तुमचं दोघांचं लग्न झालं, ह्मणजे मग कुठली जहागिरदारीण नी कुठलं काय?

प्र०—( येऊन आपल्याशीं ) आजपर्यंत ज्या गोष्टीला मी मनोराज्य समजत होतों, ती गोष्ट आज खरी भासयाला आली. जसा माझा निश्चय आहे, तसाच इनाही आहे, हें पाहून मला फार संतोष होतो. ( उघड ) पार्वतीबाई, तुह्मी या कामांत मदत करण्याचं मनावर घेतलं आहे याबद्दल मी तुमचा फार फार आभारी आहें. तुह्मी योजिलेली कल्पना मी साग्र ऐकिली. आहे उत्तम—पण ती मोठ्या बेतानं पार पडली पाहिजे बरं कां?

पा०—तें माझ्याकड लागलं! माझी एक मैत्रीण आहे. ती जाहागीरदारणीची छान बतावणी करील.

प्र०—आमचे मनोरथ पूर्ण झाले ह्मणजे तुह्मांला मी मागाल तें बक्षीस देईन. मीही आतां इच्या आईकडे जाऊन तिचं अनुमोदन घेण्याची खटपट करतों. एकदां हें वृद्धतरुणदांपत्य विसकटलं की बहुतेक काम संपुष्टांत आलंच ह्मणावयाचं. ( मथुरेस ) तूं ही आपल्या कोमल व कोंविलवाण्या शद्बांनीं तिच्या जवळ हट्ट घेऊन तिला पुरें पुरेसं

करून सोड. थोड्यांत जी काय खुबी उठवावयाची असेल ती उठव. दुःख शोक, भय इ० सर्व मनोविकारांनीं तिच्या अंतःकरणाचं पाणी पाणी करून दे. व मलाच वरण्याचा निश्चय दाखीव. मी तुला हें सर्व स्पष्ट सांगतों ह्मणून मी निर्लज्ज आहें असे मात्र समजूं नको. मला सर्व कांहीं समजतं. पण राहवत नाहीं ह्मणून सांगतों झालं.! असा चहूंकडून एकसारखा मारा सुरू झाल्यावर किल्ला हातीं येण्यास उशीर तो किती?

म०—यांतलं मी कांहीं विसरणार नाहीं. व माझ्याहातून होईल तितकं मी करीन. ( मनांत ) आई जगदंबे, एवढं काम पार पाड बाई माझ्या हातून! ( धनाजीराव येतो. )

ध०—( एकीकडे ) वाः रे वाः! काय हा सुपुत्र आहे पहा! आपल्या सावत्र आईकडे याची साभिलाष मुद्रा अं:! आणखी तिला देखील हा निर्लज्जपणा चांगला वाटतो? यांत कांहीं तरी गोम आहे!

अ०—अगबाई! बाबा आले वाटतं!

ध०—( पुढें येऊन ) हां. आटपा. झालं कां नाहीं सगळं तयार, विश्वासराव सामानाकरितां हाका मारीत आहे. ( प्रतापरावास ) अरे, आज संध्याकाळीं तं माझ्या दिवाणखान्यांत ये. मला तुझ्यापाशीं कांहीं बोलावयाचं आहे. ( प्रतापराव जातो. ) आजरात्रीं याच्या मनांत तिच्या विषयीं कसा काय विचार आहे, तो काढून घेतला पाहिजे.

( जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळ–धनाजीरावांचा दिवाणखाना.

( धनाजीराव व प्रतापराव बसले आहेत. )

ध०–बरं तें असूं दे बाजूला. दोनप्रहरीं जेवावयाच्या आधीं तूं तिच्याशीं बोलत होतास; व तिचं बोलणंही एकत होतास. त्यावरून तिच्याविषयीं तुला काय वाटतं? मी तिच्याशीं विवाहच करीत नाहीं असं समजून काय तें सांग.

प्र०–मला कांहीं वाटत नाहीं.

ध०–मागं तिच्या विषयीं जो तुझा ग्रह होता, त्यांत कांहीं फेरफार झाला आहे कां?

प्र०–( आपल्याशीं ) अस्सं अस्सं! अशी युक्ति लढवितात काय?

ध०–काय रे गप्प कां? उत्तर कां देत नाहींस?

प्र०–बाबा, हा प्रश्न मला विचारूं नका. कारण, त्यापासून तुह्मांला फार वाईट वाटेल.

ध०–आह्मांला आपलं वाटूं दे. तूं सांग ह्मणजे झालं.

प्र०–बाबा, खरंच पुसाल तर ती जशी असावी असा माझा ग्रह होता, तशी ती बिलकुल नाहीं. तिचा नखरा काय? तिच्यापेक्षां एखादी बाजारची कसबीण बरी! अगदींच हलकट हो!! शरीर तरी किती ओबडधोबड! सौंदर्यांतही कांहीं विशेष नाहीं! आहे आपलं सरासरीच!! स्वभाव जर विचाराल, तर एखादी कृत्या बरी. फारच

दुष्ट! अरेरे!! तिच्याविषयीं तुमच्या मनांत द्वेष उत्पन्न करावा ह्मणून मी असं बोलतों असं मात्र समजूं नका हो! कारण, मला सावत्र आई ही पाहिजेच. पण ही नको या कल्येपेक्षां दुसरी एखादी करून घ्याल तर फार चांगलं होईल!

ध०—अरे हा वेळ पर्यंत तूं तिच्याशीं बोलत होतास; तथापि—

प्र०—मीं तिचा तुमच्या वतीनं पुष्कळ गौरव केला. परंतु तो फक्त तुह्मांला बरं वाटण्याकरितां. नाहींतर मी तिच्याकडे ढुंकून सुद्धां पाहिलं नसतं.

ध०—तर मग तूं तिच्या विषयीं अगदीं उदास आहेस ह्मणवयाचा!

प्र०—मला तिचं पुनः तोंड देखील पाहूं नयेसं वाटतं.

ध०—(ढोंगानें) हें ऐकून मला अतिशय वाईट वाटतं. या तुझ्या बोलण्यानं माझी सर्वोपरी निराशा झाली! माझा सर्व बेत निष्फळ झाला. अरे, आतां मला फारच वाईट वाटूं लागलं. ती केवढी मी केवढा!! मला ती मुलगी नव्हे नात सुद्धां शोभेल. माझं जर तिच्याशीं लग्न झालं, तर लोक उद्यां माझ्या तोंडांत शेण भरूं लागतील व गांवांतील सारी चहाटळ व टारगीं पोरं हात धुवून माझ्या पाठीस लागतील! अशा लहान मुलीबरोबर मजसारख्या केंस पिकलेल्या ह्मातान्यानं लग्न करणं ह्मणजे मूर्खपणाच दुसरं काय? ह्मणून मी माझा बेत अगदीं सोडून दिला. आतां मला असं वाटूं लागलं होतं कीं मी काय नी माझा मुलगा काय एकच. कोणालाही ती मिळाली तरी आमच्याच घराण्यांत पडणार! असं मनांत आणून ती तुलाच करावी असा बेत केला. पण आतां काय! तुला स्वतःलाच ती आवडत नाहीं.

म०—काय मला करणार?

ध०—होय.

म०—अगदीं अग्नि ब्राह्मणांसमक्ष विवाह करून?

ध०—होय.

म०—ती मला मुळींच आवडत नाहीं हें अगदीं खरं आहे. तथापि आपलें मन दुखवूं नये एवढ्याच करितां हवं तर मी तिच्याशीं लग्न लावायला तयार होईन.

ध०—माझं मन दुखवूं नये ह्मणून! नको नको. मला थोडंसं वाईट वाटलं तरी चालेल. पण तुला सुख होऊं दे. मी नाहीं तुझ्यावर जुलूम करणार!

म०—माफ करा. मी होतां होईल तों तिच्यावर प्रीति करण्याचा प्रयत्न करीन.

ध०—तें कांहीं व्हावयाचं नाहीं. परस्पर प्रीति नसेल तर संसार सुखाच्या नांवानं आंवळ्या एवढं पूज्य!!!

म०—प्रीति करितां येईल! लग्ना नंतर परस्परांच्या अंतःकरणांत प्रीति ही उद्भवावयाचीच! बाबा, प्रीति हें विवाहवृक्षाचंच फळ ना?

ध०—प्रतापा, या आहेत जन्माच्या गांठी! तेव्हां यांत उद्दाम धाडस करणं हें मला नाहीं बरं वाटत! जगांत अशा कांहीं त्रासदायक गोष्टी आहेत कीं, त्या आरंभीं गोड वाटतात; पण त्यांचा परिणाम एकदां कां भोगूं लागला कीं असं वाटूं लागतं कीं झक मारली नी मी यांत पडलों! तर तुझा सर्व ओढा तिच्याकडे असता तर माझ्या ऐवजीं मी तिचं लग्न तुझ्याशींच लावून दिलं असतं. पण ज्या अर्थी

वस्तुस्थिति तशी नाहीं, त्या अर्थी मीच आतां तिच्याशीं लग्न लावीन ह्मणजे झालं. दुसऱ्याच्या पदरांत पडून त्या बापडीला तरी विनाकारण त्रास कां ?

प्र०—बाबा, मी आतां मन मोकळं करून तुह्मांला यांतलं खरं खरं सांगतों. तिला पहिल्यापासून माझं तिच्यावर अतोनात प्रेम जडलं आहे. तिच्याशीं माझा विवाह करून द्या अशी तुह्मांला विनंति करायाचाही मीं बेत केला होता. पण त्यांच दिवशीं तुह्मीं आपलं घोडं पुढं ढकलिलं; तेव्हां आह्मी आपले गुपचुप बसलों. कारण, वडिलांचं मन दुखविणं हें कांहीं सत्पुत्राचं लक्षण नव्हे ! एक

कवि ह्मणतो—" जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच ॥ "

ध०—( आपल्याशीं ) आज कसं ब्रह्मज्ञान आठवूं लागलं आहे पहा. बरं आहे ! निघूं द्या आणखी कुचकं नासकं काय असेल तें बाहेर ! ( उघड ) पण तूं तिला या पूर्वी कधीं जाऊन भेटला होतास काय ?

प्र०—हो हो ! !

ध०—पुष्कळ वेळां भेटला असशील ?

प्र०—होय. तिची माझी ओळख होऊन आज बरेच दिवस झाले.

ध०—ती तुझं आदरातिथ्य उत्तम तऱ्हेनं करीत होती ना ?

प्र०—अगदीं उत्तम तऱ्हेनं. पण तुह्मांला आणखी एक गम्मत सांगूं कां ? मी तिला अद्यापपर्यंत माझं नांव समजूं दिलं नव्हतं. व काल मला इथं पहातांच तिला आश्चर्य वाटलं त्याचं कारण तरी हेंच !

ध०—तूं आपला मनोदय तिला कळविला आहेस कां ?

प्र०—हो हो केव्हांचं ! तिच्या आईचं व माझंही या संबंधानं बोलणं झालं आहे.

ध०—मग तिनंही तुला आनंदानं आपलं अनुमोदन दिलं असेल नाहीं ?

प्र०—हो हो ! हें काय विचारावं ? अगदीं आनंदानं व मोठ्या खुषीनं ! !

ध०—पण त्या मथुरेची तुझ्यावर प्रीति आहे कां ?

प्र०—मुद्रेवरून आहेशी दिसते. ती तिनं शब्दांनीं व्यक्त—

ध०—( मनांत ) ठीक आहे. अरे चोरा ! तुझ्या मनांतलं सर्व बाहेर काढून तुला कसं छान फसविलं. मग तरी हेंच समजावयाला पाहिजे होतं. ( प्रतापरावास उद्देशून ) आतां मी तुला निक्षून सांगतों कीं, जिच्यावर मी आसक्त झालों आहें, व जिच्या प्राप्तिकरितां मी रात्रंदिवस विव्हळ होऊन झुरत आहें तिचा प्रीतिपाश तोडून टाकून तूं चटकन् मोकळा हो. व तिच्याकडे ढुंकून सुद्धां पाहूं नकोस. आणि तुला स्पष्ट सांगतों कीं तुला मी एक दुसरी वधू शोधून काढिली आहे तिच्या बरोबर लग्न लावावयाला तुला तयार झालं पाहिजे.

प्र०—( हांसून ) छेः हें बोलणं मला नाहीं खरं वाटत.

ध०—अगदीं खरं आहे. अगदीं देवाची शपथ—

प्र०—( क्रोधानं लाल होऊन ) तर मग आपण मला अशा रीतीनं फसविलं अं: ? आमचं हें कालचक्रच फिरलं आहे, मग आपल्यावर प्रत्यक्ष बाप उलटून पडेल यांत नवल काय ? ठीक आहे

मी आपल्याला साफ सांगतों कीं मी मथुरे वरचं प्रेम लवभर कमीही करणार नाहीं. आजपासून तिला मी माझ्या हृदयांतील आधि दैवत मानीन. व तिच्याकरितां प्रसंग पडेल तेव्हां तुमच्या बरोबर मी भांडावयाला उभा राहीन. आपल्याला वाटत असेल कीं तिला आपल्याला देण्याचं तिच्या आईनं अभिवचन दिलं आहे, तेव्हां हा काय करणार आहे ? व याच घमेंडींत तुम्ही असालही. पण तुम्हांला खचित सांगतों कीं मीही तिच्या प्रीत्यर्थ हवे ते प्रयत्न करीन. कधीं सोडणार नाहीं. याच्या योगानं लोक मला पितृद्रोही म्हणतील तर खुशाल म्हणोत !

ध०—( रागानं ), कायरे मूर्खा, तूं आमच्या लग्नांत विघ्न आणणार काय ?

प्र०—मी नाहीं तुमच्या लग्नांत विघ्न आणीत. पण तुम्ही मात्र कसाबाची करणी करावयाला तयार झालांत ! चांगला पितृधर्म जागविलांत ! !

ध०—अरे मी तुझा बाप असून तूं माझा कांहींच मान ठेवीत नाहींस.

प्र०—अशा कांहीं गोष्टी असतात कीं, त्यांत बापचीच सर्व कांहीं बाजूला गुंडाळून ठेवावं लागतं. मग मान कोठला घेऊन बसलां आहांत ? ही गोष्ट त्यांतलीच आहे.

ध०—( रागाऊन ) बरं आहे. ही माझी काठीच तुला बापाना मान कसा ठेवावा हें शिकवील.

प्र०—शिकवूं दे कशी शिकविते ती ! अशा धमकावणीला भिणारा मी नव्हे.

ध०—( काठी उगारून ) बोल! मथुरेचा नाद सोडणार की, नाहीं ?

प्र०—कधीं नाहीं सोडणार. ( असतन्या वर मारितो. )

ध०—तूं मला मारणार काय ! ( त्याच्या अंगावर धांवून जातो व प्रतापराव त्याला न मारितां फक्त आपला मार चुकविण्याची लटपट करितो. इतक्यांत जगन्नाथ येतो. )

ज०—हां हां हां हां ! दादासाहेब काय हा अविचार ? प्रतापराव, तुह्मी देखील अवगलात की काय ? उगीच हो काय ह्मणून भांडतां ? गांवांतले लोक काय ह्मणतील ?

प्र०—( रागानें ) झक मारतात गांवातले लोक !

ज०—अहो पण उगीच का रागावतां ?

ध०—हा उर्मट कार्टा माझ्याशीं हल्लीं अगदीं बेजबाब बोलूं लागला आहे.

ज०—पण आपण जरा गप्प रहाल कां ?

प्र० मी माझं ह्मणणं कधींही सोडणार नाहीं. होऊं देत दोन हात हवे तर।

ज०—काय आपल्याच वडिलांबरोबर !

ध०—मी सुद्धां तेंच ह्मणतों.

ज०—काय ? आपण पोटच्या पोरावर हात उचलणार ? छेः आपल्याला नाहीं बोवा हें उचित दिसत.

ध०—तर मग आमचा तंटा तूच मिटीव. मी तुझाच या कामांत तिऱ्हाईत करितों. ( एकीकडे त्याला ) हें पहा, माझा पक्ष सोडूनकों बरं कां !

ज०—ठीक आहे प्रतापराव तुह्मी अगळ बाजूला उभे रहा. त्यांचं काय ह्मणणं आहे तें ऐकून घेऊन मी त्यांची नीट समजूत घालतों.

प्र०—पण माझंच ऐकेनास अगोदर ! ( तो ह्याला ओढतो व धनाजीराव दुसरा हात धरून ओढतो. )

ज०—आतां आमचीच कंबख्ती होण्याची वेळ आली. ( हिंसडा मारून धनाजीरावाकडे जातो. )

ध०—हें पहा, एका सुंदर व तरुण स्त्रीवर माझं मन बसून तिचं व माझं लग्न देखील ठरलं आहे. व हा गाढवाचा लेंक ह्मणतो कीं माझंही मन तिच्यावर बसलं आहे. ह्मणून मीच तिच्याशीं लग्न लावणार.

ज०—( आपल्याशीं ) तो खराच गाढवाचा लेंक आहे. ( उघड ) छेः त्याचं ह्मणणं आतां काय उपयोगी !

ध०—या प्रीतिदेवतेच्या राज्यांत मुलगा बापाला प्रतिस्पर्धी झाला ही गोष्ट मनांत आली कीं अंगाचा तिळपापड होऊन जातो. ह्मणूनच मी त्याला हजारों वेळां सांगितलं कीं तूं तिचा नाद सोडून दे.

ज०—आपलं ह्मणणं अगदीं वाजवी आहे. आतां तुह्मी इथेंच उभे रहा. आतां त्याचं काय ह्मणणं आहे तें ऐकून घेऊन त्याला चार सामोपचाराच्या गोष्टी सांगून पहातों. ( त्याच्याकडे जातो. )

प्र०—ठीक आहे ! त्यांनीं तुलाच जर तिऱ्हाईत केलं आहे. तर माझी मुळींच हरकत नाहीं. कोणी कां तिऱ्हाईत असेना ?

ज०—पण हें भांडण कशा करितां ?

प्र०—हें पहा, माझी एका सुंदर व तरुण स्त्रीवर प्रीति जडली असून तिचेंही मजवर अत्यंत प्रेम आहे. परंतु आमचा हा थेरडा गाढव आपलं घोडं पुढं दडपून आह्मांला विनाकारण त्रास देतो !

ज०—अहो, तुह्मी त्यांचं काय ऐकतां ? त्यांना अगदीं ह्मातारचळ लागला आहे.

प्र०—इतक्या ह्मातारपणीं लग्न करणं हा मूर्खपणा नव्हे काय ? जगन्नाथ, मी तुला असं विचारतों कीं अशा उतार वयांत हा लंपटपणा चांगला काय ?

ज०—चांगला तर मुळींच नव्हे. परंतु मला असं वाटतं कीं हें त्यांनं करणं केवळ तुह्मांला चिडविण्यासाठींच असावं. खरं नव्हे. मी त्यांना दोन गोष्टी सांगून पहातों. ( धनाजीरावांकडे जाऊन ) तुह्मी ह्मणतां तितके कांहीं ते मूर्ख नाहींत. त्यांच्या अंगीं बरंच शहाणपण आहे. बापाचा मान कसा राखावा, हें त्यांना पूर्णपणें माहित आहे. आतां ते रागावले आहेत; परंतु हा राग कांहीं खरा नव्हे. फक्त संतापानं त्यांचं माथं फिरलं आहे एवढंच ! ते आपल्या ह्मणण्याप्रमाणं वागावयाला कबूल आहेत. पण आपण मात्र त्यांना हल्लीं वागवितां त्याहून अधिक ममतेनं वागविलं पाहिजे. व त्यांच्या पसंतीस उतरेल त्या मुलीबरोबर त्यांचा विवाह ताबडतोब करून टाकिला पाहिजे.

ध०—( आनंदानें ) एवढंच ना ? त्याला आतां सांग कीं अशा

शहाणपणाच्या अटीवर मी त्याला काय हवं ते देईन. त्यानं आपल्या करितां मथुरे वांचून कोणतीही बायको पसंत करावी.

ज०—बरं आहे. ( प्रतापरावांकडे जाऊन ) तुम्ही ह्मणतां त्याप्रमाणं दादासाहेब अगदींच मूर्ख आहेत असं नाहीं. ते असं ह्मणतात कीं तुह्मी त्यांच्याशीं बेलाशक उद्धटपणानं वागूं लागलां ह्मणून त्यांना राग आला. आतां ते तुमच्या लग्नांत बिब्बा घालणार आहेत ह्मणतां, तर तो एवढ्याच करितां कीं तुह्मी त्यांना योग्य मान देऊन त्यांच्या आज्ञेंत राहावं. इतकी बाजू तुह्मी संभाळली कीं ते सर्व गोष्टी यथास्थित करितील !

प्र०—ते जर मझं लग्न मथुरेशीं लावून देत असतील तर मी त्यांच्या अगदीं अर्ध्या वचनांत वागेन.

ज०—( धनाजीरावांकडे येऊन ) त्यांचं ह्मणणं तरी तेंच आहे. ते तुमच्या ह्मणण्या बाहेर मुळींच नाहींत.

ध०—वाहवा! योग्य मुलगा! मी त्याला उगीच वाईट ह्मणत होतों.

ज०—( प्रतापरावास ) झालं तर मग ठरलेंच. तुमचं भाषण ऐकून त्यांना फार समाधान वाटलं.

प्र०—खरोखर, ही ईश्वरी कृपाच ह्मणावयाची !

ज०—( मनांत ) यांना एकत्र सोडून आपण जरा बाजूला व्हावं, ह्मणजे एक मोठी गम्मत उडेल. ( उघड ) दादासाहेब, प्रतापराव, आतां दोघांचाही समेट झाला आहे, तर आतां एकांतीं बसून या गोष्टीचा नीटपणें विचार करा. तुमचं दोघांचंही ह्मणणं एकच आहे. तथापि आंतलीं खरीं गुह्यं एकमेकांना न समजल्यामुळं हा भांडाभांडीचा प्रकार वाढला.

प्र०—जगन्नाथ, तुझे माझ्यावर इतके उपकार झाले आहेत कीं, ते जन्मोजन्हींही फिटणार नाहींत.

ज०—असें नका ह्मणूं. मी आपलाच चाकर. तेव्हां उपकार कसले ?

ध०—तूं आज मला मोठा आनंदाचा दिवस दाखविलास, ह्मणून तुला मोठंच बक्षीस दिलं पाहिजे. ( खिशांत हात घालितो. जगन्नाथ हात पुढें करितो. धनाजीराव मोकळाच हात बाहेर काढून ) जा. माझ्या ध्यानांत आहे. आणखी पुढं केव्हां तरी देतां येईल.

ज०—ठीक आहे. ( मनांत ) तुझ्यापासून बक्षीस मिळण्याचें चिन्ह या जन्मीं कांहीं दिसत नाहीं. ( जातो. )

प्र०—बाबा, मी आपल्याला विनाकारण त्रास दिला याबद्दल मला फार वाईट वाटतं. मी आपली क्षमा मागतों.

ध०—छे' छेः त्यांत कांहीं विशेष नाहीं.

प्र०—ही गोष्ट माझ्या मनाला फारच लागली आहे.

ध०—तुझं डोकं ताळ्यावर आलं हें पाहून मला फार संतोष झाला.

प्र०—तुह्मी माझा सर्व अपराध विसरून जाऊन मला क्षमा केली, व तुह्मी मजवर इतकी ममता करितां हें पाहून मला सुद्धां पुष्कळ संतोष होतो.

ध०—पुत्र स्वकर्तव्यास अनुसरून वागूं लागलं कीं कोणताही बाप झाला, तरी तो सर्व अपराध पोटांत घालून क्षमा करितोच.

प्र०—तर मग मी आजपर्यंत उधळेपणानें वागलों याबद्दलचा तुमच्या मनांतला सर्व राग गेला ना ?

ध०—तुझा हा आज्ञाधारकपणा व विनय पाहून माझा सर्व राग शांत झाला.

प्र०—या तुमच्या ममताळूपणाची विस्मृति मला माझ्या साऱ्या जन्मांत पडावयाची नाहीं.

ध०—तर मग मीही तुला खात्रीनें सांगतों कीं तुझें सर्व कोड मी मोठ्या आनंदानें पुरवीत जाईन.

प्र०—( आनंदानें ) बाबा, आतां माझी दुसरी कांहीं इच्छा उरली नाहीं. आपण मला मथुरेशीं लग्न लावावयाला परवानगी देतां हेंच माझें कोड तुह्मी पुरविलें असें मी समजतों.

ध०—काय ?

प्र०—त्याबद्दल मी तुमचा फारफार ऋणी आहे. एकदां तिचें व माझें लग्न लागलें कीं तुह्मी, मी व ती तिघेंही सुटलों.

ध०—मथुरेबद्दल तुला कोण काय बोललें आहे ?

प्र०—तुह्मीच किंहो बाबा ?

ध०—कोण मी ?

प्र०—होय. तुह्मी तुह्मीच.

ध०—काय ! मी तिचा नाद सोडून देतों ह्मणून तूंच नाहीं मला सांगितलेंस ?

प्र०—मी आणि तिचा नाद सोडून देतों ह्मणून ?

ध०—हो होय!!

प्र०—कधीं नाहीं असें सांगितलें.

ध०—काय तिचा नाद सोडून देणार नाहीं ह्मणतोस!

प्र०—सोडून देणार नाहीं इतकेंच नव्हे, तर तिच्याशीं लग्न लावण्याचा मी पक्का निश्चय केला आहे.

ध०—आतां काय करावें? हा गाढव पुनः भकला!!

प्र०—बाबा, मी मुळींच भकलों नाहीं. नेहमींप्रमाणें अगदीं शांत आहे.

ध०—अगदीं शांत अँ? वाः! नेहमीं तर हींच भांडणें! मग तशाच प्रकारचा शांत ना? ठीक जुळलं. थांब गुलामा, तुला आणखी ठोंकतों. त्यावांचून तूं ताळ्यावर येत नाहींस.

प्र०—होय तर! बापशेटींची पेंडच लागली असेल!!

ध०—तूं आजपासून माझ्या घरांत पाऊल देखील टाकूं नकोस! मला तुझं तोंड देखील पहावयाला नको.

प्र०—तुमची मर्जी असेल तर तसंही करीन.

ध०—इतःपर तुझा आमचा कांहीं संबंध नाहीं.

प्र०—नसेना? इथं कोणाला याची जरूर आहे? नसावा हेंच उभयपक्षीं इष्ट आहे.

ध०—तूं माझ्या पोटचास नव्हेस.

प्र०—बरं तर.

ध०—मी माझ्या पश्चात् तुला घरांतली एक फुटकी कवडी देखी-ल मिळूं देणार नाहीं.

प्र०—( मनांत ) मी तरी मुद्दाम घरांत समंधाचा प्रवेश कशाला होऊं देऊं ? ( उघड ) खुशाल ! बाबासाहेब, आईच्या नांवानं पेढी-वर जो पैसा होता, तो कालच माझ्या हातीं आला. आता आमचा चरितार्थ कसाही चालेल !

ध०—(ऊर बडवून ) अरे देवा रे ! या कारट्यानं माझा सर्वस्वी घात केला ! अरे ती माझी बायको ! आणि तिच्या नांवचा पैसा या उधळ्याच्या हातांत ? अरेरे ! ! माझी छाती फाटून गेली ! चला चला ! या पेढीवाल्याकडून काय खरी हकीकत आहे, ती काढली पाहिजे. ( जातो. व दुसऱ्या बाजूनं संभ्या धांवत येतो. )

सं०—( धांपा टाकीत ) आँ! धनीसाब, आपुनच काय ? चिभन गांठ कशी अवचित पडली न्हवं ! आपुन लई नामी येळ गांठली बगा. आतां हतं उभं ऱ्हाऊं नगा. चला या माझ्या मागनं.

प्र०—अरे झालं काय ? अशी घाई कां ?

सं०—आदुगर चला. मंग समदं सांगतों. मला बोलत बसायलं येळ न्हाई ! कल तुमास्नी पेढीवरचं घबाड गावलं, आन् आपुन लई तालेवार झालाया. म्हनून मीबी आज एकीकडं लाट मारून गब्बर झालोंया. आतां जलमभर कुनाचीबी चाकरी कराया नग ! !

प्र०—अरे लाट कसली म्हणतोस ?

सं०—ज्यां डोळा ठेवला होता त्येच डबोलं गवासलं न्हवं कां ?

प्र०—( धावयास जातो ) पाहूं पाहूं ! !

सं०—हूं: दूर व्हा ! अवशी अंगाल्ल चिकटताया ? करंज होवं काय ? द्या दस्त लिवून आन न्या पैका ! आतां ह्यो मरद् येक पैची तुमास्नी फुकट द्यायचा न्हाई !

प्र०—कां बरं ?

सं०—कां ह्मंजी ! समदा दिसभर जवा टेहळत व्हतों, तवा कुठं याक घडी गावली. बागमंदी अंतराळी बसून कंबरचं टाकं न् टाकं ढिलं झाल राव ! ह्ये तुमच्या थेरड्याचं—

प्र०—अरे पण तें तुझ्या हातीं कसं लागलं ?

सं०—चला किंजी, बाजुला जाऊन मंग समदं सांगतों. हतनं आदुगर पाय काढला पायजे. जर कां त्या थेरड्याची गांठ पडली तर परसंग लई वंगाळ येईल. अरे द्येवा, त्योच आरडत येतुया जनूं चला चला बिगी ! ! ( जातात. )

## प्रवेश ३ रा.

स्थळ—धनाजीरावाच्या बागे बाहेरील रस्ता.

( धनाजीराव बोडका होऊन ऊर बडवीत मोठ्यानें आक्रोश करितांना दृष्टीस पडतो. )

---

ध०—अरे चोर रे चोर ! मारेकरी ! खून-खून ! धांवा रे धांवा कोणी तरी ! अरे या जगांत न्याय कांहींच राहिला नाहीं काय ? अरे देवा ! आतां मी काय करूं ? मी सर्वस्वी बुडालों ! माझा घात झाला ! चोरांनीं माझा गळा कांपला किरे ! त्या चांडाळांनीं मला

लुटलं हो लुटलं ! ! आग लागो त्यांच्या हाताला. अरे असं करावयाला कोणत्या चांडाळाचा हात वाहवला ? त्याच्या हाताचे कोळसे कां झाले नाहींत ? अरे तो गेला तरी कोठें ? पहारे पहा ! शोधा त्याला अरे तो कोठें लपून बसला आहे कां पहा. आतां त्याला कोठें शोधूं ? आता कोठें जाऊं न कोठें न जाऊं ? तो इथंच कुठं नाहीं का हो ? अरे हा कोण ? थांब थांब अरे चोरा ! !---( आपलाच दंड धरून आपल्याशीं ) काढ कोठें आहे तो पैसा ! अरे चोरा ! — ( आपल्याच तोंडांत मारून घेतो. ) अरे, हा तर मी स्वतः ! माझं मन कसं अगदीं भ्रमत आहे पहा ! मी कोण, कोठें आहे, व काय करितों आहें, याचं मला भानच नाहीं. हाय हाय रे बिचाऱ्या द्रव्या ! ! अरे माझ्या जिवींच्या जिवलगा, प्रिय मित्रा, त्या चाण्डाळानीं तुझा व माझा वियोग केला कीं रे ! ! तूं नाहींसा झालास, त्याबरोबरच माझा सर्व आधार, माझा सर्व भरंवसा, माझा सर्व आनंद हीं लयाला गेलीं ! सर्व जग मला शून्य दिसूं लागलं आहे. मला आता तूं कसा रे प्राप्त होशील ? तूं नाहींस तर मला तरी आतां जगून काय करावयाचं आहे ? मी सर्वस्वीं ठार बुडालों ! ! नाहीं नाहीं हें माझ्यानं सहन करवत. मी आतां खचित मरणार ! मेलों रे मेलों ! खचित खचित शपथपुरस्सर माझा प्राण गेला. जळून माझी राखरांगोळी सुद्धां झाली माझा पैसा मला परत देऊन किंवा चोर दाखवून मला मेलेल्याला जिवंत करावयाला नाहीं कां रे कोणी महात्मा येत ? आं ? काय ह्मणतां ? नाहीं कोणी येत ? मी त्या दिवशीं प्रतापाशीं बोलत होतों, तें सर्व ऐकून घेऊन कोणीं तरी लुच्चानं संधि साधून मला बुचाडलं ! ! आतां जाऊन सरकारांत न्याय मागेन सर्व घरादारावर जरी संकट ओढवलं तरी कांहीं फिकीर

नाहीं. कुळंबीण, चाकर, तो दुष्ट कारटा, कारटी, आणखी मी देखील मेलों तरी बेहत्तर ! ! अरे पण ही येथें गर्दी कसली जमली आहे ! यांतला प्रत्येक मनुष्य चोर असावा असं मला वाटतं. त्याचा संशय येत नाहीं असा एक देखील मनुष्य मला यांत दिसत नाहीं ! आँ ते कशा विषयीं बरं बोलताहेत ? ज्यानं माझा पैसा चोरला त्याच्या-विषयीं ? कसला गलबला बरं हा ? तो चोर तिथं आहे काय ? अहा सज्जन हो, दया करा. व मेहेरबानी करून आमचा चोर तिथं असला तर सांगा. तो तुमच्यामध्यें लपून बसला आहे काय ? आँ ! बायरे, उत्तर न देतां माझ्याकडे पाहून तुम्ही हंसतां काय ! थांबा हराम-खोरांनो ! आतां तुमचं या कृत्यात अंग आहे, अशी माझी बालंबाल खात्री झाली ! चला-चला -अहो मामलेदार-फौजदार-न्यायाधीश -जगाद़ार-अरे ए शिपुरड्यांनो, चला चला लवकर ! ! ! नाहीं तर ते पळून जातील ! धरा धरा त्यांना ! ते पहा निघाले-चालले पळून ! बांधा गुलामांच्या मुसक्या ! ! सर्वांना फाशीं दिलं पाहिजे. व एवढंही करून जर चोर सापडणार नाहीं तर मी स्वत: फांस लावून घेईन ! ! ! ( जातो. )

---

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—धनाजीरावाचें घर.

( कोतवाल व धनाजीराव बसले आहेत. )

को०—आतां आपण स्वस्थ असा. आपलं कर्तव्य कसं बजावावं हें मला पूर्णपणें माहित आहे मी आजपर्यंत हजारों चोरा पकडल्या आहेत म्हणूनच तुम्हांला सांगतों कीं मी तुमची चोरी खचित हुडकून काढीन. व इतर चोरांप्रमाणेंच या चोरांनाही शिक्षा ठोठावीन

ध०—( आक्रोश करीत ) आतां स्वस्थ कसा हो बसूं? देवा! गेला रे गेला! माझा पैसा गेला! माझा प्राणच गेला!! आतां काय करूं! अहो तुम्ही आपल्या कामाला लागा. तुम्ही याचा नीट तपास केला तर बरं; नाहीं तर मला वरिष्ट अधिकाऱ्याकडं दाद मागावी लागेल.

को०—मी अगदीं चोख काम करितों. चोराचा तपास लागलाच पाहिजे. तो जातो कुठं? तुम्ही काय म्हणतां कीं आपल्या पेटींत—

ध०—दहाहजार रुपये होते हो! दहाहजार—एक—दोन- तीन--चार -पांच--सहा--सात -आठ--नऊ -दहा!! अबबब! केवढी रक्कमही! ती चोरीला गेली! इतकेच रुपये होते हो! अरे देवा रे! कसा मज-वर हा प्रसंग आणिलास? दहाहजार हो, दहाहजार!!!

को०—( आश्चर्यानें ) दहाहजार?

ध०—दहाहजार ! दहाहजार !! दहाहजार !!! अहो कितीदां सांगूं ? मला पुनः विचारूं नका ! ते शब्द उच्चारले कीं माझं काळीज फाटतं !

को०—तर मग बरीच मोठी चोरी झाली म्हणावयाची !

ध०—या अपराधाला योग्य अशी शिक्षाच तुमच्या कायद्यांत सांगितली नाहीं ! आहेत त्या सान्या पुळपुळीत ! ! या चोराला दोनदां देहांत प्रायश्चित्त दिलं पाहिजे. जर त्याला इतकी जबर शिक्षा मिळाली नाहीं, तर ही सर्व बेबंद नगरी व झोटिंग पाच्छाईच आहे असं समजेन !—दहाहजार रुपये कि हो एकदम नेले ! !

को०—रोख रुपयेच होते कीं— !

ध०—निव्वळ मोहरा हो ! रुपये, अधेल्या, पावल्या, चवल्या, पैसे पया कवड्या कांहीं दमन्या डब्यांतन पुरून ठेविले आहेत.

को०—तुमचा वहीम कोणावर आहे ?

ध०—माझा वहीम सर्वांवर आहे ! या शहरांतले सर्व लोक येथून तेथून महा बिलंदर, पक्के चोर आहेत ! सर्वांना तुरुंगांत घातलं पाहिजे. त्यांत तुह्मी व मी सुद्धां सांपडलों तरी हरकत नाहीं.

को०—आपण माझ्याकडं किंचित लक्ष द्या. कोणालाही धमकीचीं भाषणं बोलून भिववूं नका. परंतु पुरावा मजबूत करण्याकरितां अंतस्थ पण सभ्य रीतीनं खटपट करा. म्हणजे तुमचा पैसा तुह्मांला ताबडतोब मिळेल. परंतु माझं न ऐकतां जर हवं तसं भकाल तर मात्र सर्व काम बिघडेल. (जगन्नाथ येतो.)

ज०—(आला त्या बाजूकडे तोंड फिरवून) मी इतक्यांत येतों.

तोंपर्यंत त्याचा गळा कांपा—त्याचे पाय बांधून त्याला उलट टांगून ठेवा. नंतर आधणाचें पाणी घेऊन त्यांत त्याला शिजत ठेवा.

ध०—( आनंदानें ) योग्य शिक्षा ! कायरे जगन्नाथ, कोणाचीरे मान कापावयाची ? त्या चोराची कीं काय ? कांप कांप त्या गुलामाची मान !

ज०—दादासाहेब, चोराची नव्हे मोराची ! आपल्या विश्वासरावानें आपल्याला आवडतो ह्मणून एक मोर आणिला आहे. व त्याचीं उत्तम पक्वान्नें करावयास मला सांगितलें आहे. आज विश्वासराव फार आनंदात आहेत !

ध०—काय ? त्यानें तो मोर विकत आणिला ? अरे बाप रे ! त्याला निदान एक रुपया तरी पडला असेल ! ते दहा-हजार व हा एक ! ओयोयोयो ! ! माझा प्राण चाललारे !

ज०—छेः विकत नाहीं आणिला. शिकारीहून आणिला.

ध०— मग कांहीं हरकत नाहीं. तें सर्व राहूं दे आतां. या गृहस्थासमोर उभा राहून तूं यांच्या प्रश्नाचा नीट जबाब दे.

को०— भिऊं नको. मी तुला कांहीं करीत नाहीं. अगदीं साधेपणानेंच तुला विचारितों.

ज०—( धनाजीरावाप्रत ) हे गृहस्थ का आज आपल्या इकडे जेवावयास येणार आहेत ?

को०—हें पहा, तूं आपल्या धन्यापासून कांहीं चोरून ठेवूं नकोस.

ज०—शपथपुरस्सर, कांहीं चोरून न ठेवितां सर्व पदार्थ मी सर्वांना वाढीन.

को०—तुला वेड तर नाहीं लागलं ? मीं तुला विचारलं काय व तूं मला उत्तर देतोस काय ?

ज०—आपल्याला माझ्या हातचा स्वयंपाक जर गोड लागला नाहीं तर तो दोष कांहीं माझा नव्हे ! हा अपराध त्या विश्वासराचा आहे. पक्ष्यांचीं पंखं उपटून टाकिलीं ह्मणजे तो जसा निरुपयोगी होऊन पडतो, तशीच आह्मां आचाऱ्यांची स्थिति झाली आहे. त्या गाढवानं आह्मांला स्वयंपाकाला भरपूर जिन्नस देण्याचं बंद केलं. त्यामुळें आमचा स्वयंपाक चांगला होईनासा झाला, व आह्मी असून नसून सारखेच झालों ! कोण काटकसर ही !

ध०—अरे गाढवाच्या लेका, तुला जेवणाचं कोणी विचारलं आहे ? त्या गोष्टी करतोस कीं नाहीं बंद ? आह्मांला दुसऱ्याच एका महत्वाच्या प्रकरणीं बोलावयाचं आहे. माझा पैसा मी बागेंत पुरून ठेविला होता, तो चोरीला गेला आहे. तो कोणीं व कुठं नेला, हें सर्व तुला माहीत आहे, अशी बातमी मला लागली आहे. तर मग सांग पाहूं खरं काय आहे तें !

ज०—काय ह्मणतां ? मोठंच आश्चर्य आहे !

ध०—आश्चर्य रे कसलं ?

ज०—आपण असून जिवंत राहिला हें !!

ध०—( उठून रागानें त्याचा कान उपटून ) थट्टा करावयाला पाहिजे नाहीं कां ?

ज०–( आरडून ) तसं नव्हे दादासाहेब ! माझा जर पैसा चोरीला गेला असता तर मी खचितँ प्राण ठेविला नसता. दादासाहेब, सर्वच पैसा चोरीला गेला कां हो ?

ध०–होय. तो मुकाट्यानं परत आणून देशील तर ठीक आहे. नाहीं तर फांशीं जावें लागेल ! !

को०–दम खा हो ! त्याला असं दटावूं नका. यानं कांहीं चोरी केली नाहीं, हें मी खात्रीनं सांगतों. त्याच्या मुद्रेवरून तो भला व प्रामाणिक दिसतो. त्याला जेवढी माहिती आहे, तेवढी तो तुह्मांला मोठ्या खुषीन सांगेल. न सांगेल तर तुरुंगांत जावं लागेल हें। पण त्याला ठाऊक आहेच. जगन्नाथ, तूं चट सारं खरं सांग. ह्मणजे तुला आह्मी मुळींच त्रास देणार नाहीं. इतकंच नव्हे, तर धनाजीरावां-कडून तुला मोठं बक्षीस देववूं.

ध०–अं: ह: अं: ह: मी नाहीं या गोष्टीला कबूल ! तो माझा चाकर व मी त्याचा धनी ! ! चोरी करून पुनः कबूल झाला तर त्याला बक्षीस देऊं ! वा: !

ज०–( आपल्याशीं ) तुझ्यापासून बक्षिसाची अपेक्षा करणं ह्मणजे रेड्यापासून दुधाची इच्छा करण्यासारखंच आहे ? !

को०–अरे यांचा पैसा चोरीस गेला आहे. व तुझ्यावर त्यांचा वहीम आहे.

ज०–( आपल्याशीं ) हां ! त्याचा सूड उगवावयाला ही संधी कशी प्राप्त आहे ! इथं आल्या पासून पाहतों तों या गुलामाचं

आपलं साऱ्यांवर वर्चस्व ! याचंच साऱ्यांनीं ऐकिलं पाहिजे ह्मणे. दादासाहेबांच्या नाकांतला जसा काय बाल होऊन राहिला आहे. ठीक आहे भरलीं गुलामा आज तुझीं शंभर वर्षं ! काय लेकानं आज मला मारिलं पहा ! ! तें कां आतां मी विसरणार ?

ध०—विचार कसला करतोस रे ?

को०—दम खा हो ! त्याला आपल्या मनाशीं नीट विचार करूं दे. तो आपल्याला सर्व कांहीं सांगेल- मी नव्हतं तुह्मांला सांगितलं कीं तो प्रामाणिक आहे ह्मणून !

ज०—मी आपल्यापाशीं सर्व खरं सांगेन. पण तेणेंकरून दादा साहेबांना फार वाईट वाटेल !

ध०--सांग सांग प्रत्यक्ष पोटचा कारटा मताप्या जरी असला तरी त्याला सुद्धां क्षमा करणार नाहीं.

ज० काय सांगूं दादासाहेब ? आपलं प्रियपात्र---

ध०--काय ? मथुरेनं चोरी केली ?

ज०--छे छे. ती बिचारी कशाला करील ? दादासाहेब, तुह्मीं आपण होऊनच किंहो चोर घरांत बाळगला ?

ध०---अरे कोण तो ?

ज०आपला मूर्तिमंत विश्वास विश्वास--

ध०---कोण ! विश्वासराव ?

ज०---होय.

ध०---ज्याच्यावर माझा पूर्ण विश्वास होता, तो विश्वासराव ?

ज०—तोच तोच. त्यानंच तुमचा पैसा चोरला.

ध०—हें तूं कशावरून ह्मणतोस !

ज०—कशावरून ?

ध०—होय. तूं ह्मणतोस हें खरं कशावरून ?

ज०—हें मला खोटं वाटत नाहीं ह्मणूनच खरं वाटतं.

को०—पण त्याबद्दल तुला पुरावा केला पाहिजे.

ध०—मी तो पुरून ठेवला होता, त्या ठिकाणीं तूं त्याला हिंडतांना कधीं पाहिलंस ?

ज०—होय तुमचा पैसा कुठं बरं होता ?

ध०—आमच्या बागेच्या कोंपऱ्यांत.

ज०—अगदीं बरोबर ! त्याच कोंपऱ्याकडं जातां-येतांनां मी त्याला पुष्कळदां पाहिलं आहे! तुमचा पैसा कशांत बरं होता ?

ध०– ( रडवं तोंड करून ) एका जस्ताच्या डब्यांत होता रे ! !

ज०—होय हो होय ! तोच डबा घेऊन पळून जातांना मी त्याला पाहिलं.

ध०–तर मग तो डबा कसला होता सांग पाहूं ! मग पाहीन तो माझाच होता कीं नाहीं तो ! !

ज०— तो कसला होता ?

ध०—होय. सांग कसला होता तो.

ज०—तो बघा दादासाहेब--अगदीं डब्यासारखा डबा होता.

को०---अरे, डबे एकासारखे एक असावयाचेच ! पण तो कोणत्या आकाराचा, केवढा होता वगैरे सांग तर खरं !

ज०---तो डबा भला मोठा होता कोतवाल साहेब.

ध०---तर मग तो नव्हे ! माझा डबा साधारण लहानच होता.

ज०---दादासाहेब, आपल्यासारख्या श्रीमंतांनीं त्याहीपेक्षां मोठ-मोठाले डबे पाहिलेले असतात; ह्मणून तो आपल्याला लहान वाटतो-मी मोठा ह्मणतों तो कांहीं तो मोठ्या आकाराचा ह्मणून ह्मणतों असें नाहीं; तर त्यांत बहुमोल वस्तु होत्या ह्मणून ह्मणतों.

ध०---त्याचा रंग रे कसला होता ?

ज०---रंग ?

को०—होय. सांग त्याचा रंग कसला होता तो ?

ज०---रंग ह्मणाल तर--अरेच्या---मला शब्द देखील आठवेना दादासाहेब, तसल्या रंगाला काय बरं नांव आहे ?,

ध०---छट् मी नाहीं सांगणार.

ज०---तांब---तांबूस---रंगाचा होता नाहीं दादासाहेब ?

ध०---नव्हे तर मग तो ! करड्या रंगाचा असला तर तो माझा.

ज०---अहो तांबूस ह्मणजे सगळाच तांबूस नव्हता ! त्यांत पांढ-ऱ्या रंगाची झांक असून कसा मजेदार तांबूस करडा रंग दिसत होता

किंवा जमिनींत असल्याकारणानं जंगही बसला असेल ! मी तेंच सांगणार होतों, पण शद्ध आठवेना त्याला उपाय नाहीं. मला पाहतांच त्यानं तो धोतराआड लपवून घेतला. मी दादासाहेबांना जाऊन सांगतों ह्मणतांना मला बडीव बडीव बडविलं व आपण सूं पळाला. ही पहा माझी पाठ कशी सुजली आहे ती !

ध०---आतां तर मुळींच संशय उरला नाहीं. तोच माझा डवा ! ! कोतवाल, घ्या हा पुरावा लिहून ! देवा, ज्याच्यावर मी विश्वास ठेविला, त्यानंच माझा असा गळा कापला ना ! इतःपर मी माझ्या स्वतः वर देखील विश्वास ठेवणार नाहीं.

ज०--दादासाहेब, तो पाहिलांत कां चोर ? कसा द्रव्य लपवून ठेवून हळूच इकडे येत आहे ! याच्या मुद्रेवरून कोणाला संशय तरी येईल कां ? जसा काय पक्का संभावित ! ! माझं नांव त्याला सांगूं नका चरं कां ? ह्मणजे तो कांहींच कबूल करणार नाहीं. ( विश्वासराव येतो. )

ध०--- चल रे ए विश्वासघातक्या, चल असा पुढं ये. व आपला अपराध कबूल कर. पर्वतापेक्षां देखील मोठा आहे तो अपराध. असा भयंकर अपराध कोणीं कधींही केला नसेल.

वि०---तुह्मी काय ह्मणता तें मला मुळींच समजत नाहीं.

ध०---अरे लुच्चा, अपराध करून सवरून नाकबूल जातोस काय !

वि०---अपराध कसला व हें आपण बोलतां तरी काय ?

ध०---अरे हरामखोरा, जसं काय तुला माहितच नाहीं अं: ? हें पहा, हें असलं छप्पं छप्पं माझ्या जवळ कांहीं चालावयाचं नाहीं.

खरं काय आहे तें सारं मला कळलं आहे. मी तुझ्यावर दया करून तुला अन्नाला लाविला असून असलं हें नीच कृत्य करण्याला तुला हात तरी कसा वाढवला ? मीं तुला घरांत ठेवून घेतलं हाच माझ्या हातून मोठा अपराध घडला.

वि०---दादासाहेब, ज्या अर्थी ही सर्व गोष्ट आपणांला कळली आहे, त्या अर्थीं आतां मी नाकबूल कशाला जाऊं ?

ज०---( आनंदानें आपल्याशीं ) माझंच भाकित खरं ठरणार वाटतं!

वि०---मी तुम्हांला तेंच सांगावयाला आलों होतों. या गोष्टीला कांहीं फारसा वेळ झाला नाहीं. मी अपराध केला आहे खराच पण तो करण्यांत माझे हेतु काय आहेत हें नीट ऐकून घेऊन मग हवी तर मला शिक्षा करा.

ध०—असं करण्यांत तुझे काय सुंदर हेतु असतील ते दिसतातच आहेत. अरे चोरट्या, पाजी मनुष्या !—

वि०—दादासाहेब, हीं विशेषणं आतां मला शोभत नाहींत. मीं तुमचा सर्वस्वी अपराधी आहें ही गोष्ट सर्वथैव खरी आहे. परंतु हा माझा अपराध अगदीं क्षम्य आहे.

ध०--क्षम्य ! तो कसा रे ? दिवसा ढवळ्या दरवडा घालणं हा अपराध क्षम्य आहे काय ?

वि०—दादासाहेब, विनाकारण रागावूं नका. मी काय सांगतों तें जर नीट ऐकाल, तर तुम्हांलाच असं वाटेल कीं या विश्वासानं अपराध मुळींच केला नाहीं.

ध०—अपराध केला नाहीं अं ! अरे चोरा ! अरे, असें करण्यानें तूं माझ्या हृदयांतलं रक्त—

वि०—आपलं रक्त कांहीं एखाद्या भिकाऱ्याच्या हातांत पडलं नाहीं. आपल्या कुलाला कोणत्याही तऱ्हेनं कालिमा येईल इतकं माझं कुल नीच नाहीं. आणि आपल्याला कुरकुर करावयाला जागा सांपडेल असा एक सुद्धां दुर्गुण माझ्या अंगांत नाहीं.

ध०—तो माझा ठेवा मला परत दे.

वि०—खचित आपणांस कांहीं तो आतां माझ्यापासून परत घेतां येणार नाहीं.

ध०—मी तो तुझ्यापासून परत घेणारच. व तूंही आपली शोभा करून न घेतां मुकाट्यानं परत द्यावास हें चांगलं ! !

को०—तसं केलं तरच त्याचं हित आहे. नाहींतर—

वि०—तो ठेवा मी कुठंही दूर नेत नाहीं. दादासाहेबांच्याच पाशीं ठेवणार आहे.

ध०—( रागानें ) मेले ते दादासाहेब ! आग लाव त्या साहेबीला ! ! हें करावयाला, चांडाळा, तुझा हात तरी कसा रे वाहवला ? तुला कोणीं रे भर दिली ?

वि०—हाय हाय ! हाच प्रश्न तुह्मी मला शेवटीं विचारलात ना ?

ध०—मला काय हवं तें मी तुला विचारीन. त्याचा तूं योग्य जबाब दे ह्मणजे झालं !

ज०—( आपल्याशीं ) हा आतां माझं नांव घेणार कीं काय न कळे ! !

वि०—दुसरं कोणी ? ज्याच्या पाशांत सारं जग बद्ध होऊन जातं तेंच ! त्याच प्रेमानं मला भर दिली.

ध०—काय ? प्रेम ?

वि०—होय दादासाहेब, प्रेमच ! !

ध०—वा: ! फार चांगला प्रकार आहे हा प्रेमाचा ! काय प्रीतीचा झटका हा ? अरे मूर्खा, तुझी माझ्या द्रव्यावर प्रीति जडली अं: ?

वि०—भलतंच. आपल्या द्रव्यावर मी मुळींच भुललों नाहीं. किंवा त्याच्या तेजानं माझे डोळेही दिपले नाहींत. मजजवळ जें कांहीं आहे तें सर्व तुला दिलं आहे असं ह्मटलंत की तुमची एक दमडी सुद्धा मला अधिक नको.

ध०—तुला दिलें आहे असं ह्मणूं ? तें प्राण गेल्यानंही मी तुला सोडणार नाहीं. काय त्रास शिंचा हा ! असा हेकडपणा कोणी कधीं पाहिला आहे काय ? चोरी केली ती केली व चोरीचा माल आपणच उपटावा अशी इच्छा अं: ?

वि०—मग काय आपण या कृत्याला चोरी ह्मणतां ?

ध०—चोरी कां ? दरवडा ह्मणतों. अरे असला अत्युत्तम व अमूल्य ठेवा—

वि०—खरोखरच, तो ठेवा अत्युत्तम व अमूल्य आहे, हें मीही कबूल करितों. परंतु तो जर आपण मला दिलात तर आपलं कांहीं नुकसान होणार नाहीं. दादासाहेब, हा सुंदर व मनोहर ठेवा आपण मला अर्पण कराच, अशी मी आपल्याला पदर पसरून विनंति करितों.

ध०—मी तो तुला कधींही देणार नाहीं. तुझा बेत काय आहे, तो मी समजलों ! ती वस्तु इथं आणून हजर करतोस कीं नाहीं ?

वि०—नाहीं नाहीं ! दादासाहेब, मला तिच्या मुळींच अंतर देतां येत नाहीं. आह्मी परस्परांनीं परस्परांस वचनं दिलीं आहेत. व आजन्म एकमेकांस कधींही अंतर देणार नाहीं अशा आणा शपथाही वाहिल्या आहेत.

ध०—( आश्चर्यानें ) वचन व आणाशपथा ! मोठं आश्चर्य आहे !

वि०—होय. शपथ व वचन याच्या दृढबंधनानीं आह्मी परस्परांस अगदीं जखडून बांधून टाकिलं आहे.

ध०—तर मग उभयतांची ताटातूट कशी करावी तें मला चांगलं माहित आहे. व तें मी खचित करणार.

वि०—आतां मृत्युच येईल तर नाइलाज आहे. इतरांच्या हातून आमचा वियोग कधींही करवणार नाहीं.

को०—( मनांत ) काय चमत्कारिक मनुष्य आहे हा ? बरं पाहूंया पुढं कायकाय गम्मत होते ती ! शेवटीं आहेच चवदावं रत्न !

ध०—तर मी माझ्या द्रव्यावर तूं बराच भुलला आहेस ह्मणायचा ?

वि०—दादासाहेब, ही गोष्ट मी माझ्या स्वतःच्या कल्याणासाठीं केली नाहीं. तसं करण्यांत माझा फारच चांगला हेतु होता.

ध०—बस्स बस्स. तोंड आटप. कोतवाल साहेब मोठे न्यायी आहेत. ते या गोष्टीचा तपास करून जेव्हां तुला योग्य शिक्षा करतील तेव्हांच माझे डोळे शांत होतील.

को०—बोल रे नीट बोल ! सारं कबूल कर. नाहींतर विनाकारण तुरुंगांत जाशील !

वि०—काय पाहिजे तें करा. आपण जी शिक्षा कराल ती भोगावयास मी तयार आहें. पण दादासाहेब माझी एक विनंति ऐका. या कृत्यानं जर आपल्यास फार त्रास झाला असेल, तर त्यास कारण मी एकटाच आहें. त्यांत आपल्या मुलीकडे काडीइतका देखील दोष नाहीं.

ध०—काय माझी मुलगी ? तिचं या कृत्यांत अंग असेल, तर मोठंच आश्चर्य म्हणावयाचं ! विश्वासराव, ती माझी ठेव मला मुकाट्यानं परत आणून दे ! कुठं आहे ती सांग पाहूं !

वि०—मी तिला तुमच्या घरा बाहेर मुळींच नेलं नाहीं.

ध०—( एकीकडे ) हायहायरे बिचाऱ्या द्रव्या ! ! ( विश्वासरावास ) काय म्हणतोस माझी ठेव माझ्या घराबाहेर गेली नाहीं ?

वि०—नाहीं दादासाहेब.

ध०—बरं तर; मला आधीं हें सांग, तूं तिला हात चित तर—?

वि०—भलतंच ! ! माझ्या हृदयांत प्रीतीची जी ज्वाळा प्रदीप्त झाली आहे, ती फार शुद्ध व निर्मल आहे. म्हणून माझ्या हातून असं निंद्य कृत्य घडेल अशी शंका सुद्धां नको.

ध०—( एकीकडे ) माझ्या द्रव्याच्या प्रीतीची ज्वाळा ? चमत्कार आहे ! !

वि०—माझ्या मनांत जर तसले दुष्ट विचार असतील, तर ईश्वर

माझा या क्षणींच अंत करा. मी इतका अधीर नाहीं ! मी तिला मुळीं स्पर्श सुद्धां केला नाहीं. तिच्या अंगचा विनय व अंतःकरणाचा शुद्धपणा पाहून माझं मन कसं अगदीं वेडं होऊन गेलं आहे !

ध०--( एकीकडे ) काय ? ठेवीच्या अंगीं विनय व शुद्धपणा ?

वि --की ती इतकी सुंदर आहे कीं, मला सदासर्वकाळ तिच्याकडेच पहात बसावं असं वाटतं. व तिच्या त्या सुंदर व विशाळ नेत्राचे प्रेमकटाक्ष--

ध०--( एकीकडे ) काय ? माझ्या ठेवीचे नेत्रकटाक्ष ? अरे हा तर अगदींच भकला ! जसा एकादा कामांध मनुष्य एकाद्या स्त्रीचं वर्णन करितो, तसा हा माझ्या द्रव्याचं वर्णन करीत आहे ! याचं डोकं अगदीं फिरून गेलं आहे ! !

वि०--दादासाहेब, आश्चर्य वाटूं देऊं नका. या कृत्याची सर्व माहिती पार्वतीला आहे. ती हवीतर या गोष्टीची साक्ष देईल !

ध०--काय ? तें रांडखं देखील यांत सामील आहे ?

वि०--होय दादासाहेब. जेव्हां आम्हां उभयतांच्या गांठी पडावयाचा योग जुळून आला, त्या वेळीं ती तिथंच होती. ती, मथुरा, व एक भट या त्रिवर्गांनीं मुहुर्त साधून आम्हांवर अक्षता टाकिल्या.

ध०--अरेरेरे ! ! कोतवालास पाहून गर्भगळित होऊन तर हा असं भळभळतं बडबडत नसेल ? अरे, हें तूं काय बडबडतोस ? लग्न कोणाचं ? आहे काय ?

वि०----माझं.

ध०----कोणाशीं ?

वि०---खरोखर दादासाहेब, तिच्या अंगचा विनय मोठा विलक्षण आहे. तिचं मन वळविण्याला मला किती खटपट पडली ह्मणून सांगूं !

ध०---अरे कोणाच्या अंगचा विनय ?

वि०---आपल्या सद्गुणी मुलीच्या अंगचा. काय तो आनंदाचा दिवस ! कालच घोरपडेवाडीमध्यें तिचं व माझं सुमुहुर्तावर लग्न लागलं.

ध०---( रागानं ) माझ्या मुलीचं तुझ्याशीं लग्न झालं ?

वि०---होय मामासाहेब.

ध०---अरे देवा रे ! ! हें दुसरं संकट ! द्रव्यापरी द्रव्य गेलं व मुलगी परी मुलगी गेली ! ! मुलगी गेली—गेली तरी बेहत्तर ! पण आतां द्रव्याला काय करूं ! ( ढळढळां रडतो. )

ज०---हें लिहून ठेवा कोतवालसाहेब.

ध०----दुःखाचा डोंगर कोसळला ! निराशेचा कळस झाला ! ! ( कोतवालास ) आपलं कर्तव्य आपण बजावा. याच चोरावर माझी फिर्याद आहे. हा चोर असून लांच देऊन कामं करून घेणारा आहे.

ज०----मीही तेंच ह्मणतों.

वि०-- ( जगन्नाथास ) कां मघांचा खाऊ पुरे झाला नाहीं वाटतं ?

ज०----हां ऐका. मला मारलं ह्मणून हा स्वतःच तोंडानं कबूल झाला !

को०----हाच चोर आहे अशी माझी पक्की खात्री झाली.

वि०----' चोर ' या विशेषणास मी मुळींच पात्र नाहीं. मी कोण

आहे हें जेव्हां तुम्हांला समजेल तेव्हां तुमची सहज खात्री होईल कीं अशा प्रकारची निंद्य गोष्ट माझ्या हातून कधींही घडणार नाहीं.

ध०---अरे, ती दुष्ट कारटी कुठं आहे रे ?

वि०---ती, मथुरा व पार्वती आपल्याच बागेत बोलत बसल्या आहेत.

ध०---चला चला, कोतवालसाहेब, त्या कारटीचीही व्यवस्था पाहिली पाहिजे. ( जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळ---धनाजीरावांचा बाग.

( अहिल्या, पार्वती व मथुरा बोलत बसल्या आहेत. )

अ---मला तर बाई भीति वाटते ! बाबांना जर हें समजलं तर ते काय करतील न कळे ! अगबाई ! बाबाच आले वाटतं ?

म०---( मनांत ) अहाहा ! काय अवतार हा ! ! दिवेच ओंवाळावे ! !

( रागावलेला धनाजीराव सर्व मंडळींसह येतो. )

ध०---अग चांडाळणी, माझ्या पोटीं उत्पन्न झाली नसतीस, किंवा उपजतांच मेली असतीस, तर फारच चांगलं झालं असतं. मी तुला आजपर्यंत जें शिक्षण दिलं त्याचा तूं फार चांगला उपयोग केलास ! ज्याचं नांव, गांव सुद्धां माहित नाहीं, अशा भामट्याशीं लग्न लावून बसलीस अं: ? आणि तेंही माझ्या परवानगीवांचून ? आतां इतःपर तुम्हां दोघांचं दर्शनही होऊं देत नाहीं. तुला

जन्मभर अंधार कोठडींत कोंडून ठेवितों. ( विश्वासरावास ) आणि चोरा, तुझ्या करितां कोतवाल कचेरींत खोडे कसे वाट पहात बसले आहेत, समजलास !

वि०—आपण मोठमोठ्यानं ओरडलां ह्मणून कांहीं आपलं ह्मणणं खरं होत नाहीं. हें न्यायाचं काम आहे. एका पक्षाचं ह्मणणं ऐकून घेऊन कधींही न्याय होणार नाहीं. माझं ह्मणणं ऐकल्या नंतरच काय तो निकाल होईल !

ध०—( अधिक चवताळून ) चोरा, खोड्यांत घालणं ही शिक्षा तुझ्या अपराधाच्या मानानं कमीच ! पहा आतां तुला सुळावर चढाविण्याची शिक्षा देववितों ! !

अ०—( काकूळतीनं ) बाबा, मी आपल्या पायां पडतें. आपण उगीच कां बरं रागावतां ? आह्मांला क्षमा करा. व या गोष्टी इतक्या थराला नेऊं नका. आपण रागाच्या आवेशांत काय करणार आहांत याचा विचार करा. झाली ती गोष्ट झाली. मी किंनई वाईट घराण्याशीं कांहीं संबंध केला नाहीं. बाबा, त्यांनीं माझा जीव वांचविला हें नाहीं कां आपल्याला स्मरत ? तो जर यांनीं वांचविला नसता तर आज मी तुह्मांला अंतरलें नसतें कां ? यांनीं मला नदींतून बाहेर काढलं ह्मणून मला यानांच अर्पण करून तुह्मीं त्यांचे उपकार मानावेत !

को०—असं जर असेल तर यांत तिचा कांहींच दोष नाहीं. व विश्वासरावावरही रागावून उपयोगी नाहीं.

ध०—तें कांहीं व्हावयाचं नाहीं. हें लग्न होण्यापेक्षा तूं त्यावेळींच

मेली असतीस, तरी मला फार आनंद झाला असता. यानं तुला बाहेर कां काढावं ? हाच याचा अपराध ! !

अ०—बाबा, आपल्या मनांत या दीन मुलीविषयीं नाहींना दया येत ? मी आपल्याला—

ध०—तूं मला कांहीं सांगूं नकोस. व मी तुझं कांहीं ऐकणार नाहीं. न्याय हा झालाच पाहिजे.

ज०—मला मघां गुद्दे लगावतांना, गाढवा, तुला कांहीं वाटलं कां ? पहा आतां कसा वचपा निघतो तो ! !

वि० --जाबे लंवडी ! ! ही घे आणखी एक. ( त्याच्या तोंडांत मारितो. आणखी मारावयास जातो; इतक्यांत जगन्नाथ पळून जातो व त्याच्या पाठोपाठ विश्वासरावही जातो. )

ध०---अहा कोतवाल ! पळा पळा ! तो चोर पळाला पहा ! धरा त्याला.

को०---( जातो. )

पा०----काय तरी बाई चमत्कार हा ! ! कायहो दादासाहेब, इतकं चवताळायला काय झालं ? लग्न लग्न तें काय नी त्याच्याकरितां इतकं रागावयाचं तें काय ? कांहीं तरी मेला सुमार ?

ध०----कां लागलीस कां तूं मध्यें मध्यें बोलावयाला ? ( तिच्या अंगावर धांवून जातो. ती भिऊन पळते. तो तिच्या पाठीस लागतो. व इतर मंडळीही त्याच्या पाठोपाठ निघून जातात. )

## प्रवेश ३ रा

स्थळ---विश्रामपुरांतील रस्ता.

[ आनंदराव बोलत प्रवेश करितो. ]

आ०----( आपल्याशीं ) उद्यां त्या धनाजीरावाच्या पोरीशीं माझें लग्न मोठ्या युक्तीनं होणार होतं. शेजारच्या रामपुऱ्यांत जाऊन हें कार्य उरकावयाचं असा दोघांचाही बेत ठरला होता. तिकडे जावयास निघण्याबद्दल मला सूचना येण्याची वेळ तर टळून गेली! अजून सूचना कशी आली नाहीं या भ्रांतींत बराच वेळ बसलों. पुढं कांहीं सुचेना, व काय झालं त्याचा पत्ताही लागेना. ह्मणून स्वतः शोध करावयाला निघालों आणि पहातों तों त्यांचा दरवाजा आपला बंद! ह्मटलं ह्यातारा आहे संशयखोर व चिकू!! संध्याकाळची वेळ आहे, तेव्हां घेतला असेल लावून!! किती तरी हांका मारिल्या; पण आंतून ओ येईल तर शपथ! शेवटीं तो संभ्या एकदांचा आला बाहेर. त्यानं सांगितलं कीं धनाजीराव कोतवाल कचेरींत गेले आहेत ह्मणून! तिकडे ते कशा करितां गेले असावे बरं? ( विचार करून ) बरं, कोतवाल तरी इतकी रात्र होईपर्यंत कशाकरितां कचेरींत बसला? अं: ! असेल कांहीं तसंच जरूरीचं काम ह्मणून असेल बसला!! आपल्याला काय करावयाचं आहे? आधीं जाऊन धनाजीरावांचीं गांठ घेतली पाहिजे. ( चहूंकडे पाहून ) अरे वा: ! मी बोलत बोलत अगदीं कोतवाल कचेरीजवळच आलों. तर आतां आंत जाऊन त्यांची भेट घ्यावी हें बरं. ( कोतवाल समोर बसले आहेत, एका बाजूला धनाजीराव बसले आहेत. त्याच बाजूला जगन्नाथ,पार्वती व मथुरा

व दुसऱ्या बाजूला अहिल्या व विश्वासराव उभे आहेत. )

ध०—कोतवाल साहेब, लवकर न्याय करा. देवा! पैसा गेला! हातची पोर गेली, आतां काय करूं?

आ०— (पुढें होऊन ) अहो धनाजीराव, असं झालं तरी काय? तुह्मी असे रागावलेले कां? व तुमची मुद्रा अशी दुःखित कां दिसते?

ध०—आनंदराव, काय सांगूं हो? माझ्या सारखा दुर्दैवी मनुष्य साऱ्या दुनियेंत मिळावयाचा नाहीं! तुह्मीं लग्नासाठीं आलां असाल! या लग्नांत असा अडथळा येईल हें आपल्या ध्यानीं मनीं तरी आलं असेल काय? माझा पैशापरी पैसा गेला! अब्रूची राखरांगोळी झाली!! बदलौकिक होऊन शेवटीं दुःख भोगण्याचं नशिबी आलं!!! हा पहा हो लुच्चा, हरामखोर----हा समोर उभा आहे हाच तो. याच मांगानं आमचे सर्व बेत विसकटविले; यानंच माझ्या घरांत चाकरीच्या मिषानं राहून विश्वासघातानं माझा पैसा उपटला; व यानंच माझ्या मुलीला भ्रष्ट केलं?

वि०-आपण ज्या पैशासाठीं एवढा प्राण सोडितां, तो पैसा पाहिला आहे कोणीं?

ध०-अहो, या दोघांचं लग्न देखील होऊन गेलं! आनंदराव, हा सर्व अपमान तुमचा झाला असं समजून तुह्मीच वादी होऊन या भामट्यावर फिर्याद करा. हवा तितका खर्च झाला तरी बेहत्तर!! तो करावयाला अगदीं मागं पुढं पाहूं नका. याचा सूड घ्याच!!

ज०—( मनांत ) वाः! काय मसलत ही!! आपलं नुकसान

भरून काढण्यासाठीं खर्च करण्याबद्दल दुसऱ्याला गळ घालावयाची अं: ? कां ? कमाल आहे कीं नाहीं कृपण धनाजीची ?

आ०—धनाजीराव, माझ्याशीं लग्न लावावं ह्मणून मी कोणावरही बलात्कार करणार नाहीं. आणि आतां तर तुमच्या मुलीचं लग्न देखील होऊन चुकलं आहे. परंतु तुमचं जें यांत नुकसान झालं तें माझंच झालं आहे असं समजून मी खटपट करण्यास तयार आहें.

ध०—आपलं कर्तव्य पूर्णपणें बजावण्याविषयीं मला कोतवालसाहेबांनीं वचन दिलं आहे. आता आपण जी कांहीं मदत करणार असाल, ती यांनाच करा. ( कोतवालास ) कोतवालसाहेब, जितकी मोठी तोहमत याच्यावर ठेवतां येण्यासारखी असेल तितकी ठेवा. अनमान करूं नका. आणि करा शिक्षा ! !

वि०—तुमच्या मुलीशीं मी तिच्या संमतीनं लग्न केलं यांत कोणता अपराध माझ्यावर शाबीत करून ते मला शिक्षा करणार याचा मला नीट उमज पडत नाहीं. मी कोण आहे, हें जेव्हा तुह्मांला समजेल तेव्हां···

ध०—तें ऐकावयाची मला मुळींच जरूर नाहीं. अरे हल्लीं या जगांत एक खूळ माजलं आहे, तें मला पक्कं ठाऊक आहे. जो उठतो तो मी अमक्या अमक्या मोठ्या कुळात जन्मलों आहें, अमक्या अमक्या घराण्याचा व आमचा जवळचा संबंध आहे, अशा बाता झोंकीत फिरत असतो ! तसाच तूंही ! झोंकशील एकादी गप्प झालं ! ! हं: कोतवाल धरा याला ! रात्र फार झाली ! !

को०—दम खा हो ! याचं काय ह्मणणं आहे तें आह्मांला ऐकलंच पाहिजे. हें न्यायाचं काम आहे. दोन्ही पक्षांचं ह्मणणं

ऐकून घेतल्यावांचून कोणाचाही दोषी ठरवितां येत नाहीं.

त्रि०—मी उगीच दुसऱ्याचे नांवावर विकणारा मनुष्य नव्हे. मी कोण व कोणत्या कुळांत जन्मलों याबद्दल सारें नागपट्टण साक्ष देईल.

आ०–हां राव, जरा जपून बोला बरं! नागपट्टणांतील एका अति विख्यात मनुष्यापुढें उभें राहून तुह्मी बोलत आहांत हें लक्षांत ठेवा. जर तुह्मी सांगाल तें खरं ठरेल, तर कांहीं हरकत नाहीं. पण जर कां खोटं ठरलं तर मात्र विचार करा.

त्रि०—मी जें सांगणार तें अक्षरशः खरं आहे. ह्मणून मला कोणाचीही भीति वाटत नाहीं. जर आपण नागापटणांतील राहणारे असाल, तर आपल्याला ते संताजीराव माने माहित असतीलच!!

आ०—आहेत ते मला माहित. त्यांची मला जितकी माहिती आहे, तितकी थोड्यांनाच असेल.

ध०—झक मारतात ते संताजीराव माने!! मी तो संताजीरावही जाणत नाहीं नी फंताजीरावही जाणत नाहीं. अहो, काय हा उशीर कोतवाल? (दोन मेणबत्त्या जळतात हें पाहून त्यांतली एक विझवितो.)

आ०—दम खा धनाजीराव. अमळ धीर धरा. त्याला काय सांगावयाचं आहे तें सांगूं द्या. मग काय खरं आहे तें आपोआप बाहेर पडेल!

वि०—तेच माझे जनक. त्यांच्याच कुळांत माझा जन्म झाला.

आ०--संताजीरावाच्या पोटीं!

वि०---होय. त्यांचाच मी मुलगा.

आ०----छट्! तूं हांसतोस यावरून तुझं बोलणं निव्वळ थट्टेचं आहे असं वाटतं. अरे बाबा, रुचेल तें बोलावं व पचेल तें खावं. भलतीच एकादी थाप मारिली तर ती जिरेल कशी! लोकांनीं तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवावा अशी जुळणी करण्याची तरी अक्कल आहे कां तुझ्या अंगांत?

वि०—महाराज, मला विनाकारण कां भिववितां? मला लबाडी करण्याची मुळींच जरूरी नाहीं. माझं ह्मणणं खरं आहे, हें मी खात्रीलायख पुरावा देऊन सिद्ध करून देईन.

आ०—अरे मूर्खा, उगीच एकाद्या थोराचा मुलगा ह्मणून सांगावयाला भीति नाहीं वाटत?

वि०—भीति कशाची? खऱ्यास मरण कुठं आहे? मी पुनःपुनः हवं तर तेंच सांगतों. व तें मी सिद्ध करावयालाही तयार आहे.

आ०—खोटं बोलण्याची परमावधि झाली! अरे, नागापट्टणच्या राजापासून त्रास होऊं लागला ह्मणून कांहीं सरदारांचीं कुटुंबं नागापट्टणाहून सिंधु देशास जावयास निघालीं, त्यांत हेंही कुटुंब होतं. मार्गांत भयंकर तुफानांत गलबत सांपडून तें फुटलं; सर्व माणसं बुडून मरण पावलीं, त्यांबरोबर त्यांची बायकामुलं बुडालीं हें तुला माहित आहे?

वि०---आपल्याला ही गोष्ट सांगतांना दुःख होतं, यावरून आपण त्यांचे कोणी आप्त आहां असं वाटतं.

आ०--होय. मी त्यांचा अगदीं जवळचा आप्त आहें. पण तूं सांग पाहूं आपली हकीकत काय असेल ती.

वि०—त्यांचीं सगळींच मुलं मेलीं नाहींत. मुलगा त्यावेळीं सुमारें पांच वर्षांचा होता. गलबत फुटलं, त्याची एक फळी सांपडतांच तिच्या आधारानं त्यांचा एक चाकर होता, तो त्या मुलाला घेऊन तरंगूं लागला. सायंकाळच्या सुमारास मुंबापुरीहून दुसरं एक जहाज येत होतं. त्यावरील मालकानं त्या दोघांना आपल्या जहाजावर घेऊन त्यांचे प्राण वाचविले. आपल्या बरोबर जो सध्यां बोलत आहे, तोच हा वांचलेला संताजीरावांचा मुलगा ! माझं पूर्वीचं नांव यदुपति. त्या जहाजाच्या मालकाला माझी दया आली. त्याला माझे गुण आवडूं लागल्यानं तो मजवर अत्यंत प्रेम करूं लागला त्यानं माझं पोटच्या पोराप्रमाणं लालन पालन केलं लहानपणीं दांडपटा खेळणं निशाण मारणं, वगैरे शूरत्वास योग्य असं शिक्षण देऊन नंतर मला लेखन वाचनादि विद्येंतही त्यांनीं प्रवीण केलं, मला माझ्या बापाविषयीं कांहीं कालपर्यंत कांहींच बातमी समजली नाहीं; परंतु कांहीं दिवसां पूर्वीं ज्या व्यापाऱ्याच्या गलबतांत बसून आह्मी नागापट्टणाहून निघालों होतों, तोच व्यापारी आमच्या घरीं आला. माझी ओळख निघाल्यावर त्यानं मला खात्रीपूर्वक सांगितलं कीं, तुझा बाप अद्यापि जिवंत आहे. त्या तुफानाच्या सपाट्यांत गलबताची एक फळी सांपडून तो तरंगत असलेला मी प्रत्यक्ष पाहिला. इतकं ऐकून माझ्या पालनकर्त्याची परवानगी घेऊन मी वडिलांचा शोध करण्यास निघालों. परंतु मार्गांत ईश्वरानंच या सुंदर व मनोहर रत्नाचं दर्शन करून त्याच्यावर माझी प्रीति जडविली. इच्या प्रीतिनं मी अगदीं वेडा होऊन गेलों. माझ्या प्रीतीची अधिकाधिक प्रज्वलित होणारी ज्वाला व इचे वडील हे धनाजीराव यांचा वेडपणाचा हट्ट या दोहींच्या कचाट्यांत सांपडल्यामुळं मला वेषांतर करून यांच्या घरीं चाकर होऊन रहाणं भाग पडलं.

व वडीलांच्या शोधाकरितां खाणा खुणा सांगून दुसरीं माणसं रवाना करावीं लागलीं.

आ०—एवढ्यानंच माझी नाहीं खात्री होत. कदाचित्, तो जिवंत असलेला मुलगा तुला भेटून त्यानं तुला आपली हकीकत सांगितली असेल. ती तूं मला सांगत नसशील कशावरून? भाषणावांचून जर तुझ्याजवळ दुसरा पुरावा असेल तर दाखीव.

वि०—दुसरा पुरावा? त्या जहाजांचे मालक ताराचंद व उमीचंद यांची साक्ष; तिसरा, माझ्या बापानं माझ्या हातांत घातलेली हिऱ्याची आंगठी; चवथा, माझ्या आईनं माझ्या हातांत घातलेली सोन्याचीं सलकडीं; शिवाय, जो गडी मजबरोबर वांचला त्याची साक्ष या पेक्षां आणखी कांहीं अधिक पुरावा पाहिजे कीं काय?

म०—आतां तूं जें कांहीं बोललास, त्यावरून मला असं वाटतं कीं तू कांहीं खोटं सांगत नाहींस. देवा! कसारे हा आनंदाचा दिवस आणिलास? आज माझा भाऊ मला भेटेल, असं माझ्या स्वप्नीं देखील नव्हतं! (झटकन् जाऊन त्याला मिठी मारते.)

वि०—काय तूं माझी बहिण!

म०—होय रे होय दादा! तूं जेव्हां बोलूं लागलास किंनई तेव्हांच मला तसं वाटूं लागलं होतं. तें आतां खरच झालं!! आमची आई किंनई या साऱ्या गोष्टी मला रोज सांगत असत. आतां तूं तिला भेटलास ह्मणजे तिला किती तरी आनंद होईल ह्मणून सांगूं? देवानं जसं तुला वाचविलं तसंच आह्मांलाही वाचविलं. तुला एका सत्पुरुषानं वाचविलं आणि आह्मी मात्र चांचे लोकांच्या ताब्यांत

सांपडलों. आमचं होतं नव्हतं तेवढं सारं बुचाडून घेऊन त्यांनीं आह्मांला सोडून दिलं. नंतर आह्मी नागपट्टणास गेलों. पण तिथं काय ? राजानं आमचं घरदार सारं विकून घेतलं होतं. व बाबांचाही तिथं मुळींच पत्ता लागेना. नंतर पुनः आह्मी तेथून निघून आमच्या आजोळीं गोपट्टणास गेलों. आईचं तिथं कांहीं येणं होतं. तेंही त्या चांडाळांनीं तिला दिलं नाहीं. अशीं दोन्ही गांवं अंतरलीं. आतां कुठं तरी दिवस काढावयाचे ह्मणून इथंच येऊन राहिलों आहोंत झालं ! ! तिघांच्या गांठीं पडल्या, आतां बाबा तेवढे नाहींत ह्मणून फार वाईट वाटतं. ईश्वर करो व ते लवकर भेटोत !

वि०—ताई, ईश्वर कृपेनं तेही भेटतील ! अशी उदास होऊं नकोस. माझी तरी गांठ आज पडेल अशी तुला आशा होती कां ? मग ती पडली कीं नाहीं ?

म०—होय, दादा. आणि यांच्या सारखी मला भावजय मिळाली ह्मणून मला फार आनंद होतो.

अ०—वन्सं, पण तुह्मीही माझ्या वहिनी होणार आहांतच ! होय ना ?

ध०—(रागानें) गप्प बैस कारटे ! लागली मध्यें चुरूचुरू बोलावयाला ? वहिनी होणार कीं आई होणार हें तुला कसं कळणार ?

आ०—(आनंदानें) अहाहा ! परमेश्वरा ! तुझी लीला अगाध आहे. सर्व गोष्टी तुझ्याच इच्छामात्रेंकरून होतात, ही गोष्ट

माझ्या चांगली प्रत्ययाला आली ! तूं जी जी गोष्ट करितोस–मग ती दुःखदायक असो किंवा सुखदायक असो–ती शहाणपणानंच केवळ आमच्या कल्याणासाठीं करितोस यांत संशय नाहीं. बाळांनो, या रे ! मला तुम्हांला कडकडून आलिंगन देऊं द्या. बाळांनो, हाच तो तुमचा हतभागी बाप ! !

वि०–( आश्चर्यानें ) काय ! तुम्हीच आमचे वडील संताजीराव मामे !

म०—व आपल्याकरितांच कां आमची आई एकसारखी ढळढळां रडते ती ?

आ०—होय बाळांनो. ( तो दोघांनाही पोटशीं धरितो. ) मीच तो संताजीराव, मलाही देवानं त्या संकटांतून वाचविलं. माझा सर्व पैसाही माझ्या बरोबर सुरक्षित राहिला. तुम्ही मात्र सर्वजण मला अंतरलांत हें पाहून वंशवृद्धिसाठीं पुनः एकाद्या सुंदर स्त्रियेशीं लग्न लावण्याचा मीं विचार केला होता. जी स्त्री मला मिळणार होती, तिच्याशींच तुझं लग्न झालेलं पाहून मला अत्यंत आनंद होतो.

वि०—पण बाबा, तुम्ही इथं कसे आलांत ?

आ०—नागापट्टणास परत गेलों तर प्राण जगणार नाहीं असं मनांत आणून मी तिकडं जाण्याचा विचार सुद्धां मनांत आणिला नाहीं. या शहरीं येऊन आनंदराव हें नांव धारण करून राहिलों. नागापट्टणचे राजदूत त्यावेळीं आमच्या शोधार्थ हिंडत होते. म्हणून मला नांव बदलणं भाग पडलं. बाळांनो, तुमच्या या आकस्मिक भेटीमुळं सर्व दुःखाचं विस्मरण होऊन मला फार संतोष झाला आहे.

वि०—मला सुद्धां त्या व्यापाऱ्यानं हीच बातमी सांगितली; ह्मणून मीहीं आपलं नांव बदलून विश्वासराव—धनाजीरावांचा पूर्ण विश्वासू बनून राहिलों.

ध—तर मग हा तुमचा मुलगा कीं काय ?

आ०—होय.

ध०—असं जर असेल, तर त्यानं जे माझे दहाहजार रुपये चोरले आहेत, त्याच्याबद्दल तुह्मांला जबाबदार धरून ते तुमच्या कडून भरून घेईन.

आ०—यानं तुमच्या घरीं चोरी केली ?

ध०—होय. याच तुमच्या कारट्यानं.

वि०—तुह्मांला हें कोणीं सांगितलं, कां तुह्मी प्रत्यक्ष पाहिलं ?

ध०—पाहावयाला कशाला पाहिजे ? हा पहा तुझा काका सांगतो. ( जगन्नाथाकडे बोट दाखवितो. )

वि०—काय रे जग्या, तूंच कां सांगितलंस हें ?

ज०—मी मघांपासून तोंडांतून एक शब्द तरी बाहेर काढतों आहे कां पहा ! !

ध०—कसे एकापेक्षां एकेक पक्के बिलंदर आहेत पहा ! अरे आतां धडधडीत कोतवालांच्या समक्ष किं रे यानं तुझं नांव घेतलं!

वि०—पण मी असा हलकटपणा करीन असं तुह्मांला वाटतं कां ?

ध०—वाटतं किंवा न वाटतं ! ! माझा पैसा मला मिळाला ह्मणजे झालं, कोतवालसाहेब, यांत चोर सांपडत नाहींत तर ! आतां घरांतले

दोन चोर राहिले आहेत, त्यांना बोलावून आणवा. ह्मणजे कांहीं पत्ता लागला तर लागेल.

को०--ते कोण ?

ध०—माझाच कारटा प्रताप्या व ह्याचा चाकर संभ्या.

को०—जारे कोणी तरी त्या दोघांना घेऊन या. ( शिपाई जातो. )

ध०—पार्वती, तूं चांगली सामुद्रिक जाणणारी आहेस. तर सांग बरं बघूं माझा पैसा मला सांपडणार किंवा नाहीं तो !

पा०—( बोटं घालून ) दादासाहेब, आपला पैसा खचित सांपडणार असं आलं आहे माझ्या गणितांत. पण त्याच्याबद्दल तुह्मांला बराच तोटा सोसावा लागणार असंही पण दिसतं.

ध०--प्राण गेला तरी चिंता नाहीं. पण माझा पैसा मला मिळूं दे.

( बाहेर गलबला होतो )

को०—बाहेर कसला रे दंगा चालला आहे ?

शिपाई०—साहेब, कांहीं तंटा आहे.

( इतक्यांत सीतारामपंत, एक बाई व कांहीं लोक येतात. )

सी०—कोतवाल साहेब, पायांपाशीं एवढीच विनंति आहे कीं, या बाईनं मजपासून दोन दिवसापूर्वी पन्नास रुपये कर्जाऊ नेले आहेत. परंतु आजच मला समजलं कीं ही बाई अतिशय गरीब असून हिचं स्वतःचं घर दार कांहींही नाहीं. ह्मणून आजच्या आज पैसा परत मागून आणावा ह्मणून इच्या घरीं गेलों, तर ही आज रुपये देत

नाहीं ह्मणून साफ सांगते. या बाईची स्थिति समजल्यापासून मला माझ्या पैशाबद्दल भरंवसा नाहींसा झाला आहे. ह्मणून आपल्या शिपायांच्या मदतीनं तिला या पायापर्यंत आणणं भाग पडलं.

को०—काय बाई, तुह्मी यांचे रुपये घेतले आहेत काय ?

बा०—होय सरकार. मी याला आज नाहीं ह्मणतें याचं कारण पैसे परत देण्याचा वायदा सहा महिन्यांचा होता. मी रुपये आणले त्यांतले बरेच खर्च झाले आहेत. मी अतिशय गरीब आहे. दया करा महाराज.

म०—हा आवाज तर बाई ओळखीचा दिसतो !

को०—बाई, तुह्मी याच गांवांत राहतां काय ?

बा०—सरकार मी मुळची नागापट्टणची;—

ज०—( मनांत ) अरे वा: ! सगळीं नागापट्टणचींच खुळीं इथं जमूं लागलीं आहेत पहा ! आणखी किती येतात कोण जाणे ?

बा०—पण जगांतला सर्व आधार तुटल्यापासून मी न माझी एक मुलगी इथं येऊन राहिलों.

आ०—ही कथा तर आमच्या कथेशीं चिकटूं पहाते !

को०—बाई, तुह्मी कुठं रहातां ?

ध०—मसणांत राहतात. आमचं आधीं संपवा न् मग ह्या खटल्याची चौकशी करा.

बा०—मी शिरंगांच्या गणपतिसमोर राहतें.

म०—( विश्वासरावास व आनंदरावास ) अग बाई ही तर आपली आई ! ( एकदम जाऊन तिच्या गळ्यास मिठी मारिते. ) आई, आई, काय ग हा दुस्तर प्रसंग ? आतां बुरखा काढून पहा. ह्मणजे तुला फार आनंद होईल. हा पहा यदुपति दादा व हे बाबा इथंच आहेत.

बा०—कोण मथुरे ? अग तूं इथं कां ? बाळे, तूं ह्मणतेस तें खरं होण्या जोगं माझं नशीब कुठं आहे ?

म०—आई, दुःख करूं नकोस. ( तिच्या तोंडावरील बुरखा काढिते. )

वि०—( पुढें येऊन ) आई, मी तुला नमस्कार करितों.

आ०—प्रिये चंद्रकले, अहाहा, किती भाग्यवान् मी !—

चं०—अगबाई हेच ते— ( त्याला आलिंगून त्याच्या अंगावर मूर्च्छित पडते. )

आ०—प्रिये, हें काय बरं ? सावध हो सावध हो ! ( वारा घालितो. )

चं०—( सावध होऊन ) काय मी स्वप्नांत तर नाहीं ना ! ( पुनः आनंदरावांच्या तोंडाकडे पाहते. ) होय हेच ते ! ईश्वरा ! तुझी करणी किती तरी अगाध आहे ! ! आज माझीं सर्व माणसं मला भेटलीं. बाळा यदुपति खुशाल आहेस ना ?

य०—होय आई खुशाल आहें.

अ०—( पुढें होऊन चंद्रकलाबाईस व आनंदरावांस ) मी आपणांस नमस्कार करितें.

चं०---ही कोण ?

म०---ही तुझी सून, माझी वहिनी, व दादाची बायको.

चं०---होय कां ? बाळे, तुझं कल्याण होवो. मी आज मोठ्या गूढांत पडलें आहें. सर्व मंडळीची गांठ अकल्पित पडली, हा मोठा चमत्कार आहे !

वि०---आई, तें मी घरीं गेल्यानंतर सांगेन.

सी०---राम राम यदुपतिराव ! !

वि०---राम राम सीतारामपंत ! तूं इकडे केव्हां आलास ?

सी०---मला येऊन झाले आठ दिवस. मी इथं दलाली करीत असतों.

आ०---तुझी व यांची कोठली ओळख ?

वि०---माझे प्राणदाते, उमीचंद सावकार यांच्या घरची. उमीचंदाचा व यांच्या वडिलांचा फार परिचय. त्यांच्याच संबंधानं तो तेथें येत असे.

आ०---कांहीं हरकत नाहीं. सीतारामपंत, तुह्मी उद्यां आमच्याकडे यावें व आपल्या पन्नासाबद्दल शंभर रुपये घेऊन जा.

सी०---ठीक आहे.

( प्रतापराव व संभ्या येतात. )

सं०---( मनांत ) वळाकलं गा वळाकलं या थेरड्यानं ! पन ह्यो मरद दाद लागू देईल तवा नव्हं कां ह्यो मला कैदखंदी टाकनार ?

ध०---प्रतापराव, ये इकडे. ही पार्वती ह्मणते कीं तुमच्या मुला नंच तुमचा पैसा चोरला ! तर सांग बरं तूं कुठं ठेविला आहेस तो !

पा०---मीं हो कधीं सांगितलं असं ?

ध०---( रागानें ) गप्प बैस. तुला कोणी मध्यें बोलावला सांगितलं ?

प्र०—बाबा, आपण पैशाची अगदीं काळजी करूं नका. मीं जरी तो चोरला नाहीं, तरीं तो सध्यां कुठं आहे, हें मला माहित आहे. त्या चोराचा मला पत्ता लागला आहे. पैसा तुह्मांला मिळेल. पण त्यांत एक गोम आहे. ती ही कीं, तुह्मीं मथुरेची आशा अजिबात सोडून दिली पाहिजे. व तिच्याशीं माझं लग्न होण्या करितां आपलं अनुमोदन दिलं पाहिजे. इतक्या गोष्टी झाल्या कीं पैसा पदरांत पडलाच ह्मणून समजा.

ध०--( वेडावून जाऊन मनांत ) काय मथुरा सोडूं ? छेः-तर मग पैसा ? -छेः-मथुरा-पैसा-पैसा-मथुरा ! ! ! बेहत्तर आहे मथुरा गेली तर ! ! पण दहा हजारांतील एक फुटकी कवडी सोडणार नाहीं. ( उघड ) पण कुठं आहे रे तो ?

प्र०—त्याची पंचाईत तुह्मांला कशाला पाहिजे ? तुह्मी त्याविषयीं अगदीं काळजी करूं नका. तो अगदीं सुरक्षित आहे, हें मी खात्रीनं सांगतों. पण तो मिळणं मात्र तुमच्या मर्जीवर अवलंबून आहे. जर तुह्मी मला मथुरा दिली असं ह्मणाल, तर पैशाची गोष्ट काढा. नाहींतर मथुरा द्या पैशाची आशा सोडा.

ध०—पण काय रे, आंतल्या एका पैचीही अफरातफर झाली नाहीं ना ?

प्र०--छेः मुळींच नाहीं. तर मग झाला तुमचा विचार मला मथुरा देण्याचा ! या लग्नाला तिच्या आईचंही पूर्ण अनुमोदन पडलं आहे. ह्मणून ह्मणतों कीं तुह्मी सुद्धां अनुमोदन देऊनं आपला मान राखून घ्यावा हें चांगलं ! !

वि०—प्रतापराव, आईचं एकटीचं अनुमोदन घेऊन कसं चालेल ? ती माझी बहीण आहे. व हे आमचे बाबाही इथंच आहेत. आमचं अनुमोदन नको कां घ्यावयाला ?

ध०—विश्वासरावाचं ह्मणणं अगदीं यथार्थ आहे. सर्वांचं अनुमोदन पडल्या खेरीज कसं चालेल ?

आ०--मी तुह्मां उभयतांच्या इच्छेचा बीमोड करावा या करितांच तुमच्या आमच्या गांठी पडाव्या असा त्या परमेश्वराचा संकेत नाहीं. धनाजीराव, वृद्धतरुण-विवाहापेक्षां तरुण वधुवरांचाच विवाह व्हावा हें योग्य आहे. चला तर ! लोकापवादाला भिऊन या दुसऱ्या लग्नाला अनुमोदन देऊन पहिल्याविषयीं क्षमा करा पाहूं !

ध०—तुमचं बोलणं मला या वेळीं अगदीं ऐकूं येत नाहीं. मला आधीं माझा पैसा पाहिजे. त्याचा नाद जेव्हां माझ्या कानावर पडेल, तेव्हां माझे कान उघडतील.

प्र०--बाबा, पैसे अगदीं सुरक्षित आहेत.

ध०—छेः छेः मला इतक्यांत तुझं लग्नच करावयाचं नाहीं. अल्पवयांत लग्न करणं हें फार वाईट ! ! तशांत संपत माझ्याजवळ खर्चाला ह्मटली तरी एक पैही नाहीं. अगदीं कफल्लक आहें मी ! !

आ०—तुह्मी खर्चासंबंधानं अगदीं काळजी करूं नका. मजजवळ हवा तितका पैसा आहे.

ध०—अहो, पण तुमच्याशीं या पोरीचं लग्न झालं असतं तर माझा हुंडा वांचला असता.

आ०—मी यदुपतीबद्दल मुळींच हुंडा घेत नाहीं.

ध०—पण प्रतापरावाच्या हुंड्याची वाट ?

आ०—त्यांना मी हुंडा देतों. मग तर तुमचं कांहीं ह्मणणं नाहीं ना ?

ध०—पण तुह्मी दोन्हीकडचा खर्च चालवाल ना ?

आ०—कबूल ! ! आणखी काय ह्मणणं आहे ?

ध०—हें पहा, लग्न तर हीं असलीं रकटीं अंगावर घालून हिंडलों तर किती बरं वाईट दिसेल ? ह्मणून ह्मणतों कीं मी नवे कपडे करीपर्यंत लग्न तहकूब ठेववं.

आ०—मी आपल्याला नवे कपडे करून देतों. चला; दोन चार दिवस मोठ्या आनंदांत घालवूं.

सं०—( मनांत ) बगा इचिभन ह्मातार्‍याचा काय कसा हाय त्यो.

को०—थांबा थांबा. आह्मी इतका त्रास सोसला, तेव्हां यांत आमचा हात ओला व्हावयास नको काय ?

ध०—जारे संभ्या, थोडं पाणी घेऊन ये. यांचा हात चांगल ओला करूं.

को०—आमचा आजच्या दिवसाचा भत्ता; हा सारा खटला लिहून घेण्याबद्दलचा रोजमुरा इतकं मिळालं पाहिजे.

ध०—तुमच्या लिहिण्याचा संबंध माझ्याकडे कांहीं एक नाहीं.

को०—मी माझ्या श्रमांचा मोबदला घेतल्याशिवाय तुह्मांला येथून मुळींच हालूं देणार नाहीं. ( दरडावून ) धनाजीराव फिरा मागं. तुह्मी सर्व अपराधी आहांत. तुह्मांला आजची रात्र इथंच राहिलं पाहिजे.

त्याची चौकशी करून योग्य अपराध्यांना शिक्षा देऊन सोडून देऊ. सरकारी कामगाराला विनाकारण त्रास दे वेळ मोडल्याबद्दल तुह्मांला चांगलीच शिक्षा देतो.

ध०—( घाबरून मटकन् खालीं बसतो. ) अग बाई कोतवाल साहेब, या चोराला धरून आधीं फांशीं द्या. म

ज०—हायहाय ! " कोणाचा होऊं नये चाकर " अ तें कांहीं खोटं नाहीं. परवां खरं बोललों ह्मणून दादासाहेब करितां यथेच्छ मुष्टिमोदक चारले; मध्यंतरीं विश्वासरावांनीं केली; व आज खोटं बोलल्याबद्दल जगन्नाथरावाची स्वारी वैकुंठवासी होणार ! !

आ०—धनाजीराव, आज आपण सर्वजण आनंदांत बापड्यालाच दुःख कां ? त्याला क्षमा करा.

ध०—तर मग तुह्मी या कोतवालांची कटकट भागवाल

आ०—ठीक आहे. कोतवाल साहेब, हा लग्नसमारंभ ह्मणजे मी आपली सर्व बाकी चुकती करून देईन. पण लग्न ला वगैरे यावयाचंच अं: ! जर नाहीं आलां तर मात्र तु आमच्यावर मुळींच नाहीं असं मी समजेन.

को०—ठीक आहे.

आ०—बाळांनो, चला आतां. देवदर्शन करून घरीं आपल्या मित्रांना केव्हां भेटेनसं झालं आहे.

ध०—मलाही माझा जिवलग पैसा मी पुनः केव्हां पा आहे ! !

( असें झाल्यावर सर्व जातात. )

( समाप्त. )